# मी आशा करतो की परमेश्वर मला तारेल

लेखक : हॅरॉल्ड कॅम्पिंग



**I Hope God Will Save Me** - Marathi

मी आशा करतो की परमेश्वर मला तारेल
लेखक  हॅरॉल्ड कॅम्पिंग
प्रकाशन व मुद्रण :
फॅमीली स्टेशन्स, ईन्कॉ.
ओकलॅंड, कॅलिफोर्नीया **94621**

www.familyradio.com
E-mail: international@familyradio.com

सूचना : या प्रकाशनामध्ये अवतरित केलेले सर्व श्लोक हे बायबलच्या राजा याकोबाच्या अधिकृत आवृत्तिमधून घेतलेले आहेत.

तृतीय आवृत्ति एप्रिल **2009**

08-28-09

# अनुक्रमणिका


***प्रस्तावना .................................................v***

*मी आशा करतो की परमेश्वर मला तारील ........................................1*

*कोणालाही तारण्यासाठी परमेश्वराला काय करावे लागते? ........................3*

*परमेश्वराने निवडलेले ........................................................3*

*निवडले गेलेले ख्रिस्ताकडे दिले गेले ............................................5*

*पाप धारण करणारा ..........................................................5*

*अजूनही तारले न गेलेले प्रचंड संख्येचे लोक, ज्यांचा परमेश्वर नाश करू शकत नाही...6*

*निसर्गत:च मानवजात आध्यात्मिकदृष्टया मृत आहे ............................7*

*आपल्याला नवीन आत्मा दिला गेलाच पाहिजे ..............................8*

*निवडल्या गेलेल्याच्या तारणाचे वास्तव ....................................10*

*नवीन जन्माचा चमत्कार ................................................11*

*आध्यात्मिक कार्याची बायबलची व्याख्या ....................................12*

*आपल्या तारणासाठी आवश्यक असणारे सर्व कार्य ख्रिस्ताने केले ................14*

*तर मग परमेश्वर आपल्याला या आज्ञा का देतो? ..............................14*

*परमेश्वराचे मानवजातीशी असणारे गूढ नाते ..................................15*

*परमेश्वर मानवजातीची परीक्षा घेतो ........................................17*

*सातव्या दिवसाच्या शब्बाथचे आत्यंतिक महत्व ..............................18*

*परमेश्वराच्या परीक्षाकार्यक्रमाचे आशीर्वाद ....................................19*

*परमेश्वर त्याच्या परीक्षाकार्यक्रमाच्या काठिण्याची तीव्रता वाढवतो ................20*

*आपण बायबल ऐकू शकतो, पण ऐकत नाही? ................................23*

*शास्त्रलेखाची तुलना शास्त्रलेखाबरोबर करा ....................................24*

*सर्व मानवजातीला परमेश्वराचा धावा करण्याची आज्ञा आहे ......................26*

*विश्वासाचे काम ...........................................................28*

*सर्व मानवजातीला परमेश्वरावर विश्वास ठेवण्याची आज्ञा दिली आहे* ..............**30**

*ख्रिस्ताने आपल्याला तारण्यासाठी सर्व कार्य केले, तो विश्वासू होता,* ..............**31**

*शिक्कामोर्तब करण्याची कृति, हे नेहमीच परमेश्वराचे कार्य होते* ..................**32**

*भाषांतरामध्ये क्वचित सुधारणा करावी लागते* ................................**33**

*अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला आणि त्यामुळे तो तारला गेला का?* ............**35**

*जर आपण ख्रिस्तावर विश्वास ठेवला, तर कदाचित तो आपल्याला तारेल*...........**37**

*विश्वास हा शब्द समजून घेण्यामधील गोंधळ* ................................**39**

*सैतान हा प्रकाशाच्या दूताप्रमाणे येतो* ........................................**40**

*मंडळींना शुध्द ठेवणे शक्य होते का?* ..........................................**42**

*एक शक्तिशाली परिवर्तन* ......................................................**43**

*तारला गेलेला मनुष्य, तारल्या न गेलेल्या शरीरामध्ये जगतो* ......................**44**

*तारल्या गेलेल्या मनुष्याच्या इच्छा* ............................................**46**

*भीती आणि थरथरणे* .........................................................**47**

*पण परिपूर्ण प्रेम भीती घालवते* ................................................**49**

*माझ्यासाठी काही आशा आहे का?*...............................................**51**

***श्लोकांची सुची*** ..................................................**58**

# प्रस्तावना

बरेचसे लोक असे म्हणतात की मला तारले जायचे आहे. आणि म्हणूनच, या पुस्तिकेमध्ये आपण मी तारला जाण्यासाठी काय करणे आवश्यक आहे? या प्रश्नाला प्रामाणिकपणे सामोरे जाण्याचा प्रयत्न करणार आहोत. आपण असे शिकू की तारले जाण्यासाठी, कोणीही काहीही करू शकत नाही, त्यामुळे बरेचसे वाचक तात्काळ नाउमेद होतील, जे असा निष्कर्ष काढतील की परिस्थिती निराशाजनक आहे आणि कोणीही तारला जाणार नाही. पण वस्तुस्थिती अशी आहे की आपल्या दिवसांमध्ये, तारल्या जात असलेल्या लोकांची परिस्थिती, अजिबात निराशाजनक नाही. खरोखरच, जसजसे आपण बायबलचा काळजीपूर्वकपणे अभ्यास करतो, तसतसे आपल्याला असे आढळते की बायबलमधील पुरावे असे दाखवतात की तिथे, इतिहासातील या वेळी, खूप मोठया संख्येने लोक तारले जात आहेत.

बायबलमधील पुरावा हा आहे की आपल्या काळामध्ये, इतिहासातील कोणत्याही वेळेपेक्षा, अधिक लोक तारले जात आहेत. पण ते कोणत्यातरी चर्चच्या तारण योजनेच्या अनुसरणाद्वारे किंवा स्थानिक समुदायामधील एखाद्या प्रवचनकर्त्याने केलेल्या पापमुक्ति योजनेमधील सहभागाव्दारे होत नाही. आपण असे शिकू की हे अत्यंत महत्वाचे आहे की जे लोक परमेश्वराचा तारणाचा कार्यक्रम शिकवतात, ते बायबलमधे नोंदविलेल्या, परमेश्वराने आखलेल्या तारण योजनेशी, अत्यंत प्रामाणिक असायला हवेत.

# मी आशा करतो की परमेश्वर मला तारेल

परमेश्वराने हे जग, जवळजवळ **13,000** वर्षांपूर्वी निर्माण केले. त्यावेळी, आपल्या प्रथम मात्यापित्यापासून, म्हणजे आदम आणि हव्वापासून सुरवात करून, त्याने मानवप्राणी त्याच्या प्रतिमेमध्ये आणि त्याच्यासारखाच निर्माण केला. पण मनुष्यप्राण्याने परमेश्वराविरूध्द बंड केले, आणि त्याची शिक्षा म्हणून सर्व मानवप्राणी, परमेश्वराच्या क्रोधाखाली आले. हे बंड इतके गंभीर होते की त्यामुळे, परमेश्वराच्या नियमानुसार, मनुष्याने केवळ परमेश्वरासोबतचे अनंतकाळचे अस्तित्वच गमावले नाही, तर या पृथ्वीच्या अस्तित्वाच्या शेवटच्या दिवशी, त्याचा समूळ विध्वंस होईल, आणि म्हणूनच, पुष्कळ लोक रडतात, "मला त्या अनंतकाळच्या विध्वंसाच्या शिक्षेपासून तारण हवे आहे."

प्रत्येक मानवाला हे माहीत आहे की तेथे असा परमेश्वर आहे, जो त्याच्या पापांसाठी त्याला जबाबदार ठरवतो. हे असे आहे कारण मानवप्राण्याची निर्मिती, परमेश्वराच्या प्रतिमेमध्ये किंवा त्याच्याप्रमाणेच करण्यात आली होती. आणि जरी तो परमेश्वरापासून त्याच्या परमेश्वराविरूध्दच्या बंडामुळे दुरावला, तरी परमेश्वराचे ज्ञान आणि त्याची परमेश्वराबद्दलची जबाबदारी, त्याच्या व्यक्तिमत्वामध्ये उपस्थित आहे. रोमकर **2:13-15** मध्ये आपण वाचतो आणि त्या श्लोकातील "यहूदी नसलेले" हा शब्द, जगातील अशा सर्व लोकांकडे निर्देश करत आहे, ज्यांना बायबलचे ज्ञान नाही :

**कारण नियमशास्त्र श्रवण करणारे देवाच्या दृष्टीने नीतिमान आहेत असे नाही, तर नियमशास्त्राप्रमाणे आचरण करणारे नीतिमान ठरविण्यात येतील. कारण ज्यांना नियमशास्त्र नाही असे परराष्ट्रीय, जेव्हां नियमशास्त्रात जे आहे ते स्वभावत: करीत असतात, तेव्हां त्यांना नियमशास्त्र नाही तरी, ते स्वत:च आपले नियमशास्त्र आहेत. म्हणजे ते नियमशास्त्रातील आचार, आपल्या अंत:करणात लिहिलेला आहे असे दाखवितात; त्यांच्याबरोबर त्यांची सदसद्विवेकबुद्धिहि त्यांना साक्ष देते आणि त्यांचे एकमेकाविषयीचे विचार, दोष लावणारे किंवा दोषमुक्त करणारे असे असतात.**

म्हणूनच, सर्व मानवप्राणी, अंतर्ज्ञानाने हे जाणतात की खून करणे, चोरी करणे किंवा व्यभिचार करणे इत्यादि, हे पाप आहे, म्हणजेच, परमेश्वराच्या नियमाचे उल्लंघन आहे. त्याला अंतर्ज्ञानाने हे देखील माहीत आहे की त्याच्या पापांसाठी, परमेश्वर शिक्षेची मागणी करतो. म्हणूनच, प्रत्येक मानवप्राणी असा मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न करतो, ज्याद्वारे त्याचा परमेश्वराशी पुन्हा सलोखा होऊ शकेल. म्हणजेच, त्याची असा मार्ग शोधून काढण्याची इच्छा असते, ज्याद्वारे तो त्याच्या पापांच्या भीतिदायक शिक्षेमधून सुटू शकेल.

काही लोक, स्वत:ची अशी समजूत घालून या भयानक समस्येतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात की तिथे असा परमेश्वरच नाही, ज्याला त्यांनी उत्तर द्यायलाच हवे. अशा परिस्थितीमध्ये, ते नास्तिक किंवा उत्क्रांतिवादी किंवा अधार्मिक बनण्याचा खूप प्रयत्न करतात.

इतर काही लोकांनी, ते स्वत: पूजा करत असलेल्या परमेश्वराची रचना केली आहे. ते लाकूड किंवा दगडाचा देव बनवतात, जसे की बौध्दधर्मीय, किंवा ज्योतिषी, ते ग्रह किंवा ता-यांकडे, काही प्रकारचे देव म्हणून पाहतात, किंवा असे इतर अनेक लोक, जे असा धर्म शोधतात, ज्यामध्ये त्यांना स्वस्थता लाभू

शकेल. त्या धर्माचा बायबलशी अजिबात संबंध नसेल, किंवा तो धर्म, कदाचित, आधारासाठी बायबलच्या काही श्लोकांचा उपयोग करत असेल. त्यामुळेच, जो धर्म त्यांचा परमेश्वराशी सलोखा करवू शकेल असं त्यांना वाटतं, असा धर्म ते शोधतात.

वस्तुस्थिती ही आहे की आज, जगाच्या लोकसंख्येपैकी एक तृतीयांश लोक, स्वत:ला "ख्रिश्चन" म्हणवतात. त्याचा अर्थ असा आहे की ते अशा धर्माशी आपली ओळख सांगतात, जो बायबलमधील काही भाग वापरून, आपल्या या दाव्याला आधार देतात की सुवार्ताच लोकांना परमेश्वराकडे आणेल. प्रत्येक धर्म, मग तो अतिशय थोडया प्रमाणात बायबलशी संबंधित असो, किंवा वरवर पाहता बायबलशी बराच प्रामाणिक वाटो, तो असा दावा करतो की परमेश्वराशी सलोखा साधण्याचा अत्यंत अचूक मार्ग, त्यामध्ये आहे. हे सुपरिचित अशा संप्रदायांच्या बाबतीत खरे आहे, जसे की रोमन कॅथॉलिक, बाप्तिस्त, रिफॉर्मड, सेव्हन्थ डे ॲडव्हेंटीस्ट, प्रीस्बायटेरीयन, जेहोव्हाज विटनेस, मॉरमॉन इत्यादि. दुर्दैवाने, यापैकी कोणत्याही संप्रदायाकडे याचे पुरेसे ज्ञान नाही की एखाद्या व्यक्तीला, परमेश्वराशी सलोखा साधण्यासाठी कशाची गरज आहे, म्हणजेच, परमेश्वराच्या अशा क्रोधापासून वाचण्यासाठी कशाची गरज असते, जी त्यांच्या पापांसाठीची शिक्षा आहे.

*दुर्दैवाने, ज्या लोकांनी त्यांच्या तारणाठी यापैकी कोणत्याही धर्मावर विश्वास ठेवला आहे, ते परमेश्वरासोबत अडचणीत आहेत, कारण त्यांचे धर्म, त्यांचे तारण करू शकत नाहीत.*

दुर्दैवाने, ज्या लोकांनी त्यांच्या तारणासाठी यापैकी कोणत्याही धर्मावर विश्वास ठेवला आहे, ते परमेश्वरासोबत अडचणीत आहेत, कारण त्यांचे धर्म त्यांचे तारण करू शकत नाहीत, आणि ते सत्याच्या एकुलत्या एका स्त्रोताकडे, म्हणजेच बायबलकडे काळजीपूर्वक लक्ष देत नाहीत.

या पुस्तिकेमध्ये, आपण शक्य तितक्या अचूकपणे, बायबलच्या शिकवणीशी निगडित परमेश्वराच्या अशा योजनेसंदर्भात अधिकाधिक पुढे जाण्याचा प्रयत्न करू, जिथे पुष्कळ लोक परमेश्वराशी पुन्हा सलोखा साधतात आणि अशा भयंकर निवाडयातून सुटतात, जो मानववंशावर या पृथ्वीच्या अंताच्यावेळी येईल.

आपण हे लक्षात घेतलेच पाहिजे की बायबल, त्याच्या मूळ भाषांमध्ये, परमेश्वराकडून लिहिले गेले होते. पण परमेश्वराने मानवी लेखनिक वापरले, जसे **2** पेत्र **1:21** आपल्याला सांगते :

**कारण संदेश मनुष्यांच्या इच्छेने कधी आलेला नाही; तर पवित्र आत्म्याने प्रेरित झालेल्या मनुष्यांनी, देवापासून आलेला संदेश सांगितला आहे.**

इथे लिहिले गेलेले शब्द, हे स्वत: परमेश्वराकडून सांगण्यात आले होते (यिर्मया **36:1-4**). म्हणूनच, बायबल वाचणे आणि त्याचा अभ्यास करणे, हा एकमेव आणि अंतिम असा सत्याचा स्त्रोत आपल्याकडे आहे. म्हणूनच, परमेश्वराच्या तारण योजनेशी संबंधित असलेला प्रत्येक निष्कर्ष, बायबलच्या शिकवणीशी पूर्णपणे प्रामाणिक असलाच पाहिजे. अशाप्रकारे, मनुष्याने मांडलेल्या कोणत्याही निष्कर्षाची, बायबलच्या कोणत्याही श्लोकाच्या प्रकाशामध्ये योग्यप्रकारे छाननी करण्यासाठी, आपण तयार असलेच पाहिजे.

*कोणालाही तारण्यासाठी परमेश्वराला काय करावे लागते?*

आपण आपला अभ्यास अत्यंत काळजीपूर्वकपणे असाच चालू ठेवून हे निश्चित करू की मनुष्याला सामोरे जावे लागणा-या अत्यंत भयंकर अशा पेचप्रसंगावरील उपायाच्या संबंधात, बायबल काय घोषित करते. आपल्याला असे आढळेल की मनुष्याची परिस्थिती इतकी भयानक आहे की केवळ परमेश्वरच त्यातून सुटण्याचा मार्ग देऊ शकतो.

आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की संपूर्ण बायबल, हे नियमांचे पुस्तक आहे, जे परमेश्वराने स्वत: लिहिले, जे संपूर्ण मानवजातीला लागू आहे, आणि जे परमेश्वराला सुद्धा लागू आहे (स्तोत्रसंहिता **138:2**). म्हणूनच, परमेश्वराच्या नियमाच्या पुस्तकात, म्हणजे बायबलमध्ये मांडलेल्या सर्व कायदेशीर अटींची पूर्तता, मनुष्यप्राण्याच्या या भयानक समस्येवरील तोडग्याकडून होण्याची गरज आहे.

कोणाही व्यक्तीला त्याच्या जीवनात पापमुक्ति मिळण्यासाठी, प्रत्यक्ष परमेश्वराकडून केल्या गेलेल्या अत्यंत महत्वाच्या अशा तीन कृती अत्यंत गरजेच्या आहेत. तारल्या जाणा-या प्रत्येक व्यक्तीसाठी, त्या तीन कृती आवश्यक आहेत. त्याला कोणताही अपवाद नाही.

*परमेश्वराने निवडलेले*

जे लोक तारले जातील अशा सर्वांच्या वतीने, परमेश्वराकडून केली गेलेली सर्वात पहिली कृति म्हणजे, जगाच्या निर्मितीच्याही अगोदर, परमेश्वराने अशा प्रत्येक व्यक्तीला निवडले, ज्याला तो तारेल. इफिसकर **1:3-5** मध्ये आपण वाचतो :

**आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो. त्याने स्वर्गातील सर्व आध्यात्मिक आशीर्वाद देऊन, आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे. त्याप्रमाणे आपण त्याच्या समक्षतेत पवित्र व निर्दोष असावे, म्हणून त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी, आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले; त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे, आपल्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे, स्वत:चे दत्तक होण्याकरितां प्रेमाने पूर्वीच नेमिले होते.**

हे जग, व त्यात वस्ती करून राहणा-या कितीतरी अब्ज लोकांची निर्मिती करण्याची जेव्हां परमेश्वर तयारी करत होता, तेव्हा त्याने काळाच्या प्रवाहामधून पाहिले, आणि त्याला मानवतेचा असा अत्यंत दयनीय जमाव दिसला, जो पूर्णपणे त्याच्या विरोधात बंडात होता. जरी परमेश्वराने मनुष्याला अगदी परिपूर्ण प्राणी बनवले, परमेश्वराच्या प्रतिरूपात व त्याच्यासदृश बनवले, तरी बायबल याबाबत स्पष्ट आहे की परमेश्वराला हे माहीत होते की मानवप्राणी परमेश्वराविरूध्द बंड करेल, आणि त्या बंडाचा परिणाम म्हणून, सर्व मानवप्राणी आध्यात्मिकदृष्टया मृत आणि पापाने अत्यंत बाधित असे असतील. परमेश्वराला हे देखील माहीत होते की पूर्णपणे पापाने बाधित अशा मानवी मनांनी आखलेल्या वेगवेगळया योजनांचा अवलंब करून, मनुष्यप्राणी परमेश्वराशी पुन्हा सलोखा साधण्याचा खूप प्रयत्न करेल, पण सर्वस्वी परमेश्वराच्या अटींनुसार, कोणीही परमेश्वराचा शोध घेणार नाही.

*परमेश्वराला हे देखील माहीत होते की मानवी मनांनी आखलेल्या वेगवेगळया योजनांचा अवलंब करून, मनुष्यप्राणी परमेश्वराशी पुन्हा सलोखा साधण्याचा खूप प्रयत्न करेल.*

रोमकर **3:10-12** मध्ये, परमेश्वर मानवाच्या दयनीय अवस्थेचे वर्णन करतो. तिथे आपण वाचतो :

**शास्त्रात असे लिहिलेले आहे की, नीतिमान कोणी नाही, एक देखील नाही; समंजस कोणी नाही, देवाचा शोध झटून करणारा कोणी नाही; सर्व बहकले आहेत, ते सारे निरूपयोगी झाले आहेत; सत्कर्म करणारा असा कोणी नाही, एकहि नाही.**

आणि तरीही, परमेश्वराच्या विरोधातील मानवजातीच्या बंडखोरीचा सत्यानाश असूनही, परमेश्वराने असा आश्चर्यकारक निर्णय घेतला की यापैकी पुष्कळ बंडखोर लोक, त्याच्यासोबत अनंतकाळापर्यंत असतील. पण हे लोक, अनंतकाळापर्यंत त्याच्यासोबत कसे असू शकणार होते? त्यांच्या पापांची शिक्षा खूप मोठी होती. ज्यांचा, त्यांच्या पापांमुळे, कायदेशीररीत्या विध्वंस व्हायलाच हवा होता, अशा लोकांना परमेश्वर स्वत:सोबत अनंतकाळापर्यंत कसा ठेवू शकणार होता? पापांची शिक्षा प्रचंड भयानक आहे, कारण मानववंशाचे पाप हे प्रचंड भयानक आहे. ही तारणाच्या विलक्षण योजनेची अशी चकित करणारी मांडणी आहे, जी परमेश्वराने मानववंशासाठी योजली.

आणि म्हणूनच, जगाचा पाया घालण्याअगोदर, परमेश्वराने फक्त अशाच लोकांना निवडले असे नाही, की ज्यांना स्वत:साठी तारण्याची त्याची इच्छा होती (इफिसकर **1:4**), तर त्याने त्यांच्या पापांसाठीचा दंड देखील भरला. त्याच्या निवडीचा मानवाच्या इच्छेशी किंवा कोणत्याही कृतीशी अजिबात संबंध नव्हता. रोमकर **9:15** मध्ये परमेश्वर घोषित करतो :

**... कारण तो मोशेला म्हणतो, ज्या कोणावर मी दया करितो, त्याच्यावर मी दया करीन, आणि ज्या कोणावर मी करूणा करितो, त्याच्यावर मी करूणा करीन.**

परमेश्वराच्या या पहिल्या अत्यंत महत्वपूर्ण कृतीची माहिती देऊन, परमेश्वर प्रत्येक तारल्या न गेलेल्या व्यक्तीला खूप मोठी आशा देतो. परमेश्वर असा आग्रह करतो की तो लोकांमध्ये भेदभाव करणारा नाही (रोमकर **2:11**, इफिसकर **6:9**, कलस्सैकर **3:25**). कोणत्याही राष्ट्रीयत्वात किंवा लोकांच्या वर्गात, इतर कोणत्याही समुदायापेक्षा, अधिक निवडलेले लोक असण्याची शक्यता नाही. कोणत्याही पापी लोकांच्या वर्गात, निवडलेले लोक नसण्याची शक्यता, इतर कोणत्याही वर्गापेक्षा अधिक नाही.

व्यभिचारी स्त्रीच्या तारणाबाबत, बायबल योहान **8** मध्ये नोंद करते, आणि येशूच्या बाजूला वधस्तंभावर असणा-या गुन्हेगाराच्या तारणाच्या संदर्भातली नोंद सुद्धा बायबल लूक **23:9-43** मध्ये करते. म्हणूनच, आपली पापे कितीही मोठी असली, तरी जर आपल्यामध्ये परमेश्वराच्या अटींवर आधारीत तारणाची खूप खोल इच्छा असेल, तर अशी नक्कीच शक्यता आहे की आपणही कदाचित, परमेश्वराने निवडलेल्यापैकी एक असू शकतो. खूप मोठा जनसमुदाय तारला जायला हवा आहे ही वस्तुस्थिती लक्षात घेता, हे शक्य आहे की मी देखील, त्यांच्यापैकी एक असू शकतो. आणि ते खूप मोठे प्रोत्साहन आहे.

*निवडले गेलेले ख्रिस्ताकडे दिले गेले*

परमेश्वराने ज्यांना उद्धार करण्यासाठी किंवा तारण्यासाठी निवडले, त्या सर्वांना प्रभु येशू ख्रिस्ताकडे दिले गेले, जसे आपण योहान **6:37** मध्ये वाचतो :

**पिता जे मला देतो, ते सर्व माझ्याकडे येईल आणि जो माझ्याकडे येतो, त्याला मी मुळीच घालवून देणार नाही.**

तथापि, या निवडल्या गेलेल्या लोकांची येशूकडे मालकी असण्यासाठी, त्यांच्या पापांच्या संदर्भात काहीतरी केले जायला हवे होते. परमेश्वराचा अगदी योग्य नियम, जो स्वत: परमेश्वराकडून लिहिला गेला होता, तो असा हुकूम देतो की, मानवप्राण्याची निर्मिती परमेश्वराच्या प्रतिमेत झाली असल्यामुळे, प्रत्येक व्यक्तीने त्यांच्या पापांसाठीचा दंड भरलाच पाहिजे, जी परमेश्वराच्या नियमाची मागणी आहे. म्हणूनच, जरी ते परमेश्वराकडून निवडले गेले होते, आणि ख्रिस्ताकडे त्यांची अनंतकाळापर्यंत मालकी असणारे होती, तरीही जोपर्यंत त्यांच्या पापांचा दंड भरला जात नव्हता, तोपर्यंत ख्रिस्त त्यांना जवळ करू शकला नसता. परमेश्वराचा नियम असा हुकूम देतो की पापाची शिक्षा, मृत्यू ही आहे, त्यामुळेच, परिणामत: जे निवडले गेलेले होते व ख्रिस्ताकडे देण्यात आले होते, ते ख्रिस्ताच्या मालकीचे होऊ शकले नसते, कारण ते दंड भरूच  शकले नसते. ते आपल्याला अशा दुस-या नाटयमय कृतीकडे आणते, जी परमेश्वराने तारल्या गेलेल्या सर्व लोकांच्या वतीने केली.

*पाप धारण करणारा*

जेव्हा परमेश्वराने विश्वाकडे पाहिले, जे त्याने काळाच्या सुरवातीस निर्माण करण्याचे योजिले होते, तेव्हा त्याने हे पाहिले की अशी कोणीही व्यक्ति नव्हती, जिचा उपयोग, तो निवडल्या गेलेल्यांच्या वतीने, म्हणजे ज्या लोकांना देवाने निवडून, ख्रिस्ताच्या सार्वकालिक मालकी हक्कात सोपविले, त्यांच्या वतीने परमेश्वराचा क्रोध सहन करण्यासाठी करू शकला असता. यशया **63:5** आणि यहेज्केल **22:30** मध्ये असे शिकवण्यात आले आहे. तथापि, परमेश्वराच्या अगदी परिपूर्ण नियमाने असा हुकूम दिला की मृत्यूची शिक्षा, ही त्या व्यक्तीला, परमेश्वराच्या पवित्र स्वर्गामध्ये प्रवेश करण्याची परवानगी मिळण्याच्या अगोदरच, पूर्ण करण्यात यावी. परमेश्वराच्या परिपूर्ण नियमाच्या प्रत्येक पैलूची पूर्तता, परिपूर्णपणे व्हायला हवी होती.

*म्हणूनच, ख्रिस्ताला जे लोक त्याला देण्यात आलेले होते, त्यांच्यासाठी  ख्रिस्त स्वत: पापधारक बनला, आणि दया आणि प्रेमाची अशी दुसरी कोणतीही कृति नसेल.*

म्हणूनच, ख्रिस्ताला जे लोक त्याला देण्यात आलेले होते, त्यांच्यासाठी  ख्रिस्त स्वत: पापधारक बनला, आणि दया आणि प्रेमाची अशी दुसरी कोणतीही कृति नसेल. यशया **53:6** मध्ये आपण वाचतो :

**आम्ही सर्व मेंढराप्रमाणे बहकून गेलो होतो; आम्ही प्रत्येकाने आपआपला मार्ग धरिला होता; अशा आम्हां सर्वांचे पाप, परमेश्वराने त्याजवर लादिले.**

या श्लोकामधील “सर्व” हा शब्द, सर्व निवडले गेलेल्यांबद्दल बोलत आहे, म्हणजेच, असे सर्व लोक, ज्यांना परमेश्वराने तारले जाण्यासाठी, जगाच्या निर्मितीअगोदरच निवडले. त्याने जगाची निर्मिती करण्यापूर्वी, खरोखरच त्यांच्या पापांसाठीचा दंड भरला. निवडलेल्या लोकांच्या पापांचा दंड भरतांना, ख्रिस्ताला कसा छळ सोसावा लागला याचे प्रात्यक्षिक, कित्येक नाट्यमय प्रसंगांच्या (त्रिमिती ऐतिहासिक दाखल्यांच्या) मालिकेतून ख्रिस्ताने जगाला दिले. जेव्हां त्याला वधस्तंभावर खिळले गेले, तेव्हांच्या त्याच्या छळाच्या प्रात्यक्षिकामध्ये हे विशेषेकरून दिसले. उदाहरणार्थ, जेव्हां त्यानं आमच्या पापांसाठीचा दंड भरला, तेव्हां त्याला शाप व्हावे लागले असे दाखविण्यासाठी, त्याला लज्जास्पदरीत्या वधस्तंभावर लटकविण्यात आले. “जो झाडावर लटकलेला असतो, तो शाप असतो.” जेव्हां त्याचे शरीर कबरीत ठेवले गेले आणि तो रविवारी सकाळी उठला, तेव्हां ते याचे प्रात्यक्षिक होते की जगाच्या स्थापनेपूर्वी जेव्हां त्याने आमच्या पापांसाठीचा दंड भरला, तेव्हां त्याला एक सबंध व्यक्ति म्हणून, शरीर व आत्म्यामध्ये खरोखर मरावे लागले, आणि पुन्हा उठावे लागले, असे दाखविण्यासाठी की आपल्या पापांसाठीचा दंड भरणे पूर्ण झाले होते. (*देवाचे गौरव असो* हे पुस्तक पाहा).

जेव्हा ख्रिस्ताने निवडलेल्यांच्या तारणाची तजवीज केली, तेव्हा त्याने तारण्याचे ठरवलेल्या प्रत्येक व्यक्तीचे प्रत्येक पाप, त्याच्यावर ठेवले गेले. आणि त्यानंतर, पापाच्या या प्रचंड ओझ्यासोबत, तो परमेश्वराच्या, म्हणजे न्यायाधीशाच्या समोर खटल्यासाठी उभा राहिला, आणि तो दोषी आढळला. ज्यांना तारण्यासाठी तो आला होता, अशा प्रत्येकाच्या वतीने आवश्यक असणारा संपूर्ण दंड, नियमांची पूर्तता करण्यासाठी, त्याला भोगावा लागला. तो दंड म्हणजे मृत्यु होता : “. . . जो जीवात्मा पाप करितो, तोच मरतो” (यहेज्केल 18:4 ब). अशा प्रकारे, आपण असे पण वाचतो की “तू माझा जीव अधोलोकात (मृत्यूत) राहू देणार नाहीस.” हे असे दर्शविते की ख्रिस्ताने जग निर्माण करण्यापूर्वी तो मेला व मृत्यूतून पुन्हा उठला. हे सर्व कसे केले गेले, ते तो देव, म्हणजे जे काही सर्व गूढ आहे, त्यात लपलेले आहे.

म्हणूनच, आता, जगामध्ये असे पुष्कळ लोक आहेत, ज्यांना निर्मितीच्या अगोदरपासूनच, तारणासाठी निवडण्यात आले होते, आणि त्यांना, ख्रिस्ताकडे त्याची अनंतकाळची मालकी म्हणून देण्यात आले आहे. त्यांची पापे पूर्णपणे आणि अनंतकाळासाठी झाकली गेलेली आहेत, कारण त्यांच्या पापांसाठीचा दंड भरून, येशू त्यांचा तारणकर्ता बनला.

### *अजूनही तारले न गेलेले प्रचंड संख्येचे लोक, ज्यांचा परमेश्वर नाश करू शकत नाही*

आज, संपूर्ण जगभरात, तारल्या न गेलेल्या लोकांचा खूप मोठा समुदाय आहे, आणि तरीही, परमेश्वर त्यांना त्यांच्या पापांसाठी शिक्षा देऊ शकत नाही. हे कसे काय असू शकते?

ते तसे आहे कारण, या व्यक्तींना परमेश्वराने तारण्यासाठी निवडलेले आहे. म्हणूनच, हे निवडलेले लोक त्यांच्या पृथ्वीवरील सबंध आयुष्यात, जी सर्व घाणेरडी, ओंगळवाणी पापे करतील, ती सर्व त्यांचा जन्म होण्याच्या खूपच अगोदर, प्रभू येशूवर लादण्यात आली. येशू त्यांच्या बदली म्हणून किंवा त्यांच्याऐवजी

असणारा म्हणून, परमेश्वराच्या न्यायसिंहासनासमोर उभा राहिला. आणि या पापांमुळे, येशू परमेश्वराच्या नीति नियमापुढे दोषी ठरला होता.

म्हणून, अशा व्यक्ती, ज्यांच्या पापांसाठीचा दंड म्हणून परमेश्वराचा क्रोध त्याला सहन करावा लागला होता, त्यांच्या पापांचे निराकरण झाले होते. म्हणजेच, त्यांच्यापैकी प्रत्येकजणावरचा परमेश्वराचा क्रोध, जो कायद्यानुसार त्यांच्या पापांसाठीचा दंड म्हणून आवश्यक असतो, त्याचा संपूर्ण भरणा झाला होता, मग त्या पापाची गंभीरता किती पण मोठी असो. त्या व्यक्तींना नीतिमान बनवण्यात आले होते.

म्हणूनच, यापैकी प्रत्येक व्यक्ती जेव्हां या जगामध्ये जन्मली, तेव्हां ही खात्री दिली गेली होती की त्यांना त्यांच्या पापांची शिक्षा मिळणार नाही. त्याऐवजी, त्यांना याची खात्री दिली होती की त्यांच्या जीवनात, कोणत्या तरी क्षणी, परमेश्वर त्यांच्या जीवनावर, ईश्वरी वचन, बायबल लागू करेल, आणि त्यांना नवीन पुनरूत्थित आत्मा मिळेल. ते अशा कोणत्याही वेळी घडू शकते, जी परमेश्वराने निवडलेली असेल. ते अशावेळी घडू शकते, जेव्हा ते अजूनही मातेच्या उदरामध्ये असतील, किंवा ते मरण्याच्या काही मिनिटे अगोदरही ते घडू शकते. ते मानसिकदृष्टया कमकुवत असले, किंवा त्यांच्याकडे बुद्धिमान आणि प्रौढ मन असले, तरी ते होऊ शकते. या व्यक्तींच्या जन्माच्या दीर्घ काळ आधीच, त्या नीतिमान झालेल्या होत्या.

*ते अशावेळी घडू शकते, जेव्हा ते अजूनही मातेच्या उदरामध्ये असतील, किंवा ते मरण्याच्या काही मिनिटे अगोदरही ते घडू शकते.*

पण प्रत्यक्ष परमेश्वराखेरीज इतर कोणालाही हे माहीत नाही की ते कोण आहेत. त्यांना त्यांचा नवीन पुनरूत्थित आत्मा मिळाल्यानंतरच, म्हणजेच, ते तारले गेल्यानंतरच त्यांना हे समजण्यास सुरूवात होईल की परमेश्वराने त्यांना तारले होते. पण वस्तुस्थिती ही आहे की काळाच्या सुरूवातीपासूनच, ते नीतिमान केले गेले होते, कारण ख्रिस्त हा जगाच्या स्थापनेपासूनच वधलेला कोकरा आहे. (प्रकटीकरण **13:8**)

तथापि, जेव्हा ते तारले जातील, तेव्हा त्यांना हे माहीत होईल की केवळ परमेश्वराच्या सार्वभौम कृपेमध्येच, परमेश्वराने त्यांना निवडले होते, आणि त्यांच्या पापांसाठीचा दंड भरला होता, म्हणूनच ते तारले गेले. आणि जेव्हा परमेश्वराने त्यांना सार्वकालिक जीवन दिले आणि एक नवीन पुनरूत्थित आत्मा दिला, त्याक्षणी तारण हे त्यांच्या जीवनातील वास्तव बनले.

अशाप्रकारे, इतिहासातील या वेळी, जगामध्ये आज असा खूप मोठा जनसमुदाय आहे, जो अजूनही जरी पापामध्ये जगत आहे, जसे की जगातील इतरजण पापामध्ये जगत आहेत, तरी त्यांना त्यांच्या पापांसाठीचा दंड भरावा लागणार नाही.

### *निसर्गत:च मानवजात आध्यात्मिकदृष्टया मृत आहे*

आपण याविषयी जागरूक असलेच पाहिजे की तारले न गेलेले मानवप्राणी, मग त्यांना परमेश्वराने तारण्यासाठी निवडलेले असो वा नसो, ते आध्यात्मिकदृष्टया मृत आहेत. शरीर आणि आत्मा, या दोन्हींमध्ये ते पापाने बाधित आहेत. म्हणूनच आपण मत्तय **15:19** मध्ये वाचतो :

**कारण अंत:करणातूनच दुष्ट कल्पना, खून, व्यभिचार, जारकर्मे, चो-या, खोटया साक्षी, शिव्यागाळी ही निघतात.**

परमेश्वराने ज्यांना तारण्याचे योजिले आहे, ते तारले जाण्याअगोदर कसे जगत होते, याचे वर्णन परमेश्वर इफिसकर **2:3** मध्ये करतो, जिथे आपण वाचतो:

**त्या लोकात आम्हीहि सर्व, पूर्वी आपल्या दैहिक वासनांना अनुरूप असे वागलो. आपल्या देहाच्या व मनाच्या इच्छांप्रमाणे करीत होतो व स्वभावत: इतरांप्रमाणे क्रोधाची प्रजा होतो.**

*परमेश्वराच्या नीतिनियमानुसार, पापांसाठीचा दंड भरलाच पाहिजे, आणि परमेश्वराच्या नियमानुसार, विनाश हीच भरपाई आहे.*

आपण नेहमीच हे लक्षात ठेवले पाहिजे की परमेश्वराच्या नीतिनियमानुसार, पापांसाठीचा दंड भरलाच पाहिजे आणि परमेश्वराच्या नियमानुसार, विनाश हाच दंड आहे. त्या दंडाची पूर्तता झाल्यानंतरच, परमेश्वर पापी लोकांना जीवन, सार्वकालिक जीवन देऊ शकतो. आणि पापाचा दंड विनाशच असल्याकारणाने, तारल्या न गेलेल्या मनुष्याचा सार्वकालिक विनाश होईल आणि त्याचा समूळ नाश होऊन, तो पुन्हा जीवनात येणार नाहीत. परमेश्वराने या सर्व विध्वंस आणि समूळ नाशाचे वर्णन, प्रकटीकरण **20:14.15** मध्ये केले आहे, जिथे तो म्हणतो:

**तेव्हां मरण व अधोलोक ही अग्नीच्या सरोवरात टाकली गेली. अग्नीचे सरोवर हे दुसरे मरण होय. ज्या कोणाचे नांव जीवनाच्या पुस्तकात लिहिलेले सापडले नाही, तो अग्नीच्या सरोवरात टाकला गेला.**

एकदा का एखादया व्यक्तीला अग्नीच्या सरोवरात टाकण्यात आले, की त्याचा संपूर्ण नाश होतो, कायमचा नाश होतो. अशी कोणतीही शक्यता नाही की तो पुन्हा कधीही अस्तित्वात येईल. हाच "**दुस-या मृत्यूचा**" सारांश आहे.

तथापी, तो जन्माला येण्याच्या खूप आधी, निवडलेल्या सर्व लोकांच्या पापांसाठीची शिक्षा, ख्रिस्ताने भोगली होती, आणि त्यामुळे, ती व्यक्ति न्यायाच्या दृष्टिकोणातून नीतिमान झाली होती (म्हणजेच, कायद्याने, तो यापुढे पापांसाठी दोषी नाही). पण परमेश्वराने प्रत्यक्षपणे त्याच्यावर त्याचे ईश्वरी वचन लागू करण्याआधी, आणि त्याला नवीन पुनरूत्थित आत्मा देण्याआधी, तो परमेश्वराच्या क्रोधाखाली असतो. म्हणजेच, त्याला अजूनही पापांचा संसर्ग असतो, आणि तो अजूनही आध्यात्मिदृष्ट्या पूर्णपणे मृत असतो. तो अजूनही दुर्गंधियुक्त प्रेताप्रमाणे आहे (योहान **11:39**), आणि सुकलेल्या हाडांच्या दरीप्रमाणे आहे (यहेज्केल **37:1-2**). आध्यात्मिकदृष्ट्या मृत अशी जी त्याच्या संपूर्ण व्यक्तित्त्वाची अवस्था असते, ती तो बदलू शकेल, अशी कोणतीही शक्यता नाही, अगदी त्याचप्रमाणे, जसे कोणतीही शारिरीकदृष्ट्या मृत व्यक्ती, कसेही करून शारिरीकदृष्ट्या जिवंत होणे शक्य नाही.

***आपल्याला नवीन आत्मा दिला गेलाच पाहिजे***

फक्त परमेश्वरच जीवन देऊ शकतो, हे लहान मुलाच्या जन्मानेच सिद्ध होते. ते शारीरिक जीवन मिळवण्याच्या दृष्टीने, ते लहान मूल, कोणत्याही मार्गाने मदत करू शकत नाही. त्याचप्रमाणे, कोणीही अशी व्यक्ति, ज्याला तारण्यासाठी परमेश्वराने निवडलेले आहे, त्याच्या पापांची भरपाई जरी ख्रिस्ताने अगोदरच केली आहे, तरी त्या व्यक्तीला आध्यात्मिक जीवन देण्यात आलेच पाहिजे. योहान **3**, श्लोक **3** आणि **7** मध्ये, परमेश्वर या "नव्याने जन्म होण्याविषयी" बोलतो. परमेश्वर इथे जो हेल्लेणी शब्द वापरतो, त्याचा शब्दश: अर्थ, "वरून जन्माला येणे" असा आहे. शिवाय पेत्रचे पहिले पत्र **1:23** मध्ये परमेश्वर यावर जोर देतो की हा नवीन जन्म म्हणजेच, "पुन्हा जन्म घेणे" होय.

हा नविन जन्म, जो वरून मिळाला आहे, म्हणजेच स्वर्गामधून, तो केवळ जीवनाचे असे बीज नाही, जे कालांतराने तारल्या गेलेल्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वामध्ये विकसित झाले पाहिजे. तो तात्काळ, पूर्णपणे नवीन कोरा आत्मा किंवा आत्म्याचा अर्क आहे. ते बीज स्वत: ख्रिस्त आहे, जो तारल्या गेलेल्या व्यक्तीमध्ये वास करतो (योहान **14:23**). परमेश्वर आपल्याला अशी खात्री देतो की हा नवीन आत्मा आहे, आणि एखाद्या जुन्या वस्त्राला, फाटलेल्या किंवा दुभागलेल्या जागी, एका नवीन कापडाच्या तुकड्याचे ठिगळ लावण्याची उपमा तो देतो (मत्तय **9:16**). ते पूर्णपणे नवीन वस्त्र बनले पाहिजे. त्याचप्रमाणे, जुन्या बाटल्यांमध्ये नवी मदिरा भरण्याचा प्रयत्न करण्याची उपमा तो देतो. नवी मदिरा, ही नव्या बाटलीमध्येच भरली गेली पाहिजे (मत्तय **9:17**). यावर बायबलच्या इतर उता-यांमध्ये जोर देण्यात आला आहे, जसे की **2** करिंथकर **5:17**, जिथे आपण वाचतो:

**म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल, तर तो नवी उत्पत्ति आहे; जुने ते होऊन गेले; पाहा, ते नवे झाले आहे.**

त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा भाग, जो तात्काळ नवीन प्राणी बनला, तो नवीन आत्मा आहे (नवीन पुनरूत्थित आत्मा), जो परमेश्वराने त्याच्या जीवनावर ईश्वरी वचन लागू करण्याच्या क्षणी त्याला दिला (यहेज्केल **36:26**). त्याचप्रमाणे, काळाच्या शेवटी, या निवडल्या गेलेल्या व्यक्तीला, नवीन पुनरूत्थित शरीर देण्यात येईल, **क्षणात, निमिषात, शेवटला कर्णा वाजेल तेव्हां; कारण कर्णा वाजेल, मेलेले ते अविनाशी असे उठविले जातील, आणि आपण बदलून जाऊ.** (**1** करिंथकर **15:52**).

अशाप्रकारे, आध्यात्मिकदृष्टया जिवंत होण्याच्या, म्हणजेच तारले जाण्याच्या बाबतीतील मानवप्राण्याच्या संपूर्ण असमर्थतेतेचे वर्णन करणा-या लक्षणीय बोधकथा, बायबलमध्ये देण्यात आल्या आहेत. यहेज्केल **37** मध्ये ते मांडण्यात आले आहे, जिथे परमेश्वर, तारल्या न गेलेल्या व्यक्तींचं प्रतीक म्हणून, सुकलेल्या हाडांबद्दल बोलतो, आणि तरीही, परमेश्वर हे दाखवून देतो की जेव्हा परमेश्वर कार्य करतो, तेव्हा ती सुकलेली हाडे जिवंत केली जातात. योहान **11** मध्ये दुसरी एक ऐतिहासिक बोधकथा नोंदवली आहे, जिथे आपण असे वाचतो की लाजर नावाच्या व्यक्तीचे दुर्गंधीयुक्त सडलेले प्रेत, प्रभू येशूच्या आज्ञेने जिवंत झाले. त्याचप्रमाणे, निसर्गत:च आध्यात्मिदृष्टया मृत अशा मानवप्राण्याला सार्वकालिक आध्यात्मिक जीवन देऊ शकेल, असा एकमेव परमेश्वरच आहे.

*आपण याविषयी खात्री बाळगू शकतो की जगामध्ये तारले न गेलेले लोक, दोन प्रकारचे आहेत.*

आपण याविषयी खात्री बाळगू शकतो की जगामध्ये तारले न गेलेले लोक, दोन प्रकारचे आहेत. तिथे अध्यात्मिकदृष्टया मृत असे लोक आहेत, जे निवडले गेले होते, आणि जे कायदेशीरपणे परमेश्वराच्या क्रोधाखाली राहिलेले नाहीत, आणि असे लोक आहेत, जे निवडले गेलेल्यांमध्ये समाविष्ट नाहीत, आणि म्हणून, त्यांना सार्वकालिक जीवन, नक्कीच कधीच असणार नाही, आणि ते परमेश्वराचा अंतिम क्रोध भोगतील. दोन्हीपैकी कोणत्याही बाबतीत, जरी ते आध्यात्मिकदृष्टया मृत आहेत, तरीही परमेश्वराचा नियम, काही अंशाने त्यांच्या हृदयांवर लिहिला गेला आहे. अशाप्रकारे, त्यांना हे माहीत आहे आणि त्यांची सदसद्विवेकबुध्दी याची साक्षीदार असेल की त्यांनी परमेश्वराच्या नियमांचे पालन करावे.

याशिवाय, त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एकात्मिक भाग म्हणजे, त्यांचा आत्मा किंवा आत्म्याचा अर्क आहे, ज्यामध्ये परमेश्वर त्यांना असे मार्गदर्शन करू शकतो की त्यांच्याकडे परमेश्वराच्या नियमांचे पालन करण्याची तीव्र इच्छा असावी, किंवा सैतान, मोठया दुष्टपणाकडे त्यांना मार्गनिर्देश करू शकतो. याशिवाय जन्मत:च, त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्वामध्ये दुष्टपणा आहे, आध्यात्मिक मृतपणा आहे, जो त्यांच्या विचारात, शब्दात आणि कृतीत व्यक्त करण्यासाठी, सैतानाच्या मदतीची गरज नाही.

### *निवडल्या गेलेल्याच्या ताारणाचे वास्तव*

ज्याप्रमाणे अगोदरच उल्लेख केला आहे, त्याप्रमाणे परमेश्वराने करणे आवश्यक असणारे, आणखी एक मोठे कार्य आहे. तारल्या जाण्यासाठी निवडल्या गेलेल्या व्यक्ती, या पापी मानव आहेत. परमेश्वराच्या त्यांच्याविषयी असणा-या योजनांबद्दल, त्यांना कांहीच माहीत नाही. परमेश्वराच्या ताारणयोजनेची त्यांच्यासाठी असणारी वास्तविकता, त्यांच्या जीवनांवर लागू केली गेली पाहिजे.

तारणाच्या अगोदर, संपूर्ण मानववंशातील कोणालाही हे माहीत नसते की तो तारला जाण्यासाठी निवडला गेला होता किंवा नाही. परमेश्वराने आपल्याला तारल्यानंतरच आपल्याला हे ओळखता येते की आपण परमेश्वराच्या तारणयोजनेमध्ये समाविष्ट होतो याचे एकमेव कारण म्हणजे, परमेश्वराने त्याच्या सार्वभौम संतोषात, आपल्याला या जगाची निर्मिती करण्याच्याही अगोदरच निवडले होते. जे तारले जाणार नाहीत अशा बाकीच्या मानववंशाप्रमाणे, तारल्या गेलेल्या लोकांकडेही मूलत: शरीर आणि आत्मा आहे. त्यांचे शरीर, हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचा भाग आहे, जे ते मेल्यानंतर पुरले जाते. तारल्या गेलेल्या व्यक्तींच्याबाबतीत, त्यांच्या शारिरीक मृत्यूच्या क्षणी, आत्मा किंवा आत्म्याचा अर्क, (जो व्यक्तिमत्वाचा तितकाच खरा भाग आहे, जितके त्याचे शरीर), तो त्याचे शरीर सोडून देतो आणि स्वर्गामध्ये नेला जातो, जिथे तो राहतो आणि ख्रिस्तासोबत राज्य करतो. त्यानंतर, जगाच्या अंताच्यावेळी जेव्हा ख्रिस्त परत येईल, तेव्हा तो त्या शरीराचे पुनरूत्थान करेल (**2** करींथकर **5:8**, **1** थेस्सलनीकाकर **4**).

तथापि, तारणाच्या अगोदर, निवडल्या गेलेल्या व्यक्ती या जगामध्ये तशाप्रकारेच जगतात, ज्याप्रकारे तारणासाठी निवडली न गेलेली कोणतीही व्यक्ती जगते.

इफिसकर **2:1-3** मध्ये आपण निवडले गेलेल्यांविषयी वाचतो :

**तुम्ही आपले अपराध व आपली पातके, ह्यामुळे मृत झालेले होतां; त्या पातकांमध्ये तुम्ही पूर्वी चालत होतां, अर्थात ह्या जगाच्या रहाटीप्रमाणे, अंतरिक्षातील राज्याचा अधिपति, म्हणजे आज्ञा मोडणा-या लोकात आता कार्य करणा-या आत्म्याचा अधिपति, ह्याच्या धोरणांप्रमाणे चालत होतां. त्या लोकात, आम्हीहि सर्व, पूर्वी आपल्या दैहिक वासनांना अनुरूप असे वागलो, आपल्या देहाच्या व मनाच्या इच्छांप्रमाणे करीत होतो व स्वभावत: इतरांप्रमाणे क्रोधाची प्रजा होतो.**

तो तारला जाण्याअगोदर, त्याच्या शरीरामध्ये तो पापाची वासना करतो, आणि त्याच्या आत्म्यामध्येही, तो पापाची वासना करतो. तो अशा इतर कोणत्याही व्यक्तीप्रमाणे आध्यात्मिकदृष्ट्या मृत आहे, जो तारला जाणार नाही.

हे आपल्याला परमेश्वराच्या भव्य अशा तिस-या कृतीकडे आणते, जी तो अशा लोकांच्या वतीने करतो, ज्यांना तारण्यासाठी ख्रिस्त आला.

***नवीन जन्माचा चमत्कार***

परमेश्वराकडून केली जाणारी तिसरी कृती, जी तो अशा व्यक्तींच्या वतीने करतो, जे ख्रिस्ताला त्याची सार्वकालिक मालकी म्हणून देण्यात आले होते, ती म्हणजे, परमेश्वर निवडलेल्या व्यक्तीला एक नवा कोरा पुनरूत्थित आत्मा देण्याचा चमत्कार करतो. येशू याविषयी योहान **3**, श्लोक **5** मध्ये बोलतो, जिथे आपण वाचतो :

**येशूने उत्तर दिले की मी तुम्हांला खचित सांगतो, पाण्यापासून व आत्म्यापासून जन्म घेतल्यावांचून, कोणीहि देवाच्या राज्यात प्रवेश करू शकत नाही.**

त्याच्या आधी, योहान **3**, श्लोक **3** मध्ये आपण वाचतो :

**... मी तुम्हांला खचित सांगतो, नव्याने जन्मल्यावांचून, कोणालाहि देवाचे राज्य पााहतां येत नाही.**

पाण्यापासून आणि आत्म्यापासून जन्म होणे म्हणजेच सुवार्तेपासून (पाणी), परमेश्वर पवित्र आत्म्याच्या कृतीने जन्म होणे होय. (योहान **4:10-15**, योहान **7:38**) परमेश्वर या कृतीविषयी रोमकर **10**, श्लोक **17** मध्ये बोलतो, जिथे तो म्हणतो:

**ह्याप्रमाणे विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाच्या द्वारे होते.**

*परमेश्वराच्या दैवी व्यवस्थेमध्ये, त्याने असे वातावरण स्थापित केले, ज्यामध्ये तो लोकांना तारतो.*

परमेश्वराच्या दैवी व्यवस्थेमध्ये, त्याने असे वातावरण स्थापित केले, ज्यामध्ये तो लोकांना तारतो. ते वातावरण म्हणजेच बायबल, जे एकमेव ईश्वरी वचन आहे. म्हणूनच, जगातील कोणासाठीही तारले जाणे तोपर्यंत अशक्य आहे, जोपर्यंत तो परमेश्वराकडून उपदेश ऐकत नाही, आणि एकमेव ईश्वरी

वचन म्हणजे बायबलच होय. म्हणूनच, संपूर्ण मंडळीयुगभरात, परमेश्वराने स्थानिक सभांना अशी आज्ञा दिली की त्यांनी जगभर सुवार्ता पाठवावी. म्हणूनच आपल्या काळात, आपण उत्साहाने संपूर्ण जगभर सुवार्ता पाठविणे चालूच ठेवले आहे, पण आता, आपण मंडळी या संघटनेऐवजी, एक व्यक्ति म्हणून असे करत आहोत. आपण व्यक्तिश: ख्रिस्ताचे दूत म्हणून सेवा करतो.

आपण या वस्तुस्थितीबाबत जागरूक असावे की आज, चर्चमध्ये कोणीही तारला जाऊ शकत नाही. परमेश्वराच्या वेळापत्रकानुसार, मंडळीयुगाचा अंत झाला आहे, आणि पवित्र आत्म्याने मंडळींचा त्याग केला आहे. तथापि, बायबल आपल्याला अशी सूचना देते की मंडळींच्या बाहेर, ख-या श्रद्धाळूंचा खूप मोठा हंगाम, परमेश्वराच्या राज्यात आणला जात आहे. (फॅमिली रेडिओशी संपर्क साधून, *मंडळीयुगाचा अंत आणि त्यानंतर* आणि *गहू व निदण,* या मोफत पुस्तकांची मागणी करण्याचे तुम्हाला आमंत्रण देण्यात येत आहे.)

तारणाचे सर्व कार्य परमेश्वर करतो, आणि म्हणूनच, एखाद्या निवडलेल्या व्यक्तीला, तो त्या व्यक्तीच्या जीवनात कोणत्याही वेळी, तारू शकतो. केवळ हेच आवश्यक आहे की ती व्यक्ति, बायबल ऐकत असली पाहिजे. तारणाच्या क्षणी, परमेश्वर त्या व्यक्तीला आध्यात्मिक कान आणि एक नवीन सार्व कालिक आत्मा देतो. अशाप्रकारे, याआधी आपण नोंद केल्याप्रमाणे, एखादी प्रौढ व्यक्ति जेवढ्या सहजपणे तारली जाऊ शकते, तेवढ्याच सहजपणे एखादे लहान मूल देखील तारले जाऊ शकते. महाविद्यालयातील एखादा प्राध्यापक जितक्या सहजपणे तारला जाऊ शकेल, तितक्याच सहजपणे एखादी दोन वर्षाचे मन असणारी व्यक्तीदेखील तारली जाऊ शकते.

निवडल्या गेलेल्या व्यक्तीच्या पापांसाठीचा दंड, ख्रिस्ताने जेव्हां जगाच्या निर्मितीच्या आधी भरला, तेव्हां त्याने कसा छळ सोसला याचं प्रात्यक्षिक, ख्रिस्ताने वधस्तंभावर दिले. त्यामुळे जे काही करायचे राहिले आहे ते असे की, केवळ परमेश्वरालाच माहीत असलेल्या एका योग्य वेळी, परमेश्वर त्या व्यक्तीला, खरोखरच तारणाची सुंदर वस्तुस्थिती अनुभवायला लावेल.

आपल्या अभ्यासामध्ये आतापर्यंत, आपण हे शिकण्यास सुरूवात केली आहे की देवाच्या कायद्यानुसार, म्हणजे बायबलनुसार, परमेश्वराने काय करणे आवश्यक आहे. आपल्या मनामध्ये अजूनही असा प्रश्न घोळत असेल की तारले जाण्यासाठी मी काय करू शकतो? जे तारणासाठी निवडले गेले होते, त्यांच्यामध्ये माझा समावेश असेल, याची खातरजमा करून घेण्याचा एखादा मार्ग आहे का? आपल्या अभ्यासामध्ये, आपण या अत्यंत गंभीर प्रश्नाबद्दल बोलू.

## *आध्यात्मिक कार्याची बायबलची व्याख्या*

आपल्या अभ्यासातील या टप्प्यावर, आपण एक अशी संकल्पना सादर करावी, जिचा तारले जाण्याच्या विषयावर मोठा पगडा आहे. तिचा संबंध, बायबलच्या आध्यात्मिक “कृत्याच्या” व्याख्येशी आहे. बायबल पुन्हा पुन्हा याचा आग्रह धरते की तारण हे आपण करत असलेल्या कोणत्याही कृत्याचा परिणाम असू शकत नाही (इफिसकर **2:8-9**, गलतीकर **2:16**). म्हणूनच, परमेश्वर आध्यात्मिक कृत्याची व्याख्या कशी करतो, हे आपण जाणून घेतले पाहिजे.

योना **3:10** मध्ये परमेश्वर घोषित करतो :

**देवाने त्यांचे वर्तन पाहिले, म्हणजे अर्थात ते आपल्या कुमार्गापासून वळले आहेत, हे पाहिले; तेव्हां त्यांच्यावर अरिष्ट आणीन असे जे तो म्हणाला होता, त्याविषयी तो अनुताप पावला, आणि त्याने त्यांजवर ते आणिले नाही.**

मत्तय **7:22** मध्ये, परमेश्वर जाहीर करतो :

**त्या दिवशी पुष्कळ जण मला म्हणतील, प्रभो, प्रभो, आम्ही तुझ्या नांवाने भुते घालविली, व तुझ्या नांवाने पुष्कळ महत्कृत्ये केली नाहीत काय?**

*जेव्हां आपण परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करतो, तेव्हां आपण असे काम करत असतो, जे परमेश्वराला संतोषकारक असते.*

या आणि बायबलच्या इतर श्लोकांमधून, आपण हे शिकतो की जेव्हां आपण परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करतो, तेव्हां आपण असे काम करत असतो, जे परमेश्वराला संतोषकारक असते. जेव्हा आपण परमेश्वराच्या आज्ञांचे उल्लंघन करतो, तेव्हा आपण असे काम करतो, जे परमेश्वराला नाखूष करते. उदाहरणार्थ, बायबल सर्व मानवप्राण्यांना ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याची आज्ञा देते. विश्वास ठेवणे हे आपण करत असलेले काम आहे का? खरोखरच ते एक काम आहे. “विश्वास ठेवणे” हे “विश्वास” या नामाचे क्रियापद आहे. **1** थेस्सलनिकाकर **1:3** आणि **2** थेस्सलनिकाकर **1:11** मध्ये बायबल अतिशय सरळपणे “विश्वासाच्या कामाविषयी” बोलते.

**1** थेस्सलनीकाकर, अध्याय **1**, श्लोक **3** आपल्याला सांगतो :

**आपल्या देवपित्यासमोर तुमचे <u>विश्वासाने केलेले काम</u>, प्रीतीने केलेले श्रम, व आपल्या प्रभु येशू ख्रिस्तावरच्या आशेमुळे धरलेला धीर, ह्यांचे आम्ही निरंतर स्मरण करितो.**

आणि **2** थेस्सलनीकाकर, अध्याय **1**, श्लोक **11** मध्ये आपण वाचतो :

**ह्याकरिता तर आम्ही तुम्हांसाठी सर्वदा अशी प्रार्थना करितो की, आपल्या देवाने तुम्हांस झालेल्या ह्या पाचारणाला योग्य असे मानावे आणि चांगुलपणाचा प्रत्येक मनोदय व <u>विश्वासाचे कार्य,</u> सामर्थ्याने पूर्ण करावे.**

लक्षणीयरीत्या, परमेश्वर विश्वासाने केलेले काम आणि प्रीतीने केलेले श्रम, याविषयी बोलतो. म्हणूनच, आपण हे स्पष्टपणे समजू शकतो की विश्वासाचे आणि प्रीतीचे श्रम, ही आपण करीत असलेली कामे आहेत. त्याचप्रमाणे, बायबलमधील कोणत्याही आज्ञेचे पालन हे देखील असे काम आहे, जे करण्याची आपल्याला आज्ञा देण्यात आली आहे. म्हणूनच, आपण आपल्या मनामध्ये हे दृढपणे ठेवले पाहिजे की जेव्हा परमेश्वर आपल्याला प्रार्थना करणे, परमेश्वराचा शोध घेणे, तारणे, परमेश्वराची याचना करणे,

परमेश्वराची वाट पाहणे, बायबल वाचणे व त्याचा अभ्यास करणे इत्यादि आज्ञा देतो, तेव्हा त्या प्रत्येक आज्ञेमध्ये, परमेश्वर आपल्याला काम करण्याची आज्ञा देत आहे. म्हणूनच परमेश्वराच्या आज्ञा पाळणे म्हणजे "प्रीति," अशी व्याख्या परमेश्वर करतो. जेव्हा आपण परमेश्वर आणि आपल्या शेजा-यांवर प्रीति करतो, तेव्हा आपण आध्यात्मिक काम करत असतो. बायबलमधील तारले जाण्याशी संबंधित असलेल्या श्लोकांचा जेव्हा आपण अगदी काळजीपूर्वक अभ्यास करतो, तेव्हा आपल्याला समजते की, कोणत्याही आज्ञेचे पालन करणे, म्हणजे आपण करीत असलेले काम असते, आणि हे एक असे अत्यंत महत्वाचे तत्व आहे, जे आपण अजिबात विसरता कामा नये.

***आपल्या तारणासाठी आवश्यक असणारे सर्व काम ख्रिस्ताने केले.***

आणखी एक अत्यंत महत्वाचे तत्व आहे, जे आपण नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. ते म्हणजे, एखाद्या व्यक्तीला तारण्यासाठी आवश्यक असणारे काम, केवळ परमेश्वरच करू शकतो. परमेश्वराने ज्यांना तारण्याचे योजिले त्यांची निवड, ज्यांना तारण्यासाठी ख्रिस्त आला, त्यांच्यावतीने ख्रिस्ताने भरलेला दंड, ज्यांना परमेश्वर तारतो त्यांना नविन आत्मा देणे, ही सर्व अशी कामे आहेत, जी केवळ परमेश्वरच करू शकतो.

*एखाद्या व्यक्तीला तारण्यासाठी आवश्यक असणारे काम, केवळ परमेश्वरच करू शकतो.*

वास्तविकत:, ही निवड कोणताही मानव अस्तित्वात येण्यापूर्वीच केली गेली होती. शिवाय, निवडल्या गेलेल्यांच्या पापांसाठीचा दंडाचा भरणा, जगाच्या स्थापनेपूर्वीच पूर्ण केला गेला होता (प्रकटीकरण **13:8**). अशाप्रकारे, तारण मिळवण्यासाठी, काही अंशानेदेखील हातभार लावण्यासाठी, कोणीही मनुष्य कांही करू शकेल, ही गोष्ट सर्वस्वी अशक्य आहे.

***तर मग परमेश्वर आपल्याला या आज्ञा का देतो?***

विश्वास ठेवणे, प्रार्थना करणे, इत्यादि आज्ञा परमेश्वर आपल्याला देतो, पण या आज्ञांचे पालन करण्यास, सुरूवात तरी आपण कशी करू शकतो? आपण आध्यात्मिकदृष्टया मृत आहोत. तारल्या न गेलेल्या लोकांना, परमेश्वर सुकलेल्या हाडांची दरी (यहेज्केल **37:1-14**), आणि दुर्गंधीयुक्त प्रेत, असे म्हणतो (योहान **11:39**). आणि रोमकर **3**, श्लोक **10-12** मध्ये परमेश्वर सांगतो :

**शास्त्रात असे लिहिलेले आहे की नीतिमान कोणी नाही, एक देखील नाही; समंजस कोणी नाही, देवाचा झटून शोध करणारा कोणी नाही; सर्व बहकले आहेत, ते सारे निरूपयोगी झाले आहेत; सत्कर्म करणारा असा कोणी नाही, एकहि नाही.**

खरोखर, बायबल तारल्या न गेलेल्या मानवप्राण्याच्या पूर्ण मृतपणावर स्पष्टपणे जोर देते. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की परमेश्वर मनुष्यामध्ये वास करत नाही, आणि तो परमेश्वराकडून आध्यात्मिकरीत्या ऊर्जित केलेला नाही, या वस्तुस्थितीच्या दृष्टिकोणातून पाहिलं, तर आदामाच्या पतनापासून सुरूवात होऊन, मानवप्राणी आध्यात्मिदृष्टया मृत आहे. आणि मानवाच्या पापांमुळे, तो

परमेश्वराच्या क्रोधाखाली आहे, आणि त्याचा अर्थ असा आहे की जगाच्या अंताच्यावेळी तो पूर्णपणे नष्ट होईल आणि पुन्हा जीवन जगणार नाही. याअगोदरच आपण पाहिल्याप्रमाणे, त्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्वामध्ये, तो पापाने फारच बाधित झालेला आहे.

तथापि जरी तो आध्यात्मिकदृष्टया मृत आहे, तरी तो परमेश्वराच्या नियमांचं थोडंसं पालन अजूनही करू शकतो. अशाप्रकारे, काही अंशाने तो ख्रिस्तावर विश्वास ठेवू शकतो, तो प्रार्थना करू शकतो, परमेश्वराचा शोध घेऊ शकतो, आणि तो काही पापांपासून वळू शकतो, जसे की मद्यपान करणे, खोटे बोलणे, इत्यादि. निदान दोन कारणांमुळे तो हे करू शकतो.

पहिले कारण हे आहे की त्याच्यामध्ये अजूनही सदसद्विवेकबुद्धि आहे, जी त्याला पापांसाठी दोषी ठरवू शकते (रोमकर **2:14-15**, योहान **8:9**). हे असे आहे कारण मानवाची निर्मिती, परमेश्वराच्या प्रतिमेमध्ये झाली आहे, आणि जरी तो परमेश्वरापासून पूर्णपणे दुरावला आहे, तरी काही अंशाने, परमेश्वराचा नियम, अजूनही त्याच्या व्यक्तिमत्वामध्ये आहे.

दुसरे कारण हे आहे की जरी एखाद्या व्यक्तीला तारण्याचा परमेश्वराचा हेतु नसला, तरी परमेश्वर, त्याच्या इच्छेची अंमलबजावणी, त्या तारल्या न गेलेल्या व्यक्तीच्या जीवनामध्ये करू शकतो. हे तत्व दुष्ट बलामाच्या जीवनात (गणना **22:12-13**), आणि इस्राएलाचा पहिला राजा, शौला, याच्या जीवनात प्रत्यक्षात आल्याचे आपण पाहतो (**1** शमुवेल **10:9-12**).

शिवाय, जर परमेश्वराने त्या तारल्या न गेलेल्या व्यक्तीला निवडले असेल, आणि त्याच्या सर्व पापांसाठीचा दंड अगोदरच भरला असेल, तर परमेश्वराने त्या व्यक्तीला एक नवीन हृदय, एक नवीन पुनरूत्थित आत्मा देण्याअगोदर, परमेश्वर पिता, कदाचित त्याला आकर्षित करीत असेल (योहान **6:44**).

तथापि, जरी ती व्यक्ती परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करण्याचा पुष्कळ प्रयत्न करत असेल, तरी तिला हे अजिबात माहीत असू शकत नाही की वरीलपैकी कोणते कारण, त्याला परमेश्वराच्या आज्ञा पाळण्याचा प्रयत्न करण्यासाठी भाग पाडत आहे. म्हणजेच, त्याच्याकडे कोणताही पुरावा नाही किंवा एका क्षणासाठीही त्याने असा विचार करू नये की त्याच्या आज्ञाधारकपणाचा परिपाक, खात्रीने तारणात होईल.

## ***परमेश्वराचे मानवजातीशी असणारे गूढ नाते***

शिवाय, मानववंशातील प्रत्येक प्राणी आणि परमेश्वर यांच्यामध्ये एक गूढ, चैतन्यशील असे व्यक्तिगत नाते अस्तित्वात आहे. परमेश्वराने तारणासाठी ज्यांना निवडले आहे असे लोक आणि परमेश्वर, केवळ यांच्याबाबतीतच ते सत्य आहे असे नाही, तर परमेश्वर आणि त्याने न निवडलेले, ज्यामुळे त्यांचा नक्कीच विनाश होणार आहे, अशांच्याबाबतीतही ते सत्य आहे.

आपण हे या वस्तुस्थितीमध्ये पाहतो की यरूशलेमसाठी येशूने अश्रू ढाळले (लूक **19:41**), जरी बायबलमध्ये दिला गेलेला पुरावा आपल्याला हे सांगतो की त्याच्या दृष्टीमध्ये असलेल्या यरूशलेमपैकी, बरेचसे नष्ट केले जाईल. आपण हे या वस्तुस्थितीमध्ये पाहतो की बायबल असे घोषित करते की परमेश्वराला दुष्टांच्या मृत्यूने आनंद होत नाही (यहेज्केल **33:11**). आपण हे या वस्तुस्थितीमध्ये पाहतो की काही अंशाने, सर्व मानवप्राण्यांच्या हृदयावर परमेश्वराचा नियम लिहिला गेला आहे (रोमकर **2:15**).

आपण हे या वस्तुस्थितीमध्ये पाहतो की परमेश्वराच्या नियमानुसार हत्या करणारा मेलाच पाहिजे, कारण त्याने अशा मानवप्राण्याची हत्या केली आहे, जो परमेश्वराच्या रूपामध्ये व प्रतिमेमध्ये निर्माण केला गेलेला होता (उत्पत्ति **9:6**). आपण हे परमेश्वराच्या या आज्ञेमध्ये पाहतो की आपण, आपल्या शत्रूवरही प्रेम केले पाहिजे. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की कोणतीही तारली न गेलेली व्यक्ति, ही परमेश्वराची शत्रू आहे, आणि तरीही, अशी एकही व्यक्ती नाही, जिच्यावर आपण प्रेम करू नये. मत्तय **5:22** मध्ये परमेश्वराने दिलेल्या धोक्याच्या सूचनेमध्ये आपण हे पाहतो की आपण कोणालाही "राका," म्हणजे निरूपयोगी किंवा मूर्ख म्हणू नये. आपण कोणत्याही व्यक्तीकडे, तारणाची आशा नसलेला म्हणून पाहू नये.

वरील पुराव्यावरून, आपण कदाचित असा निष्कर्ष काढू की जरी मनुष्यप्राणी त्याच्या पापांमुळे आध्यात्मिकदृष्टया मृत बनला, आणि त्याला परमेश्वराकडून ऊर्जित केले गेले नाही किंवा परमेश्वराने त्याच्यामध्ये वास केला नाही, तरी तो परमेश्वराकडून बाजूला केला गेलेला किंवा दूर केला गेलेला नाही. त्याच्या आध्यात्मिकदृष्टया मृत, तारल्या न गेलेल्या अवस्थेमध्ये, त्याच्याकडे अजूनही अशी पूर्ण जबाबदारी आहे की त्याने परमेश्वराची आज्ञा पाळावी, आणि अर्थातच, त्याच्याकडे अजूनही परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करण्याची थोडी क्षमता आहे. तो परमेश्वरापासून पूर्णपणे वेगळा केला जाई ल, असे केवळ शेवटच्या दिवशीच घडेल (यशया **66:24**, यीर्मय्या **23:39-40, 24:10**).

अशाप्रकारे, प्रत्येक मानवप्राणी परमेश्वरावर विश्वास ठेवेल, अशी परमेश्वराची अपेक्षा असू शकते, ज्यामुळे ते बायबलच्या आज्ञांचे, काही अंशाने, पालन करण्याचा प्रयत्न करतील. आपल्या अभ्यासामध्ये याअगोदर पाहिल्याप्रमाणे, हा आज्ञाधारकपणा, त्या व्यक्तीच्या जीवनामध्ये, प्रत्यक्ष परमेश्वराकडूनच कार्य केले जाऊन वाढवला जाऊ शकतो, ज्याप्रमाणे दुष्ट बलामाची स्थिती होती (गणना अध्याय **22** आणि **23**) किंवा परमेश्वराने निवडलेल्या, पण ज्याला अजूनही नवीन शाश्वत आत्मा देण्यात आलेला नाही, अशा एखाद्या मनुष्याच्या जीवनामध्ये कार्य करत असलेला, तो परमेश्वरच असू शकतो, (योहान **6: 44**).

*परमेश्वराकडे, त्याच्या नियमांचे पालन करण्याची आज्ञा, मानवप्राण्याला देण्याचा कायदेशीर हक्क आहे.*

आपण हे लक्षात ठेवलेच पाहिजे की परमेश्वराकडे, त्याच्या नियमांचे पालन करण्याची आज्ञा, मानवप्राण्याला देण्याचा कायदेशीर हक्क आहे. प्रत्यक्ष परमेश्वराप्रमाणेच, मनुष्यप्राण्याला, परमेश्वराचे नियमांचे पुस्तक, म्हणजे बायबल, पूर्णपणे लागू आहे, कारण मनुष्याची निर्मिती, ही परमेश्वराच्या रूपात आणि प्रतिमेत झालेली होती. म्हणूनच, आपण हे समजून घेतले पाहिजे की तारली न गेलेली व्यक्ति, जी

कदाचित तारणासाठी निवडली गेली असेल किंवा नसेलही, तिच्या जीवनामध्येही, ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याचे काम दिसू शकते. जसा तो ख्रिस्तावर विश्वास ठेवतो, तसा तो लूक **13**, श्लोक **24** मधील बायबलच्या आज्ञेचे पालन करण्याचा कसून प्रयत्न करेल, जिथे परमेश्वर म्हणतो :

**तो त्यांना म्हणाला, अरूंद दरवाजाने आत जाण्याचा नेटाने यत्न करा; कारण मी तुम्हांस सांगतो, पुष्कळ लोक आत जाण्यास पाहतील, परंतु त्यांना जाता येणार नाही.**

आणि इब्री **4**, श्लोक **11** मध्ये आपण वाचतो :

**म्हणून त्या विसाव्यात येण्याचा, आपण होईल तितका प्रयत्न करावा. ह्यासाठी की, त्यांच्या अवज्ञेच्या उदाहरणाप्रमाणे, कोणी पतित होऊ नये.**

तथापि, पुन्हा, यावरही जोर देण्यात यावा की विश्वास ठेवण्याच्या कामापैकी <u>कोणतेही</u> काम, तो तारला जाईल, अशी खात्री देऊ शकत नाही, किंवा ते त्याच्या तारणाला हातभार लावू शकत नाही, कारण तारणासाठी आवश्यक असणारे <u>सर्व</u> काम, पूर्णपणे, ख्रिस्ताकडून, त्या व्यक्तीच्या जन्माच्या कितीतरी काळ अगोदरच केले गेले होते.

*विश्वास ठेवण्याच्या कामापैकी <u>कोणतेही</u> काम, तो तारला जाईल अशी खात्री देऊ शकत नाही, किंवा ते त्याच्या तारणाला हातभार लावू शकत नाही, कारण तारणासाठी आवश्यक असणारे <u>सर्व</u> काम, पूर्णपणे, ख्रिस्ताकडून, त्या व्यक्तीच्या जन्माच्या कितीतरी काळ अगोदरच केले गेले होते.*

आश्चर्यकारकरीत्या, जर तारली न गेलेली व्यक्ति, परमेश्वराच्या इच्छेनुसार वागण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करेल, तर दोन महान आशीर्वाद पूर्णत्वास जातात.

पहिला आशीर्वाद असा आहे की जशी तारली न गेलेली व्यक्ति, परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करण्याचा प्रयत्न करेल, तसे बायबलचा अधिकाधिक चांगल्यारितीने परिचय होणे, त्याच्यासाठी आवश्यक असेल. हे त्याचे आयुष्य तेव्हा समृद्ध करेल, जेव्हा तो भयानक पापे, पापांसाठीचा दंड, परमेश्वराचा न्याय आणि परमेश्वराची करूणा, यासारखी महत्वाची सत्ये शिकण्यास सुरूवात करेल.

दुसरे म्हणजे, हे त्याला ईश्वरी वचन ऐकण्याच्या वातावरणामध्ये नेऊन ठेवेल. अशाप्रकारे, जर परमेश्वर त्याला तारण्याचे योजीत असेल, तर तो अशा अगदी योग्य वातावरणात आहे, जिथे परमेश्वर त्याच्या हृदयावर परमेश्वराचा नियम लागू करू शकेल.

### *परमेश्वर मानवजातीची परीक्षा घेतो*

लोकांनी विश्वास ठेवण्याचे काम करावे अशी आज्ञा परमेश्वर का देतो, याचे तिसरे कारण आहे. हे त्या व्यक्तीची चाचणी घेते किंवा परीक्षा घेते. तो असा विचार करण्यास सुरूवात करेल का, की परमेश्वराच्या आज्ञा पाळण्याचे त्याचे प्रयत्न, हे त्याच्या तारणासाठी मदत करीत आहेत?

परमेश्वर सतत मनुष्याची परीक्षा घेत असतो. एदेनाच्या बागेत, आदाम आणि हव्वाची परीक्षा घेण्यात आली होती. ते त्या परीक्षेमध्ये अपयशी ठरले, आणि पापाने जगामध्ये प्रवेश केला. अब्राहामाला त्याच्या मुलाचा बळी देण्याची आज्ञा देऊन, त्याची परीक्षा घेण्यात आली (उत्पत्ति **22**). तो त्या परीक्षेत अयशस्वी झाला नाही. जेव्हा इस्राएली **40** वर्षांसाठी ओसाड प्रदेशात होते, तेव्हां वेगवेगळया पद्धतींनी त्यांची परीक्षा घेण्यात आली. ते परीक्षेत अयशस्वी झाले. खऱ्या श्रद्धाळूची दररोज परीक्षा घेतली जाते, कारण त्याच्याकडे अजूनही असे शरीर आहे, जे पापाची वासना ठेवते. येशूला भुरळ घालण्याची परवानगी सैतानाला देऊन, परमेश्वराने येशूचीही परीक्षा घेतली होती. अद्भुतरीत्या, तो त्या परीक्षेमध्ये अयशस्वी ठरला नाही.

त्यामुळेच, विश्वास ठेवण्याचे काम करण्याची आणि तारणासाठी परमेश्वराकडे प्रार्थना करण्याचे काम करण्याची आज्ञा, ही देखील परीक्षाच आहे. जर या परमेश्वराच्या अशा आज्ञा आहेत, ज्यांचे पालन आपण केलेच पाहिजे, तरी या आज्ञांचे पालन करणे, हे आपल्या तारणाचे कारण बनू शकणार नाही, ही वस्तुस्थिती आपण पूर्णपणे ओळखू शकू का ?

हा परीक्षेचा कार्यक्रम अत्यंत गंभीर आहे. मानवप्राणी निसर्गत:च अभिमानी आहे, आणि अशा कोणत्याही गोष्टीचे श्रेय किंवा महानता घेण्यासाठी तो उत्सुक असतो, जे काम त्याने आपल्या कृतीने पूर्ण त्वास नेले आहे.

त्याप्रमाणेच, परिणामत:, त्यांनी त्यांच्या तारणाच्या प्रक्रियेची सुरूवात त्यांच्या स्वत:च्या कृतीने केली नाही, तर परमेश्वर त्यांना तारेल याच्यावर, कदाचित याची जाणीव न होता, पुष्कळशा लोकांचा विश्वास नसतो.

*आपल्या बाजूने होणारे कोणतेही काम, आपण तारले जाण्यासाठी, आपल्याला अत्यंत छोट्याशा प्रमाणात देखील मदत करू शकेल, असा विचार आपण एका क्षणासाठीही करू नये.*

पण परमेश्वर नीतिमत्वाने मत्सरी आहे. आपल्याला तारण्याचे सर्व कार्य त्याने केले. म्हणूनच, आपल्या बाजूने होणारे कोणतेही काम, आपण तारले जाण्यासाठी, आपल्याला अत्यंत छोट्याशा प्रमाणात देखील मदत करू शकेल, असा विचार आपण एका क्षणासाठीही करू नये.

## *सातव्या दिवसाच्या शब्बाथाचे आत्यंतिक महत्व*

या अत्यंत महत्वाच्या सत्याचे नाट्यमय प्रात्यक्षिक, जुन्या करारामध्ये दिले गेले आहे. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की सातव्या दिवसाचा शब्बाथ, हा सभेमधील जनसमुदायाकडून, म्हणजे इस्राएल राष्ट्राकडून, अत्यंत कडकपणे पाळला जायला हवा होता. हा असा विधिनियम होता, जो या सत्याकडे निर्देश करत होता की तारणाचे काम, हे पूर्णपणे परमेश्वराकडून केले गेले आहे. जसे सातव्या दिवसाच्या शब्बाथाच्या दिवशी, इस्राएलींनी कोणत्याही प्रकारचे काम करायचे नव्हते, त्याचप्रकारे, आपल्या तारणाला हातभार लागावा म्हणून, आपण कोणत्याही प्रकारचे काम करू नये. निर्गम **31**, श्लोक **13** आणि **14** मध्ये परमेश्वर म्हणतो :

**तू इस्राएल लोकांना आणखी असे सांग की, तुम्ही माझे शब्बाथ अवश्य पाळावे, कारण पिढ्यानपिढ्या, तुमच्यामाझ्यामध्ये ही खूण आहे; ह्यावरून हे कळावे की, तुम्हांला पवित्र करणारा मी परमेश्वर आहे. म्हणून तुम्ही शबाथ पाळावा; तो तुमच्यासाठी पवित्र आहे; जो कोणी तो भ्रष्ट करील, त्याला अवश्य जिवे मारावे; जो कोणी त्या दिवशी कांही काम करील, त्याच स्वजनांतून उच्छेद व्हावा.**

या प्रकटीकरण करणा-या श्लोकांमधून, परमेश्वर हे सर्वोच्च महत्वाचे तत्व पुढे मांडत आहे की आपल्याला पवित्र करण्यासाठीचे सर्व काम, परमेश्वराने केले आहे. "पवित्र करणे" म्हणजेच, परमेश्वराच्या सेवेकरिता बाजूला होणे. जेव्हा आपण तारले जातो, तेव्हा आध्यात्मिकदृष्टया, आपण त्याच्या सेवेकरिता बाजूला केले जातो. या परिच्छेदामध्ये, परमेश्वर असे आग्रहाने सांगतो की आपण पवित्र होण्यासाठी आवश्यक असणारे सर्व काही त्याने केले.

या अत्यंत महत्वाच्या शिकवणुकीकडे निर्देश करणारे एक चिन्ह म्हणून, परमेश्वराने अशी आज्ञा दिली की सातव्या दिवशीच्या शब्बाथाच्या दिवशी, कोणतेही काम केले जाऊ नये. सातव्या दिवशीच्या शब्बाथाला ज्याने काम केले तो अशा व्यक्तीप्रमाणे होता, ज्याचा असा विश्वास होता की त्याचे स्वत:चे आध्यात्मिक काम, त्याचे तारण साधण्यासाठी मदत करत होते. अशा व्यक्तीला मृत्यू दिला जायला हवा, म्हणजेच, ती व्यक्ती अजूनही परमेश्वराचा क्रोध सहन करणार आहे.

या सत्याची गंभीरता स्पष्ट करण्यासाठी, परमेश्वर आपल्याला एक उदाहरण देतो. गणना **15**, श्लोक **32-36** मध्ये परमेश्वर आपल्याला अशा माणसाविषयी सांगतो, ज्याने सातव्या दिवशीच्या शब्बाथाच्या वेळी, काटक्या गोळा केल्या. शब्बाथाच्या दिवशी काम न करण्याच्या आज्ञेचे, हे अत्यंत छोटेसे, जवळजवळ नकळत घडलेले उल्लंघन आहे.

आणि तरीही, जेव्हा मोशेने परमेश्वराला विचारले की शब्बाथाच्या संबंधातील या आज्ञेच्या अत्यंत क्षुल्लक उल्लंघनासाठी कोणती शिक्षा असावी, तेव्हा परमेश्वराने अशी सूचना दिली की त्या व्यक्तीला दगडांनी ठेचून मारले जावे. तारण हे केवळ ख्रिस्ताच्या कामाद्वारेच मिळते, हे आपल्याला समजते, याची आपल्याला पूर्ण खात्री असली पाहिजे, या सत्याच्या गंभीरतेचे उदाहरण, ही नाट्यमय घटना देते.

*जे लोक असा विचार करतात की त्यांचे तारण ते सुरू करू शकतात किंवा त्याला कोणत्याही प्रकारे हातभार लावू शकतात, अशा लोकांसाठी कोणत्याही प्रकारची दया नाही.*

आपण असा विचार करूच नये की परमेश्वराच्या नियमाशी आज्ञाधारक राहून, आपण आपल्या तारणासाठी मदत केली. हे लक्षात ठेवा की नियमाचे पालन, हे आपण करीत असलेले आध्यात्मिक काम आहे. परिणामत:, सातव्या दिवशीच्या शब्बाथाच्या दिवशी, काटक्या उचलणा-या माणसाला देहदण्ड झाला या ऐतिहासिक बोधकथेतून, परमेश्वर आपल्याला ओरडून सांगत आहे: **जे लोक असा विचार करतात की त्यांचे तारण ते सुरू करू शकतात किंवा त्याला कोणत्याही प्रकारे हातभार लावू शकतात, अशा लोकांसाठी कोणत्याही प्रकारची दया नाही.**

***परमेश्वराच्या परीक्षेच्या कार्यक्रमाचे आशीर्वाद***

ज्या लोकांचा असा विश्वास आहे की ते तारले गेले आहेत, त्यांच्यासाठी हा परीक्षा कार्यक्रम, एक महान आशीर्वाद आहे. **2** करिंथकर, अध्याय **13**, श्लोक **5** मध्ये परमेश्वर आज्ञा देतो:

**तुम्ही विश्वासात आहां किंवा नाही, ह्याविषयी आपली परीक्षा करा; आपली प्रतीति पाहा. येशू ख्रिस्त तुमच्या ठायी आहे, असे तुम्ही स्वत: संबंधाने समजतां ना? नाहीतर तुम्ही पसंतीस उतरलेले नाही.**

आपण खरोखरच तारले गेलो आहोत हे आपण स्वत:साठी कसे सिद्ध करू शकतो? आपण करू शकत असलेली एक मोठी गोष्ट म्हणजे, आपण तारले गेलो आहोत यावर आपण कसा विश्वास ठेवतो, याची परीक्षा करणे.

आपण हे किंवा ते केले आहे, आणि त्यामुळे, आपण आपले तारण सुरू केले किंवा आपल्या तारणाला कोणत्या तरी प्रकारे हातभार लावला, अशा आपल्या कांही कल्पना किंवा कांही विचार असतील, तर ते आपण पूर्णपणे सोडून देतो, याची खातरजमा आपण करून घेतली पाहिजे. जर आपण खरोखर तारले गेलो असू, तर आपल्या जन्माच्या खूप काळ अगोदरच, तारणाचे सर्व काम ख्रिस्ताने केले होते, हे बायबलचे तत्व आपण स्पष्टपणे स्वीकारतो, याविषयी आपल्याला खात्री असली पाहिजे. तारण हे पूर्ण पणे ख्रिस्ताच्या कामामुळे साधले आहे, आणि तारणासाठी, आपण कोणत्याही प्रकारची मदत अजिबात करू शकत नाही. आपण हे समजून घेतले पाहिजे की परमेश्वराच्या कोणत्याही आज्ञेचे पालन करणे यासारख्या अतिशय छोट्याशा कामाचीही, आपल्या तारणासाठी मदत होऊ शकत नाही. सातव्या दिवशीच्या शब्बाथाच्या दिवशी काटक्या उचलणा-या माणसावर आलेला निवाडा, आपल्या कानात घुमत राहिला पाहिजे.

शिवाय, **1** योहान, अध्याय **2**, श्लोक **3** ते **6** मधील भाषेच्या प्रकाशात, आपण आपली परीक्षा घ्यावी, जिथे आपण वाचतो:

**आपण त्याच्या आज्ञा पाळल्या, तर त्यावरून आपणांस कळून येते की, आपण त्याला ओळखतो. मी त्याला ओळखतो असे म्हणून त्याच्या आज्ञा जो पाळीत नाही, तो लबाड आहे, त्याच्या ठायी सत्य नाही. जो कोणी त्याच्या वचनाप्रमाणे चालतो, त्याच्यामध्ये देवाची प्रीति, खरोखर पूर्णत्व पावली आहे. ह्यावरून आपल्याला कळून येते की, आपण त्याच्या ठायी आहों. मी त्याच्या ठायी राहतो असे म्हणणा-याने तो जसा चालला, तसे स्वत:हि चालले पाहिजे.**

खरोखरच तारल्या गेलेल्या प्रत्येक मनुष्याला, नवीन पुनरूत्थित आत्मा देण्यात आला आहे, आणि म्हणूनच, परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे वागण्यात, त्याला सदैव आनंद वाटेल. खरोखरच, तो स्तोत्रसंहिता **139**, श्लोक **23** आणि **24** मधील स्त्रोत्रकाराप्रमाणे प्रार्थना करेल:

**हे देवा, माझी झडती घेऊन, माझे हृदय जाण; मला कसोटीस लावून, माझे मनोगत जाण. माझ्या ठायी, दुष्टपणाकडे कांही प्रवृत्ति असेल, तर पाहा; आणि मला सनातन मार्गाने चालीव.**

***परमेश्वर त्याच्या परीक्षेच्या कार्यक्रमाच्या काठिण्याची तीव्रता वाढवतो***

या आज्ञांमधून आणली जाणारी परीक्षा ही अधिक कठीण आहे, कारण जरी तारली न गेलेली व्यक्ति, आध्यात्मिकदृष्टया मृत आणि परमेश्वराच्या क्रोधाखाली असते, तरीही काही अंशी, अजूनही परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करण्याची क्षमता तिच्याकडे असते. या अभ्यासामध्ये, याआधी, आपण खालील गोष्टी शिकलो.

**1.** तारल्या न गेलेल्या व्यक्तीमध्ये अजूनही अशी सद्सद्विवेकबुद्धी असते, जी तिला पापांसाठी दोषी ठरवू शकते. याचे कारण हे की परमेश्वराचे नियम, काही अंशाने, त्याच्या हृदयावर लिहिले गेलेले आहेत (योहान **8:9**, रोमकर **2:14-15**).

**2.** एखाद्या आध्यात्मिदृष्टया मृत असलेल्या व्यक्तीला तारण्याचा परमेश्वराचा हेतु नसला, तरीही तो त्याला त्याच्या इच्छेप्रमाणे करायला लावू शकतो, उदाहरणार्थ, जुन्या करारातील बलाम आणि राजा शौल (गणना **22:12-13**, **2** पेत्र **2:15-16**, **1** शमुवेल **10:9-12**, **1** इतिहास **10:13**).

अशाप्रकारे, जरी एखादी व्यक्ति परमेश्वराच्या आज्ञा पाळण्यासाठी खूप प्रयत्न करत असली, तरी तिला हे समजू शकत नाही की तिला दोषी ठरविणारा, तिच्या हृदयामध्ये काम करणारा परमेश्वर आहे की त्याची स्वतःची सद्सद्विवेकबुद्धि आहे. आणि त्याला हे ही समजू शकत नाही की तो अगदी मनापासून परमेश्वराच्या आज्ञेचे पालन करण्याचा प्रयत्न करत आहे की नाही? पण त्याने हे जाणलेच पाहिजे की परमेश्वराला आनंदी करण्याचा त्याचा कोणताही प्रयत्न, त्याच्या तारणाची सुरूवात करू शकत नाही किंवा त्याच्या तारणाची खात्री देऊ शकत नाही किंवा अशी कोणतीही अट पूर्ण करू शकत नाही, जी त्याला तारू शकेल.

*तो अशा चुकीच्या पद्धतीने विचार करू शकतो की तो या आज्ञांचे पालन करत असल्याने, परमेश्वर त्याला तारेल.*

जेव्हा तारली न गेलेली व्यक्ति, परमेश्वराच्या आज्ञा पाळण्यास सुरूवात करते, तेव्हा ती सहजपणे अशा चुकीच्या विचाराच्या सापळ्यात अडकू शकते की त्याचा आज्ञाधारकपणा हा याचा पुरावा आहे की परमेश्वराने त्याला अगोदरच तारले आहे. तो असा चुकीचा विचार करू शकतो की तो या आज्ञांचे पालन करत असल्याने, परमेश्वर त्याला तारेल. एखाद्या व्यक्तीने केलेले कोणतेही काम, त्याच्या तारणाला हातभार लावू शकत नाही, असे जाहीर करणा-या परमेश्वराच्या कायद्याचे, तो दोन्ही बाबतीत उल्लंघन करत आहे. आणि जेव्हां एखादी व्यक्ति, परमेश्वराच्या सर्व आज्ञांचे पालन करील की नाही, याची परीक्षा घेण्याची परमेश्वराची योजना असते, तेव्हा परमेश्वराची करूणा नसेल, तर मानवप्राणी या परीक्षेमध्ये अयशस्वी ठरेल.

पुरातन इस्राएलाच्या वागण्यामध्ये हे नाट्यमय रीतीने दिसून येते. परमेश्वर त्यांना म्हणाला की जर त्यांनी परमेश्वराच्या सर्व आज्ञांचे पालन केले, तर तो त्या सर्वांना, सर्वकाळासाठी आशीर्वादित करेल (अनुवाद **28:1**, **28:15**, **30:6-16**).

म्हणूनच, त्यांनी अधिकाधिक चांगले राहण्याचा प्रयत्न केला, आणि असा विश्‍वास ठेवला की या मार्गाने, त्यांना त्यांच्या तारणाची खात्री दिली गेली आहे. तथापि, रोमकर **9**, श्लोक **31** आणि **32** मध्ये परमेश्‍वर दुःखदरीत्या आपल्याला अशी माहिती देतो :

**परंतु इस्राएल लोक नीतिमत्त्वाच्या नियमामागे लागले होते, तरी ते त्या नियमापर्यंत जाऊन पोहचले नाहीत. का नाहीत? कारण विश्‍वासाने नव्हे, तर कर्मांनी कार्य होईल असे समजून, ते त्याच्या मागे लागले. अडवणुकीच्या धोंड्यावर ते ठेचाळले.**

जेव्हा एखादी व्यक्ति तारली जाण्यासाठी परिश्रमपूर्वक प्रयत्न करते, तेव्हा ती सहजपणे या विचाराच्या सापळ्यात अडकते की त्याचा आज्ञाधारकपणा, हा त्याच्या तारणाची खात्री देत आहे किंवा सुरूवात करत आहे. हे तो सातव्या दिवशीच्या शब्बाथाच्या दिवशी काम करत असल्याप्रमाणे आहे, जसे तो कांही काटक्या उचलणारा माणूस करत होता.

आपली स्थिती, नेहमी आणि केवळ त्या निनवेकरांप्रमाणेच असावी, जसे आपण योना **3**, श्लोक **9** मध्ये वाचतो :

**देव कदाचित वळेल व अनुताप पावेल आणि आपल्या संतप्त क्रोधापासून परावृत्त होईल, म्हणजे आपला नाश होणार नाही.**

*आपण जे काही केले आहे किंवा करत आहोत, त्यामुळे तारणाची सुरूवात होईल किंवा खात्री मिळेल, असे आपण गृहीत धरू नये.*

म्हणूनच, आपण जे काही केले आहे किंवा करत आहोत, त्यामुळे तारणाची सुरूवात होईल किंवा खात्री मिळेल असे आपण गृहीत धरू नये. परमेश्‍वर आपल्या जीवनामध्ये त्याच्या इच्छेप्रमाणे करण्यासाठी काम करत आहे यावर आपण विश्‍वास ठेवत असलो किंवा आपली सदसद्‌विवेकबुद्धी आपल्याला दोषी ठरवत असल्यामुळे आपण आज्ञापालन करण्याचा प्रयत्न करत असलो, तरी या दोन्ही बाबतीत ते खरे आहे.

तारल्या न गेलेल्या याचकाची प्रार्थना अशीच असली पाहिजे, “हे परमेश्‍वरा, माझ्यावर दया दाखव. मी तारणासाठी पात्र नाही. याबद्दल मी आभारी आहे की, जसा मी तुझ्या इच्छेप्रमाणे वागण्याचा परिश्रमपूर्वक प्रयत्न करतो, तसे मला हे माहीत आहे की केवळ परमेश्‍वरच मला पात्र बनवू शकतो, जेणेकरून मी माझ्या आत्म्यापासून व हृदयापासून परमेश्‍वराला मिळवण्याचा प्रयत्न करत असेन, आणि जेव्हा मला नवीन आत्मा दिला गेला असेल, म्हणजेच, जेव्हां परमेश्‍वराने मला अगोदरच तारले असेल, केवळ तेव्हाच हे खरे असू शकते.”

लूक **18**, श्लोक **13** मधील जकातदाराचे उदाहरण, आपण नेहमी आपल्या विचारांमध्ये ठेवले पाहिजे, जिथे आपण वाचतो:

**जकातदार तर दूर उभा राहून, वर स्वर्गाकडे दृष्टि लावण्यास देखील न धजतां, आपला ऊर बडवीत म्हणाला, हे देवा, मज पाप्यावर दया कर.**

आपल्याला योएल **2**, श्लोक **12-14** मधील परमेश्वराच्या शब्दांची आठवण झाली पाहिजे :

**आता तरी परमेश्वराचे वचन ऐका; मनपूर्वक मजकडे वळा; उपोषण, आक्रंदन व शोक करून वळा. आपली वस्त्रे नव्हे, तर आपले हृदय फाडा आणि परमेश्वर, तुमचा देव, याजकडे वळा, कारण तो कृपाळू, कन्हवाळू मंदक्रोध, दयासागर आहे; अरिष्ट आणिल्याबद्दल त्याला वाईट वाटण्यासारखे आहे. परमेश्वर, तुमचा देव, याला कळवळा येऊन, तो मागे वळेल व आपल्यामागे आशीर्वाद ठेवून जाईल की नाही <u>कोण जाणे</u>; असे की जेणेकरून, तुम्हांस त्याला अन्नार्पण व पेयार्पण करितां येईल.**

आणि म्हणूनच, परमेश्वर ज्या मार्गावरून आपल्या लोकांना आणतो, तो हा मार्ग आहे, आणि याचे वर्ण न, पुढे यिर्मया **31**, श्लोक **8** व **9** मध्ये आहे, जिथे आपण वाचतो :

**पाहा, मी त्यांस उत्तरेच्या देशांतून आणीन, त्यांस पृथ्वीच्या दिगंताहून जमा करीन; त्यांच्यामध्ये आंधळे व पांगळे, गर्भवती व प्रसूतिवेदना लागलेल्या असतील; मोठ्या समुदायाने ते इकडे परत येतील. ते अश्रुपात करीत येतील; ते विनंती करीत असतां मी त्यांस नेईन; ते ठोकर खाणार नाहीत अशा सरळ मार्गाने मी त्यांस पाण्याच्या प्रवाहाकडे आणीन; कारण मी इस्राएलास पिता झालो आहे व एफ्राइम माझा प्रथम जन्मलेला आहे.**

***आपण बायबल ऐकू शकतो, पण ऐकत नाही, असे असू शकते काय?***

बायबलमध्ये पुष्कळ ठिकाणी, परमेश्वर यिर्मया **29**, श्लोक **17-19** मधील सूचना देतो, जिथे आपण वाचतो :

**पाहा, मी त्यांच्यामध्ये तरवार, दुष्काळ व मरी पाठवीन; मी त्यांस वाईट अंजिरांसारखे करीन, ते नासल्यामुळे खाववत नाहीत. मी तरवार, दुष्काळ व मरी यांनी त्यांची पाठ पुरवीन; सर्व पृथ्वीवरल्या राष्ट्रांस दहशत पोहचेल, असे मी त्यांचे करीन; आणि जेथे मी त्यांस हाकून दिले आहे त्या सर्व राष्ट्रांत, ते शाप, विस्मय, उपहास आणि निंदा यांचे विषय होतील. परमेश्वर म्हणतो, माझे सेवक, जे संदेष्टे, त्यांस माझी वचने देऊन, मी मोठ्या निकडीने त्यांच्याकडे पाठवीत आलो, तरी त्यांनी ती ऐकली नाहीत; आणि तुम्हीहि ती ऐकत नाही, असे परमेश्वर म्हणतो.**

*लक्षपूर्वक ऐकणे म्हणजे, कोणती आज्ञा दिली आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करणे आणि आज्ञाधारक बनण्याचा प्रयत्न करणे, अशा उद्देशाने ऐकणे.*

लक्षपूर्वक ऐकणे म्हणजे, कोणती आज्ञा दिली आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करणे आणि आज्ञाधारक बनण्याचा प्रयत्न करणे, अशा उद्देशाने ऐकणे. तथापि, जर आपण सत्याचे पूर्वग्रहित आकलन घेऊन

बायबलकडे आलो, तर आपण बायबल लक्षपूर्वक ऐकणार नाही, आणि म्हणूनच, या उत्तऱ्यानुसार, आपण सत्याचा संदेश <u>ऐकणार</u> नाही.

उदाहरणार्थ, असा एखादा मनुष्य, जो प्रारब्धवादी भूमिका घेतो किंवा त्याची अशी खात्री पटली आहे की त्याची स्वत:च-करण्याची स्वसंतोष सुवार्ता बरोबर आहे किंवा असा कोणी तरी, जो तारले जाण्यासाठी परिश्रमपूर्वक प्रयत्न करण्याच्या परमेश्वराच्या आज्ञांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करतो, तो परमेश्वराचा संदेश ऐकत नाही. ज्याक्षणी तो बायबलमध्ये तारणाविषयी काही तरी वाचतो, तेव्हा त्याच्या मनामध्ये, तो त्याचा विपर्यास करतो आणि त्याचा अर्थ बदलण्याचा प्रयत्न करतो, जेणेकरून, ते त्याच्या पूर्वग्रहित कल्पनांशी सहमत होईल. त्याच्यासाठी, बायबलच्या विधानाचे सत्य, हे त्याच्या बंडखोर, मानवनिर्मित कल्पनांनी उध्वस्त झाले आहे. परिणामत:, त्याने स्वत:ला ईश्वरी वचनाच्या श्रवणाच्या बाहेर ठेवले आहे. अशाप्रकारे, त्याने स्वत:ला अत्यंत गंभीर स्थितीमध्ये ठेवले आहे, कारण विश्वास (तारणकर्ता ख्रिस्त), हा केवळ ईश्वरी वचनाच्या श्रवणानेच येऊ शकतो (रोमकर **10:17**).

हे सत्य आहे की तत्वत:, जरी कोणी मनुष्य, ईश्वरी वचन ऐकण्याला हट्टाने नकार देत असेल, तरीही त्याच्या परमेश्वराविरूध्दच्या बंडखोरीच्या तीव्रतेकडे दुर्लक्ष करून, परमेश्वर त्याला तारू शकतो. तथापि, जे लोक ईश्वरी वचन ऐकण्यास नकार देतात, अशा लोकांना बायबल कोणत्याही प्रकारचे प्रोत्साहन किंवा खात्री देत नाही, आणि म्हणून, वर अवतरित केलेल्या, यिर्मया **29**, श्लोक **18** आणि **19** मधील धोक्याच्या सूचनेवर, आपण अत्यंत काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. अशी व्यक्ति, दुर्दैवाने, आणि पुष्कळशा अंशाने, मत्तय अध्याय **23** भर सांगितल्या गेलेल्या, परूश्यांच्या भयानक वर्णनाशी जुळते.

तथापि, जे नम्रपणे स्वत:ची पापे कबूल करतात आणि त्यांच्या पूर्वग्रहित कल्पना सोडून देतात, जे संपूर्ण बायबलचे आज्ञापालन करण्याचा कळकळीने प्रयत्न करतात व जे नम्रपणे परमेश्वराच्या दयेची याचना करतात, त्यांच्यासाठी आशा, अद्भुत आशा आहे.

*जेव्हा आपण बायबलकडे जातो, तेव्हा आपल्या पूर्वग्रहित कल्पना, वरवर कितीही रास्त आणि तात्विक भासत असल्या तरीही, त्या घेऊन आपण बायबलकडे येऊच नये.*

जेव्हा आपण बायबलकडे जातो, तेव्हा आपल्या पूर्वग्रहित कल्पना वरवर कितीही रास्त आणि तात्विक भासत असल्या तरीही, त्या घेऊन आपण बायबलकडे येऊच नये. आपण अशी वृत्ति ठेवून बायबलकडे जावे, की "मला काहीच माहीत नाही, हे परमेश्वरा, तूच मला शिकवले पाहिजेस." आणि जेव्हां आपण परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करण्यासाठी परिश्रमपूर्वक प्रयत्न करतो, तेव्हां आपली वृत्ति अशीच असली पाहिजे की जरी आपण तारणासाठी अजिबात पात्र नसलो तरीही, आपल्याला खूप मोठी आशा आहे की <u>कदाचित</u>, परमेश्वर आपल्याला सुद्धा तारेल (योना **3:9**).

### *शास्त्रलेखाची तुलना शास्त्रलेखाबरोबर करा*

जेव्हां आपण बायबलमधून शिकण्याचा प्रयत्न करत असतो, तेव्हां बायबलचा जो एक मूलभूत नियम आपण नेहमीच पाळला पाहिजे, तो आपण लक्षात ठेवला पाहिजे, आणि तो नियम असा की आपण

शास्त्रलेखाची तुलना, शास्त्रलेखाबरोबर केली पाहिजे (**1 करींथकर 2:13**). म्हणजेच, जेव्हां आपण बायबलचा अभ्यास करतो, तेव्हां आपण याची खातरजमा केली पाहिजे की आपल्या अनुमानांपैकी प्रत्येक अनुमानाचा मिलाफ, संपूर्ण बायबलशी साधला गेला आहे.

ही सत्ये लक्षात ठेवून आणि या अभ्यासात आपण अगोदरच शिकलेल्या तत्वांचा उपयोग करून, आपण अशा पुष्कळशा श्लोकांकडे पहावे, जे तारले जाण्याच्या बाबीबद्दल थेटपणे बोलतात. आपण अगदी सुपरिचित अशा त्या श्लोकापासून सुरवात करू, रोमकर **10**, श्लोक **13**, जिथे परमेश्वर सांगतो :

**कारण जो कोणी प्रभूचे नाव घेऊन त्याचा धांवा करील, त्याचे तारण होईल.**

लगेचच, तिथे लाल निशाण दिसते, म्हणजेच, आपण काळजी घेतली पाहिजे. परमेश्वराचे नांव घेऊन त्याचा धांवा करणे, हे आपण करीत असलेले काम आहे. हा श्लोक असे शिकवत असल्यासारखे दिसते की जर आपण परमेश्वराचे नांव घेऊन त्याचा धांवा करण्याचे काम केले, तर त्याचा परिणाम आपले तारण हा असेल, पण ते अशक्य आहे, कारण आपल्याला तारण्यासाठीचे सर्व काम परमेश्वराने केले आहे. अशाप्रकारे, आपल्याला समजते की बायबलमधून अधिक माहितीचा शोध घेतल्याशिवाय, आपण हा श्लोक समजून घेऊ शकत नाही.

अधिक माहितीसाठीच्या आपल्या शोधामध्ये, आपण यिर्मया **29**, श्लोक **11** ते **13** कडे येतो, जिथे परमेश्वर म्हणतो :

**परमेश्वर म्हणतो, तुम्हांविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत, ते मी जाणतो; ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत; ते तुम्हांस तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत. तेव्हां तुम्ही माझा धांवा कराल, तुम्ही जाऊन माझी प्रार्थना कराल व मी तुमचे ऐकेन. तुम्ही मला शरण याल आणि पूर्ण जिवेभावे माझ्या शोधास लागाल, तेव्हां मी तुम्हांस पावेन.**

अगदी असेच सत्य, अनुवाद **4**, श्लोक **29** मध्ये मांडलेले आहे, जिथे आपण वाचतो :

**पण तेथून जरी तुम्ही आपला देव परमेश्वर ह्याला शरण गेलात आणि पूर्ण जिवेभावे त्याच्या शोधास लागलात, तर तो तुम्हांला पावेल.**

परमेश्वर आपल्याला अशी अत्यंत महत्वाची माहिती देत आहे की जेव्हां आपण परमेश्वराचे नांव घेऊन त्याचा धांवा करतो किंवा तारणासाठी त्याचा शोध घेतो, तेव्हां आपण पूर्ण जिवेभावे त्याला शोधले पाहिजे.

पण ते अशक्य आहे, कारण बायबल आपल्याला तारल्या न गेलेल्या व्यक्तीच्या हृदयाची अवस्था सांगते. यिर्मय्या **17**, श्लोक **9** मध्ये आपण वाचतो :

**हृदय सर्वात जास्त कपटी आहे; ते असाध्य रोगाने ग्रस्त आहे, त्याचा भेद कोणास समजतो?**

आणि मार्क **7**, श्लोक **21** मध्ये आपण वाचतो :

**कारण आंतून, म्हणजे माणसाच्या अंत:करणातून वाईट विचार निघतात, जारकर्म, चोरी, खून,**

*परमेश्वराचा कोणीही पूर्ण जिवेभावे धांवा करण्यापूर्वी, त्यांना एक नवीन हृदय दिले जावे लागते.*

म्हणूनच, परमेश्वराचा कोणीही पूर्ण जिवेभावे धांवा करण्यापूर्वी, त्यांना एक नवीन हृदय दिले जावे लागते, म्हणजेच मग, त्यांच्याजवळ दुष्ट मन असणार नाही. आणि बायबल नेमके हेच शिकवते, उदाहरणार्थ, यहेज्केल **36**, श्लोक **25** ते **27**, जिथे परमेश्वर सांगतो :

**मी तुम्हांवर शुध्द पाणी शिंपडीन, म्हणजे तुम्ही शुद्ध व्हाल; तुमची सर्व मलिनता व तुमच्या सर्व मूर्ति, यांपासून मी तुमची शुद्धि करीन. मी तुम्हांस नवे हृदय देईन, तुमच्या ठायी नवा आत्मा घालीन; तुमच्या देहांतून पाषाणमय हृदय काढून टाकीन व तुम्हांस मांसमय हृदय देईन. मी तुमच्या ठायी माझा आत्मा घालीन आणि तुम्ही माझ्या नियमांनी चालाल, माझे निर्णय पाळून त्यांप्रमाणे आचरण कराल, असे मी करीन.**

या श्लोकांमध्ये, परमेश्वर असे स्पष्टपणे शिकवतो की परमेश्वर आपल्याला नवीन हृदय देतो. नवीन हृदय, ज्याला नवीन आत्मा असेही म्हणतात, ते आपल्याला देण्याच्या प्रचंड मोठया चमत्काराद्वारे, तो आपल्याला त्याच्यासमोर आज्ञाधारकपणे चालायला लावेल. जाता जाता सांगतो, नवीन हृदय किंवा नवीन आत्म्याला या अभ्यासामध्ये, आपण आपला नवीन कोरा पुनरूत्थित आत्मा असे म्हणतो, जो आपल्याला आपण तारले गेल्यावर मिळतो. परमेश्वर आपल्याला तारल्या गेलेल्या व्यक्ती कसे बनवतो आणि आपल्या तारणासाठीचे सर्व काम करणारा केवळ परमेश्वरच आहे, याचे वर्णन यहेज्केलमधील हे श्लोक करतात.

***सर्व मानवजातीला परमेश्वराचा धावा करण्याची आज्ञा दिली गेली आहे***

रोमकर **10: 13** मध्ये आपण वाचतो, **"जो कोणी प्रभूचे नांव घेऊन त्याचा धांवा करील, त्याचे तारण होईल,"** पण तारले जाण्यासाठी आपण <u>पूर्ण जिवेभावे धांवा केला पाहिजे</u> ह्या आवश्यक अशा अधिक माहितीचा जोपर्यंत आपण समावेश करत नाही, तोपर्यंत आपण तारणाशी संबंधित कोणत्याही निष्कर्षा प्रत पोहचू शकत नाही. आपल्याला हे माहीत आहे की केवळ परमेश्वराचा धांवा करण्याने तारण होणार नाही. आणि जोपर्यंत परमेश्वर आपल्याला नवीन हृदय देऊन तारत नाही, म्हणजेच, जोपर्यंत परमेश्वराने आपल्याला तारण्याचे सर्व काम आधीच केलेले नसते, तोपर्यंत आपण आपल्या पूर्ण जिवेभावे त्याचा धांवा करणार नाही.

पण यामुळे दुसरी एक समस्या उद्‌भवते. रोमकर **10:13** असे जाहीर करते की जे परमेश्वराचा धांवा करतील, त्यांचे "तारण होईल." "तारण होईल" हे शब्द म्हणजे असे एक हेल्लेणी क्रियापद आहे, जे असे दर्शविते की तारण ही परमेश्वराचा धांवा करण्याच्या परिणामस्वरूप, भविष्यकाळात घडून येणारी एक घटना आहे. आपण आताच हे शिकलो की या श्लोकाच्या पहिल्या भागाचे बायबलाधिष्ठित

आकलन हे आहे की आपण, पूर्ण जिवेभावे परमेश्वराचा धांवा करावा. आपण हे देखील शिकलो आहोत की आपण त्याचा पूर्ण जिवेभावे धांवा करू शकतो तो केवळ यामुळेच, की परमेश्वराने आपल्याला तारले आहे आणि आपल्याला नवीन हृदय दिले आहे.

म्हणूनच, "तारण होईल" हा जर आपण जिवेभावे परमेश्वराचा धांवा करण्याचा परिणाम आहे, तर आपल्यासमोर एक समस्या आहे. जी व्यक्ती अगोदरच तारली गेली आहे, ती पुन्हा कशी तारली जाऊ शकते?

ही समस्या तेव्हां सोडविली जाऊ शकते, जेव्हां आपल्या हे लक्षात येते की, परमेश्वराने निवडलेल्या एखाद्या व्यक्तीच्या जीवनातील तारणाचे वास्तव, हे पुष्कळ पाय-यांनी होणारे काम आहे, जसे की आपण या अभ्यासामध्ये याआधीच शिकलो. पहिली पायरी ही होती की तारणासाठी त्या व्यक्तीची निवड होणे. दुसरी पायरी ही होती की परमेश्वराने आपल्या पापांसाठी ज्या दंडाची मागणी केली, तो जेव्हां ख्रिस्ताने भरला, त्याच क्षणी, कायद्याने, आपल्या पापांसाठीचा दंड भरला गेला होता.

ज्यांच्या पापांच्या दंडाचा भरणा करण्यासाठी, ख्रिस्ताने अगोदरच परमेश्वराचा क्रोध सहन केला होता, अशा निवडलेल्या व्यक्तींना जेव्हां परमेश्वराने एक नवीन हृदय किंवा नवीन आत्मा दिला, तेव्हा तिसरी पायरी घडून आली. जेव्हा आपण तारले गेल्याबद्दल बोलतो, तेव्हां सर्वसाधारणपणे, आपल्या मनात ही तिसरी पायरी असते.

पण आपले तारण अजूनही पूर्ण झालेले नाही. आपल्याकडे अजूनही असे पापी शरीर आहे, जे तारले गेले पाहिजे. आणि ते, आपल्याला चौथ्या पायरीकडे आणते, जी शेवटच्या दिवशी घडून येईल, जेव्हा ख्रिस्त येईल आणि सर्व ख-या श्रद्धाळूंना, त्यांची नवीन पुनरूत्थित शरीरे देईल (**1** करींथकर **15**).

अशाप्रकारे, "आम्ही तारले गेलो आहोत" आणि "आम्ही तारले जाणार आहोत," असे सुद्धा घोषित करणे, बायबलदृष्ट्या योग्य आहे. म्हणूनच, बायबल असे ठामपणे सांगू शकते की जी व्यक्ती अगोदरच तारली गेली होती, "ती तारली जाईल." म्हणूनच, उदाहरणार्थ, **1** पेत्र **1:5** मध्ये आपण वाचतो :

**जे तारण शेवटच्या काळी प्रगट होण्यास सिद्ध आहे ते प्राप्त व्हावे म्हणून, जे तुम्ही, देवाच्या शक्तीने विश्वासाच्या योगे रक्षिलेले आहां, त्या तुम्हांसाठी, ते वतन स्वर्गात राखून ठेवले आहे.**

आणि म्हणूनच मार्क **13**, श्लोक **13** मध्ये आपण वाचतो :

**आणि माझ्या नावामुळे सर्व लोक तुमचा द्वेष करितील, परंतु जो शेवटपर्यंत टिकाव धरून राहील, तोच तारला जाईल.**

*फक्त शेवटी, जेव्हा परमेश्वर आपल्याला एक वैभवशाली पुनरूत्थित शरीर देईल, तेव्हाच आपण आपल्या व्यक्तिमत्वाच्या प्रत्येक भागामध्ये तारले जाऊ.*

आपण शेवटपर्यंत टिकतो कारण आपण अगोदरच तारले गेलो आहोत. पण फक्त शेवटी, जेव्हा परमेश्वर आपल्याला एक वैभवशाली पुनरूत्थित शरीर देईल, तेव्हाच आपण आपल्या व्यक्तिमत्वाच्या प्रत्येक भागामध्ये तारले जाऊ.

अशाप्रकारे, या श्लोकातून आपण हे शिकतो की जर आपण आध्यात्मिक गोष्टींची तुलना आध्यात्मिक गोष्टींशी करण्याची बायबलची सूचना पाळली नाही, तर आपण सहजतेने अशा सापळ्यात सापडू शकतो, जो आपल्याला बायबलच्या सत्याविषयी आंधळे बनवेल. म्हणूनच, संपूर्ण बायबलची तपासणी करेपर्यंत, आपण कोणत्याही प्रकारच्या निष्कर्षावर येऊ नये.

आतापर्यंत, आपण कित्येक अतिशय महत्वाची सत्ये शिकलो आहोत. त्यामध्ये खालील सत्ये आहेत :

**1.** एखादया व्यक्तीला तारण्यासाठी आवश्यक असणारे <u>सर्व</u> काम, केवळ ख्रिस्तानेच केलेले आहे.

**2.** जेव्हा आपण एखादी आज्ञा पाळतो, तेव्हा आपण आध्यात्मिक काम करत असतो. जरी एखादी व्यक्ती तारली गेलेली नसेल, तरी काही अंशाने, तो आध्यात्मिक कार्य करू शकतो, जसे की ख्रिस्तावर विश्वास ठेवणे, पण हे कार्य तारणाची सुरूवात करू शकत नाही किंवा तारले जाण्यासाठी कोणालाही मदत करू शकत नाही.

बायबलमधील ही तत्त्वे मनामध्ये ठेवून, आपल्याला अशी धोक्याची सूचना देण्यात येते की आपले तारण, हे आपण विश्वास ठेवल्याचा किंवा बायबलच्या आज्ञा पाळल्याचा परिणाम आहे असे बायबलमधील श्लोक शिकवत असल्याप्रमाणे वाटते, तरी तत्काळ, आपल्याला हे समजते की हे, त्या श्लोकाचे अत्यंत चुकीचे आकलन आहे. आपल्याला हे माहीत आहे की आपण शास्त्रालेखात शोधलेच पाहिजे आणि आपण शहाणपणासाठी प्रार्थना केली पाहिजे, ज्यामुळे तो श्लोक व्यवस्थितपणे समजू शकेल.

## *विश्वासाचे काम*

तारणाविषयी बोलताना, अगदी व्यवस्थितपणे समजून घेतला गेला पाहिजे असा सर्वात महत्वाचा शब्द म्हणजे, "विश्वास ठेवणे." ज्याप्रमाणे आपण शिकलो आहोत, "विश्वास ठेवणे" हे "विश्वास" या नामाचे क्रियापदरूप आहे. आपण हे देखील शिकलो आहोत की विश्वास हे काम आहे, आणि म्हणूनच, "विश्वास ठेवणे" हे आध्यात्मिक काम आहे. आणि आपण हे शिकलो आहोत की आपण करू शकतो असे कोणतेही काम नाही, जे आपल्या तारणाची सुरवात करू शकते किंवा त्यासाठी मदत करू शकते.

मानवप्राणी, तारला जाण्याव्यतिरिक्त, काही अंशाने विश्वास ठेवण्याचे काम करू शकतो, कारण त्याच्याकडे सदसद्‌विवेकबुध्दी आहे आणि काही अंशाने परमेश्वराचा नियम त्याच्या हृदयावर लिहिला गेला आहे. खरेतर, जर एखादी व्यक्ती परमेश्वराच्या राज्यामध्ये प्रवेश करण्याची परिश्रमपूर्वक पराकाष्ठा करेल, म्हणजे तारला जाण्याचा प्रयत्न करेल, तर तो त्या आज्ञेचे पालन करेल, कारण त्याच्यामध्ये विश्वास ठेवण्याची क्षमता आहे. पण ते तशाप्रकारचे विश्वास ठेवणे नाही, जे तारणाशी

संबंधित असते. तारल्या गेलेल्या व्यक्तीच्या जिवेभावे विश्वास ठेवण्याविषयी, परमेश्वर रोमकर **10**, श्लोक **9** आणि **10** मध्ये बोलतो, जिथे आपण वाचतो :

**की येशू प्रभु आहे, असे जर तू आपल्या मुखाने कबूल करिशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंत:करणात विश्वास ठेवशील, तर तुझे तारण होईल. कारण जो अंत:करणाने विश्वास ठेवतो, तो नीतिमान ठरतो व जो मुखााने कबूल करितो, त्याचे तारण होते.**

तथापि, आपण असे शिकलो की मनुष्याचे अंत:करण अतिशय दुष्ट असते (यिर्मया **17:9**, मत्तय **15:19**). अशाप्रकारे, जोपर्यंत परमेश्वर आपल्याला नवीन हृदय देत नाही, तोपर्यंत यावर अंत:करणापासून विश्वास ठेवणे अशक्य आहे. आणि जेव्हा परमेश्वर आपल्याला नवे हृदय देतो, तेव्हा त्याचा अर्थ असा होतो की त्याने आपल्याला तारले आहे (यहेज्केल **36:24-27**). म्हणूनच, जेव्हा तारले जाण्याअगोदर आपण विश्वास धरतो, तेव्हा तो अंत:करणापासून नसतो, आणि म्हणूनच, त्याचा संबंध तारणाशी असू शकत नाही.

दुस-या बाजूला, जर आपण अंत:करणापासून विश्वास ठेवला, तर त्याचा अर्थ असा होतो की नवीन हृदय देऊन, परमेश्वराने आपल्याला अगोदरच तारले आहे. आपला विश्वास, हा पूर्णपणे या वस्तुस्थितीचा परिणाम आहे की परमेश्वराने आपल्याला तारले आहे. म्हणूनच, “विश्वास ठेवणे” आणि “विश्वास असणे,” या दोन्हीही शब्दसमुदायांचा संबंध, आपण तारले जाण्याच्या साधनांशी लावला जाऊ शकत नाही.

प्रेषितांची कृत्ये **8**, श्लोक **13** ते **23** मध्ये आपण वाचतो, शिमोन या जादूगाराने विश्वास ठेवला आणि त्याचा बाप्तिस्मा झाला, पण नंतरचे श्लोक स्पष्टपणे हे दाखवतात की तो तारला गेला नाही. अब्राहामाने परमेश्वरावर (ख्रिस्तावर) विश्वास ठेवला आणि ते त्याला नीतिमत्त्व असे गणण्यात आले. शिमोनाने तारल्या न गेलेल्या माणसाप्रमाणे विश्वास ठेवला. अब्राहामाने तारल्या गेलेल्या माणसाप्रमाणे विश्वास ठेवला. तथापि, शिमोनाच्या जीवनामधील किंवा अब्राहामाच्या जीवनामधील विश्वासामुळे, तारणासाठी कधीच मदत झाली नाही.

अशाप्रकारे, आपण आत्मविश्वासाने असा निष्कर्ष काढू शकतो की तारण होण्याअगोदर विश्वास ठेवण्याचे काम करणे, हे आपल्याला कोणत्याही प्रकारे, आपल्या तारणासाठी मदत करू शकत नाही. आपण तारले गेल्यानंतर विश्वास ठेवण्याचे काम करणे, हा नेहमीच या वस्तुस्थितीचा परिणाम आहे की परमेश्वराने आपल्याला तारले आहे.

*विश्वास ठेवण्याच्या आज्ञेचे पालन करणे याचा संबंध, परमेश्वराच्या सर्व आज्ञांचे पालन करण्याचा प्रयत्न करण्याची इच्छा असण्याशी असतो.*

तथापि, “विश्वास ठेवणे” हा शब्द, आपण तारले जाण्याअगोदर, विश्वास ठेवण्याचे मूल्य आणि महत्व सूचित करतो. विश्वास ठेवण्याच्या आज्ञेचे पालन करणे याचा संबंध, परमेश्वराच्या सर्व आज्ञांचे पालन करण्याचा प्रयत्न करण्याची इच्छा असण्याशी असतो. या आज्ञांमध्ये, परमेश्वरावर प्रेम करणे, तारण

मिळवण्याचा प्रयत्न करणे, परमेश्वराची वाट पाहणे, आपल्या पापांबद्दल पश्चात्ताप करणे आणि तारणासाठी प्रार्थना करणे, यांचा समावेश होतो. या आज्ञांचे पालन करणे, हे आपण करीत असलेले काम आहे, पण ते, आपल्याला तारणामध्ये आणू शकत नाही. तरीसुध्दा, या प्रकारचा आज्ञाधारकपणा, आपल्याला बायबल अधिकाधिक काळजीपूर्वक ऐकण्यास भाग पाडेल. अशाप्रकारे, जर परमेश्वर आपल्याला तारण्याचे योजीत असेल, तर आपण तारले जाण्यासाठी योग्य अशा वातावरणात असू.

जर आपण आध्यात्मिकदृष्टया मृत आहोत, तर आपण विश्वास कसा ठेवू शकतो? लक्षात ठेवा, सुकलेल्या हाडांची दरी (यहेज्केल **37**) आणि सडलेले, दुर्गंधीयुक्त प्रेत (योहान **11:39**), ही तारल्या न गेलेल्या माणसांची उदाहरणे म्हणून परमेश्वर देतो. परमेश्वर असे जाहीर करतो की परमेश्वराचा झटून शोध घेणारा कोणी नाही, एकही नाही (रोमकर **3**). ही विधाने या वस्तुस्थितीवर जोर देतात की तारणाच्या अगोदर, प्रत्येक मानव हा आध्यात्मिकदृष्टया मृत असतो. शरीर आणि आत्मा, या दोहोंमध्ये तो आध्यात्मिकदृष्टया मृत असतो आणि परमेश्वर त्याच्यामध्ये वास करत नसतो. त्याच्या पापांमुळे, कायदेशीररित्या, तो आता परमेश्वराच्या क्रोधाखाली असतो आणि तो विनाशाच्या दिशेने जात असतो.

प्रत्येक पापाचा परिणाम विनाश आहे, आणि म्हणूनच, परमेश्वराच्या मध्यस्थीशिवाय, प्रत्येक माणसाचा खात्रीने विनाश होणारच आहे. जरी काही अंशाने परमेश्वराचा नियम त्याच्यामध्ये आहे, आणि त्याच्याकडे अशी सदसद्विवेकबुध्दि देखील आहे, ज्यामुळे त्याला चूक व बरोबर समजते, तरीसुध्दा, परमेश्वराच्या मदतीशिवाय, त्याची परिस्थिती पूर्णपणे निराशाजनक अशीच आहे. अशाप्रकारे, जेव्हां तारली न गेलेली व्यक्ति ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याचे काम करते, तेव्हां तो अजूनही दुर्गंधीयुक्त सडलेले प्रेत आहे, सुकलेल्या हाडांची दरी आहे. तो पूर्णपणे त्याच्या जिवेभावे परमेश्वराला शोधण्याचा प्रयत्न करू शकत नाही किंवा त्याच्या अंत:करणापासून विश्वास ठेवू शकत नाही, कारण त्याचे हृदय अत्यंत दुष्ट आहे. जर परमेश्वराने त्याला नवीन हृदय दिले, म्हणजेच, जेव्हां परमेश्वर त्याला तारतो, तेव्हांच तो पूर्णपणे त्याच्या जिवेभावे परमेश्वराचा शोध घेईल व त्याच्यावर विश्वास ठेवेल. जेव्हा त्याला नविन हृदय दिले जाते, तेव्हा त्याला त्याच्या आत्म्यामध्ये सार्वकालिक जीवन मिळते.

***सर्व मानवजातीला परमेश्वरावर विश्वास ठेवण्याची आज्ञा दिली आहे***

प्रेषितांची कृत्ये **16**, श्लोक **31** मध्ये आपण वाचतो :

**ते म्हणाले, “प्रभू येशूवर विश्वास ठेव, म्हणजे तुझे व तुझ्या घराण्याचे तारण होईल.**

आपल्याला हे माहीत आहे की फक्त आपल्या अंत:करणापासून विश्वास ठेवण्याचा संबंध, तारणाशी आहे. आणि जेव्हा आपण आपल्या अंत:करणापासून विश्वास ठेवतो, तेव्हा आपण आधीच तारले गेलेले असतो, कारण आपण आपल्या अंत:करणापासून विश्वास ठेवावा, यासाठी परमेश्वराने आपल्याला नवीन हृदय द्यावे लागते (यहेज्केल **36:26**). नवीन हृदय हे या वस्तुस्थितीचे महत्व पटवून देते की आपण तारले गेलो आहोत.

योहान **3**, श्लोक **16** मधील या सुपरिचित घोषणेत आपण वाचतो :

**देवाने जगावर एवढी प्रीति केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो, त्याचा नाश होऊ नये, तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.**

आता, आपल्याला हे माहीत आहे की "जो कोणी" या शब्दामध्ये, फक्त परमेश्वराने निवडलेल्यांचा समावेश होऊ शकतो. आपल्याला हे देखील माहीत आहे की तारली न गेलेली व्यक्ति, जिला तारण्याचा परमेश्वराचा हेतू अजिबात नाही, तोदेखील काही अंशाने त्याच्यावर विश्वास ठेवू शकतो. आणि आपल्याला हे माहीत आहे की जे तारले जातात, त्यांनी ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याचे काम केले म्हणून ते तारले जातात असे नाही. सत्य हे आहे की परमेश्वराने त्यांना सार्वकालिक जीवन दिले आहे, <u>म्हणून</u> ते त्याच्यावर विश्वास ठेवतात. त्यांचा विश्वास हा या वस्तुस्थितीचा परिणाम आहे की परमेश्वराने त्यांना तारले होते.

*सत्य हे आहे की परमेश्वराने त्यांना सार्वकालिक जीवन दिले आहे, <u>म्हणून</u> ते त्याच्यावर विश्वास ठेवतात.*

### *आपल्याला तारण्यासाठीचे सर्व काम ख्रिस्ताने केले - तो प्रामाणिक होता*

जेव्हा परमेश्वराने बायबल लिहिले, तेव्हा त्याने सत्य शोधणे सोपे बनवले नाही. जसा तो आपल्याला परमेश्वराकडे सतत शहाणपणासाठी प्रार्थना करीत, अत्यंत सहनशीलतेने आणि मेहनतीने, या अवघड श्लोकांचे विश्लेषण करायला लावतो, तसा तो आपल्याला अतिशय नम्र ठेवतो. आपण नेहमीच हे लक्षात ठेवावे की बायबल जे सर्व काही शिकवते त्या सर्वामध्ये जोपर्यंत आपल्याला सुसंगति आढळत नाही, तोपर्यंत आपण अभ्यासत असलेला श्लोक, आपल्याला समजलेला नसतो.

बायबल असे एक कोडे घालते, जे गलतीकर **2** आणि गलतीकर **3** मधील पुष्कळशा श्लोकांमध्ये सापडते. उदाहरणार्थ, गलतीकर **3**, श्लोक **2** मध्ये परमेश्वर जोर देऊन सांगतो :

**तुम्हांला नियमशास्त्रांतील कृत्यांनी आत्मा मिळाला (**तुम्ही तारले गेलात**), किंवा विश्वासपूर्वक ऐकण्याकडून मिळाला, इतकेच मला तुम्हांपासून समजून घ्यावयाचे आहे.**

हे लक्षात घ्या की विश्वास हे काम आहे. पण आपल्याला तारण्याचे सर्व काम कोणी केले? येशूने सर्व काम केले. तो परमेश्वराच्या सर्व आज्ञांशी पूर्णपणे प्रामाणिक होता आणि त्याने आपल्याला तारण दिले. अशाप्रकारे, आपण गलतीकर **3**, श्लोक **2** पुढीलप्रकारे वेगळ्या शब्दात मांडू शकतो, "तुम्हांला नियमशास्त्रांतील कृत्यांनी आत्मा मिळाला (तुम्ही तारले गेलात), किंवा विश्वासपूर्वक ऐकण्याकडून मिळाला (आपल्याला तारण्यासाठी येशूने जे काम केले)." म्हणूनच, त्याचे नाव विश्वसनीय असे आहे (प्रकटीकरण **19:11**). तो विश्वासाच्या कामाचा संपूर्ण अर्क आहे.

गलतीकर **2**, श्लोक **16** असे घोषित करतो :

**तरी मनुष्य, नियमशास्त्रातील कृत्यांनी नीतिमान ठरत नाही, तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे ठरतो हे जाणून, आम्हीहि ख्रिस्त येशूवर विश्वास ठेवला; ह्यासाठी की, आम्ही ख्रिस्तावरील विश्वासाने**

**नीतिमान ठरावे, नियमशास्त्रातील कृत्यांनी नव्हे. कारण नियमशास्त्रातील कृत्यांनी, मनुष्यजातीपैकी कोणीही नीतिमान ठरणार नाही.**

नियमशास्त्रातील कृत्यांनी मनुष्य नीतिमान होत नाही, तर विश्वासाने होतो, येशू ख्रिस्ताच्या कामाने होतो. आपल्या तारणासाठी आवश्यक असलेले सर्व काम करण्यामध्ये तो प्रामाणिक होता.

ब-याचदा, ज्या श्लोकांमध्ये "विश्वास" हा शब्द आहे, अशा श्लोकांमध्ये त्या शब्दाच्या जागी जेव्हां आपण "ख्रिस्त" हा शब्द वापरतो, ज्याचे नाव "विश्वासू" असे आहे, तेव्हां तो आपल्याला अधिक सोप्या रीतीने समजू शकतो. अशाप्रकारे, इफिसकर **2**, श्लोक **8**, याप्रकारे समजून घेतला जाऊ शकतो, "परमेश्वराच्या कृपेनेच विश्वासाच्या (ख्रिस्ताच्या) द्वारे तुमचे ताारण झालेले आहे." आणि गलतीकर **3**, श्लोक **11** अशाप्रकारे होऊ शकतो, "नीतिमान विश्वासामुळे (ख्रिस्तामुळे) जगेल." आणि गलतीकर **3**, श्लोक **2**, हा याप्रकारे समजून घेतला जाऊ शकतो, "तुम्हाला नियमशास्त्रातील कृत्यांनी आत्मा मिळाला की विश्वासपूर्वक ऐकण्यामुळे (ख्रिस्ताला, म्हणजे ईश्वरी वचन ऐकण्यामुळे) मिळाला?"

***शिक्कामोर्तब करण्याची कृति, हे नेहमीच परमेश्वराचे काम होते***

प्रसंगत: सांगतो, जलबाप्तिस्मा, हा त्या व्यक्तीचे करारामध्ये किंवा नीतिमत्वामध्ये शिक्कामोर्तब करतो असे शिकविणारे ईश्वरी तत्त्ववेत्ते आणि मंडळी, बायबलची एक अत्यंत गंभीररीत्या चुकीची शिकवण देतात.

ते त्यांच्या या चुकीच्या निष्कर्षासाठी, रोमकर **4**, श्लोक **11** चा आधार घेतात, जिथे आपण वाचतो :

**आणि तो सुंता न झालेला असतांना, त्याच्या ठायी असलेल्या विश्वासामुळे जे नीतिमत्त्व प्राप्त होते, त्याचा शिक्का म्हणून सुंता ही खूण त्याला मिळाली; ह्यासाठी की, जे लोक सुंता न झालेले असतां आपल्याकडे नीतिमत्त्व गणिले जावे म्हणून विश्वास ठेवतात, त्या सर्वांचा त्याने बाप व्हावे.**

शिक्कामोर्तब करण्याचे काम ही अशी एक कायदेशीर कृति आहे, जी केवळ परमेश्वराकडूनच केली जाऊ शकते. उदाहरणार्थ, इफिसकर **1**, श्लोक **13** मध्ये परमेश्वर त्याने निवडलेल्या एका व्यक्तीच्या तारणाचे वर्णन करतो, जिथे आपण वाचतो :

**तुम्हीहि सत्याचे वचन, म्हणजे तुमच्या तारणाविषयीची सुवार्ता ऐकून घेतल्यानंतर त्याच्यावर विश्वास ठेवला आणि त्याने देऊ केलेल्या पवित्र आत्म्याचा तुम्हांवर त्याच्याठायी शिक्का मारण्यात आला आहे.**

या श्लोकामध्ये, परमेश्वर हे सूचित करतो की त्यांनी ईश्वरी वचन ऐकले (श्रद्धा ईश्वरी वचनाच्या श्रवणाने येते), त्यांनी बायबलवर विश्वास ठेवण्यास सुरवात केली, त्यांनी विश्वास ठेवला (योना **3:5**), आणि ते परमेश्वराचे निवडले गेलेले लोक असल्यामुळे, आणि परमेश्वराने अगोदरच त्यांच्या पापांसाठीचा दंड भरला असल्यामुळे, त्यांना पवित्र आत्मा देऊन परमेश्वराने त्यांच्यावर शिक्का मारला, जी याची खात्री होती की परमेश्वराने त्यांना तारले होते. अशाप्रकारे, परमेश्वर आपल्याला असे शिकवितो की ते शिक्कामोर्तब करणे म्हणजे, परमेश्वराने एखाद्या व्यक्तीला नवीन आत्मा देण्याची कृति असते.

म्हणूनच, रोमकर **4**, श्लोक **11** खालील गोष्ट शिकवते, असे आपण समजून घेतले पाहिजे :

**आणि तो सुंता** [शारीरिक सुंता] **न झालेला असतांना** [शारीरिक सुंता] **त्याच्या ठायी असलेल्या विश्वासामुळे** [ख्रिस्तामुळे] **जे नीतिमत्त्व प्राप्त होते** (अनुवाद **30:6**), **त्याचा शिक्का** [खात्री] **म्हणून सुंता** [आध्यात्मिक सुंता, जे तारण आहे] **ही खूण** [चमत्कार] **त्याला मिळाली; ....**

या आकलनाने, आपल्याला समजते की बायबल तारणाबद्दल जे सर्व काही शिकवते, त्याच्याशी हे सुसंगत आहे.

***भाषांतरामध्ये क्वचित सुधारणा करावी लागते***

सामान्यत:, आपण यावर विश्वास ठेवू शकतो की, ज्या भाषांतरकारांनी बायबलची राजा याकोब आवृत्ति काढली, जी सर्व भाषांतरांमध्ये सर्वाधिक विश्वसनीय आहे, त्यांनी मूळ इब्री आणि हेल्लेणी भाषांतून इंग्रजीमध्ये भाषांतर करण्याचे काम अचूक केले. तथापि, देवाच्या ज्या पवित्र लोकांनी, लेखनिकांनी, परमेश्वराच्या मुखामधून आलेले मूळ बायबल लिहिले, त्यांच्याप्रमाणे हे भाषांतरकार परमेश्वराकडून प्रोत्साहित केले गेलेले नव्हते, आणि म्हणूनच, भाषांतरकारांनी काही चुका केल्या असू शकतील. आणि तारले जाण्याशी संबंधित असणा-या काही श्लोकांचा जेव्हा आपण काळजीपूर्वक अभ्यास करतो, तेव्हा आपल्याला असे आढळते की अर्थातच, त्यांच्या भाषांतरामध्ये सुधारणा केली गेली पाहिजे. लक्षात ठेवा, भाषांतरातील चूक सुधारली गेली पाहिजे, पण मूळच्या इब्री किंवा ग्रीक लिखाणातील नव्हे.

वस्तुस्थिती ही आहे की सर्व शास्त्रलेख अत्यंत काळजीपूर्वक सुसंगत करण्याच्या आमच्या इच्छेमध्ये, बायबलच्या भाषांतरामधील एक अत्यंत महत्वाची समस्या उघडी केली जात आहे. सामान्यत:, बायबलचे भाषांतरकार, आणि हे विशेषत: बायबलच्या राजा याकोब आवृत्तीच्या भाषांतकारांविषयी सत्य आहे की, जुन्या करारातील मूळ इब्री मजकूर आणि नव्या करारातील ग्रीक मजकूर, यांच्याशी जास्तीतजास्त प्रामाणिक राहण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमध्ये, ते अगदी अचूक होते.

तथापि, बायबलमध्ये काही श्लोक अशा पद्धतीने भाषांतरित केले गेले आहेत, जेणेकरून असे वाटते की ते एकमेकांशी अगदी परिपूर्णपणे सुसंगत असल्यासारखे दिसतात, पण खरेतर, जिथे परमेश्वराच्या तारणाच्या संदेशाचा संबंध येतो, तिथे त्यांनी खूप मोठी आपत्ती निर्माण केलेली आहे. विश्वास ठेवण्याचा संबंध तारणाशी कसा आहे याच्या कल्पनेशी, ते श्लोक संबंधित आहेत. खालील श्लोकांमधील सहमति लक्षात घ्या:

उत्पत्ति **15:6** : **अब्राहामाने परमेश्वरावर विश्वास ठेविला आणि अब्राहामाचा हा विश्वास, परमेश्वराने त्याचे नीतिमत्त्व गणिला.**

रोमकर **4:3** : **कारण शास्त्र काय सांगते? "अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला आणि ते त्याला नीतिमत्व असे गणण्यात आले."**

रोमकर 4:9 : **तर हे आशीर्वचन, सुंता झालेल्यांनाहि आहे किंवा सुंता न झालेल्यांनाहि आहे; कारण विश्वास हा अब्राहामाकडे नीतिमत्त्व असा गणण्यात आला होता, असे आपण म्हणतो.**"

गलतीकर 3:6 : **ज्याप्रमाणे अब्राहमने देवावर विश्वास ठेवला आणि ते त्याला नीतिमत्व असे गणण्यात आले, तसे हे आहे.**"

हे श्लोक, वरवर पाहता, अत्यंत निश्चितपणे असे शिकवीत असल्यासारखे दिसतात की एखादी व्यक्ति, येशूवर त्याचा तारणहार म्हणून विश्वास ठेवत असल्याच्या परिणामस्वरूप, त्याला तारण मिळेल, आणि हा निष्कर्ष या धर्मतत्त्वाचा आधार आहे, जो परमेश्वराचा तारणकार्यक्रम म्हणून, जवळजवळ सर्वच मंडळी आणि संप्रदायांमध्ये शिकविला जातो.

*ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याच्या आज्ञेसह, बायबलच्या कोणत्याही आज्ञेचे जेव्हा केव्हां आपण पालन करतो, तेव्हा ते आपण करीत असलेले काम असते.*

पण तो निष्कर्ष अगदीच अशक्य असा निष्कर्ष आहे. ख्रिस्तावर विश्वास ठेवणे हे आपण करीत असलेले काम असते. लक्षात ठेवा, ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याच्या आज्ञेसह, बायबलच्या कोणत्याही आज्ञेचे जेव्हा केव्हां आपण पालन करतो, तेव्हा ते आपण करीत असलेले काम असते. आणि जसे आपण शिकलो आहोत, एखाद्या व्यक्तीला तारण्याचे सर्व काम, ख्रिस्ताने केले आहे. म्हणूनच, आपण करू शकू असे कोणतेही काम, तारणाची सुरूवात करू शकणार नाही किंवा तारण मिळवण्यासाठी मदत करू शकणार नाही. विश्वास ठेवणे, म्हणजेच विश्वास असणे, आणि बायबल अगदी सरळपणे असे सांगते की विश्वास हे काम आहे.

आपण 1 थेस्सलनीकाकर, अध्याय 1, श्लोक 3 मध्ये वाचतो :

**आपल्या देवपित्यासमोर तुमचे विश्वासाने केलेले काम, प्रीतीने केलेले श्रम, व आपल्या प्रभु येशू ख्रिस्तावरच्या आशेमुळे धरलेला धीर, ह्यांचे आम्ही निरंतर स्मरण करितो.**

आणि आपण 2 थेस्सलनीकाकर, अध्याय 1, श्लोक 11 मध्ये वाचतो :

**ह्याकरिता तर आम्ही तुम्हांसाठी सर्वदा अशी प्रार्थना करितो की, आपल्या देवाने तुम्हांस झालेल्या ह्या पाचारणाला योग्य असे मानावे आणि चांगुलपणाचा प्रत्येक मनोदय व <u>विश्वासाचे कार्य,</u> सामर्थ्याने पूर्ण करावे.**

*केवळ ख्रिस्तावर विश्वास ठेवण्यामुळे तारण होईल हा निष्कर्ष पूर्णपणे अशक्य आहे.*

अशाप्रकारे, केवळ ख्रिस्तावर विश्वास ठेवण्यामुळे तारण होईल हा निष्कर्ष पूर्णपणे अशक्य आहे. दुर्दैवाने, विश्वास ठेवण्याने आपल्या तारणाला या ना त्या प्रकारे मदत होईल ही शिकवण, तारणाची अशी योजना पुढे आणते, जी गणना 15 मधील त्या व्यक्तीच्या कामासारखी आहे, ज्याने शब्बाथाच्या दिवशी

काटक्या उचलल्या, आणि म्हणूनच, परमेश्वराच्या आज्ञेनुसार, त्याला दगडानी ठेचून ठार मारण्यात आले. लक्षात घ्या, आपण करत असलेले कोणतेही काम, आपल्या तारणामध्ये कोणत्याही प्रकारे मदत करू शकेल, असा विचार आपण एक क्षणभरही करू नये या तत्वाचे चित्र म्हणजे, सातव्या दिवशीचा शब्बाथ.

त्यापाठोपाठ लगेचच, आपल्याला ती आपत्ती दिसते, जी जवळजवळ सर्व मंडळींमध्ये विकसित झाली आहे. एखाद्या व्यक्तीने ख्रिस्तावर विश्वास ठेवण्यास सुरवात केली म्हणून तो तारला गेला आहे असा विचार करणा-या प्रत्येक व्यक्तीला, शब्बाथाच्या दिवशी काटक्या उचलणारी व्यक्ति ज्या परिस्थितीत असते, तशाच परिस्थितीत नेऊन ठेवणारी तारणाची एक योजना ते शिकवतात. ती व्यक्ती अजूनही परमेश्वराच्या क्रोधाखाली आहे. तिथे किती भयंकर स्थिती विकसित झाली आहे!

तर मग हे श्लोक कसे भाषांतरित केले जायला हवे होते? विश्वास ठेवणे हे एक काम आहे हे सत्य लक्षात ठेवून, आपण त्यातील प्रत्येक श्लोकाकडे पाहू.

***अब्राहामाने विश्वास ठेवला आणि म्हणून तो तारला गेला का?***

प्रथम, आपण उत्पत्ति **15**, श्लोक **6** कडे पाहू. बायबलच्या राजा याकोब आवृत्तीमधील भाषांतर खालीलप्रमाणे आहे:

**अब्राहामाने परमेश्वरावर विश्वास ठेविला आणि अब्राहामाचा हा विश्वास, परमेश्वराने त्याचे नीतिमत्त्व गणिला.**

हा श्लोक आपल्याला अशी खात्री देत असल्याप्रमाणे दिसते की अब्राहामाचा विश्वास हा त्याचे नीतिमत्त्व म्हणून गणला गेला, म्हणजेच, त्याने विश्वास ठेवला, म्हणून परमेश्वराने त्याला तारले.

*विश्वास ठेवणे हे आपण करीत असलेले काम आहे आणि आपले काम, आपल्या तारणाचा भाग असू शकत नाही.*

पण ज्याप्रमाणे आपण शिकलो आहोत, तो निष्कर्ष अशक्य आहे, कारण विश्वास ठेवणे हे आपण करत असलेले काम आहे आणि आपले काम, आपल्या तारणाचा भाग असू शकत नाही. जिथे हा श्लोक आढळतो तो संदर्भ आपल्याला असे सांगतो की अब्राहामाचे विश्वास ठेवणे, हे अशा कोणाचे तरी विश्वास ठेवणे होते, जो तारला गेला होता. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की जर परमेश्वराने आपल्याला तारले असेल, तर आपण चांगली कामे करू, पण कोणत्याही मार्गाने, ही चांगली कामे, ज्यांच्यात विश्वास ठेवण्याचा समावेश होतो, त्यांची आपले तारण होण्यासाठी मदत झाली नाही. ती कामे नेहमीच तारले गेल्याचा परिणाम असतात.

आपल्याला नेहमीच या वस्तुस्थितीची जाणीव असली पाहिजे की इब्रीमध्ये, “आणि” हा उभयान्वयी अव्यय, काही वेळा “ह्यासाठी” असा भाषांतरित केला गेला आहे. म्हणूनच, या श्लोकामध्ये “आणि” हा उभयान्वयी अव्यय, “ह्यासाठी” असाच भाषांतरित केला जायला पाहिजे होता.

दुसरी समस्या म्हणजे, “त्याची” या सर्वनामाचे आकलन. “त्याची” हे सर्वनाम योग्यपणे भाषांतरित केले गेले आहे, पण ते कोणत्या नामाचा संदर्भ देते? “त्याची” याचा संदर्भ, अब्राहामाच्या विश्वासाशी आहे का? ते दोन मोठ्या कारणांमुळे अशक्य आहे. पहिले म्हणजे, अब्राहामाच्या विश्वासाची गणना, नीतिमत्त्वात होऊ शकत नव्हती.

दुसरे मोठे कारण म्हणजे, या संदर्भामध्ये, “त्याची” हे सर्वनाम, व्याकरणदृष्टया, एकवचनी स्त्रीलिंगी शब्द आहे. म्हणजेच, त्याचा संदर्भ अशा नामाशी असायला हवा, जे व्याकरणदृष्टया स्त्रीलिंग दाखवते. पण “विश्वास,” हे पुल्लिंगी नाम आहे. म्हणूनच, व्याकरणदृष्टया, ते सर्वनाम अब्राहामाच्या विश्वासाचा संदर्भ देऊ शकत नाही.

दुस-या बाजूला, “नीतिमत्ता” हे स्त्रीलिंगी नाम आहे, आणि ते या श्लोकामध्ये व्यवस्थित बसते. म्हणूनच, उत्पत्ति **15**, श्लोक **6** आपण असा समजून घ्यावा :

**त्याने** [अब्राहामाने] **परमेश्वरावर विश्वास ठेविला; ह्यामुळे** [“आणि” नव्हे] **ते** [देवाचे नीतिमत्त्व] **त्याने** [परमेश्वराने] **त्याचे** [अब्राहामाचे] **नीतिमत्त्व** [अब्राहामाच्या तारणासाठी] **गणिले.**

त्याचप्रमाणे, रोमकर **4:3**, गलतीकर **3:6** आणि याकोब **2:23** मध्ये, जिथे राजा याकोब भाषांतर पुढीलप्रमाणे आहे, “**आणि अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला, त्यामुळे ते नीतिमत्त्व असे गणण्यात आले.**” हे श्लोक ज्याप्रमाणे भाषांतरित केले गेले आहेत, त्यावरून ते असे शिकवीत आहेत असे वाटते की, अब्राहामाचा विश्वास हे ते कारण किंवा साधन होते, ज्याद्वारे परमेश्वराने त्याला तारले. पण, जसे आपण पुन्हा पुन्हा म्हटले आहे, ते अशक्य आहे. म्हणूनच, हे श्लोक योग्यरीत्या भाषांतरित केले आहेत ना, याची खातरजमा आपण केली पाहिजे.

अशाप्रकारे, या भाषांतरामध्ये असे दोन शब्द आहेत, ज्यांच्यामध्ये दुरूस्ती केली गेली पाहिजे, जेणेकरून ते श्लोक, तारणाचे सर्व काम परमेश्वराने केले होते, या बायबलच्या तत्वाशी सुसंगत असतील. पुन्हा, असा पहिला शब्द, जो बदलला गेला पाहिजे तो म्हणजे, “आणि” हे उभयान्वयी अव्यय. तो “त्यामुळे,” असा भाषांतरित केला जावा. इब्री भाषेप्रमाणेच, काहीवेळा, “आणि” हा हेल्लेणी शब्द, “त्यामुळे” असा भाषांतरित केला गेला आहे.

जो दुरूस्त केला गेला पाहिजे असा दुसरा शब्द म्हणजे, “त्याची” असे भाषांतरित केले गेलेले सर्वनाम. व्याकरणदृष्टया, ते तृतीय पुरूषी एकवचन आहे. या संदर्भामध्ये, “त्याची” याचे भाषांतर, “तो” या सर्व नामाप्रमाणे केले पाहिजे. अशाप्रकारे, पुनरूक्तीसाठी, रोमकर **4:3**, गलतीकर **3:6** आणि याकोबा **2:23** पुढील पध्दतीने भाषांतरित केले गेले पाहिजे, “अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला (तो तारला गेला),

त्यामुळे त्याची (देवाची) त्याच्या (अब्राहामाच्या) नीतिमत्त्वासाठी (अब्राहामाच्या तारणासाठी) गणना केली."

### *जर आपण ख्रिस्तावर विश्वास ठेवला, तर कदाचित तो आपल्याला तारेल*

तारणाचे सर्व काम, आपला तारणकर्ता म्हणून येशूकडून केले गेले होते, आणि आपण करत असलेले कोणतेही काम, आपल्या तारणासाठी थोडा देखील हातभार लावू शकते असा विश्वास, आपण कोणत्याही परिस्थितीमध्ये ठेवू नये हे आपण आता शिकलो असल्यामुळे, जे कांही श्लोक याच्या विरूद्ध शिकवीत असल्यासारखे वाटतात, ते आता आपल्याला अधिक चांगल्या रीतीने समजू शकतील.

उदाहरणार्थ, गलतीकर **2**, श्लोक **16** मध्ये परमेश्वर सांगतो :

**तरी मनुष्य, नियमशास्त्रातील कृत्यांनी नीतिमान ठरत नाही, तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे ठरतो, हे जाणून आम्हीहि ख्रिस्त येशूवर विश्वास ठेवला; ह्यासाठी की, आम्ही ख्रिस्तावरील विश्वासाने नीतिमान ठरावे, नियमशास्त्रातील कृत्यांनी नव्हे. कारण नियमशास्त्रातील कृत्यांनी, मनुष्यजातीपैकी कोणीही नीतिमान ठरणार नाही.**

या श्लोकाचा पहिला भाग खूपच स्पष्ट आहे. आपण बायबलच्या कोणत्याही आज्ञेचे पालन (म्हणजेच, नियमांचे पालन) करून तारले जात नाही, तर विश्वासाने (विश्वासाच्या कामाने) तारले जातो, जे येशूने, त्याच्या निवडलेल्यांसाठी केले होते.

पण या श्लोकाचा दुसरा भाग, सहजपणे चुकीच्या पध्दतीने समजून घेतला जाऊ शकतो. तो असे शिकवत असल्यासारखे वाटते की जर आपण ख्रिस्तावर विश्वास ठेवला, तर त्यानंतर परमेश्वर आपल्याला नीतिमान ठरवेल (तारेल). जरी परमेश्वर श्लोकाच्या शेवटच्या भागात पुन्हा-पुन्हा असे सांगतो की **"कारण नियमशास्त्रातील कृत्यांनी, मनुष्यजातीपैकी कोणीही नीतिमान ठरणार नाही,"** तरी हे चुकीचे आकलन शक्य आहे. आणि विश्वास ठेवणे, हे नियमाचे काम आहे.

जर विश्वास ठेवणे हे नियमाचे काम आहे, तर **"मनुष्य, नियमशास्त्रातील कृत्यांनी नीतिमान ठरत नाही, तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे ठरतो, हे जाणून आम्हीहि ख्रिस्त येशूवर विश्वास ठेवला,"** हे आपण कसे समजून घ्यावे? हेल्लेणी व्याकरणानुसार, "नीतिमान ठरू" हा शब्द संकेतार्थ कर्मणीमध्ये आहे. संकेतार्थ क्रियापद हे इंग्रजी भाषेमध्ये जसे वापरल्या जाते, त्याप्रमाणेच ते हेल्लेणी भाषेमध्ये वापरले जाऊ शकते. तसे घडण्याची बरीच शक्यता आहे, असा हेतु ते दर्शविते. बायबलकालीन हेल्लेणीमध्ये, अशी पुष्कळशी संकेतार्थ क्रियापदे याप्रकारे वापरली गेली आहेत.

तथापि, हेल्लेणी भाषेमध्ये, ते हेतू किंवा आज्ञा सूचित करण्यासाठीही वापरण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, सामान्यत: अशा प्रकारची क्रियापदे, नव्या करारामध्ये हे दर्शविण्यासाठी वापरण्यात आली आहेत की जुन्या करारातील भाकीत पूर्ण झालेले आहे. अशाप्रकारे, आपण वाचतो की, संदेष्ट्यांच्या द्वारे जे सांगितले गेले, ते **"पूर्ण व्हावे"** (मत्तय **4:14**, **8:17**, **12:17**). **"पूर्ण व्हावे"** हे संकेतार्थ

क्रियापद आहे. या उदाहरणांमध्ये, संकेतार्थी क्रियापदाच्या वापराने, कोणतीही शंका किंवा अनिश्चितता सुचवल्याचे दिसून येत नाही. भाकीत पूर्ण झाले आहे.

जेव्हा आपण गलतीकर **2:16** कडे परत जातो, तेव्हा आपल्याला हे माहीत आहे की विश्वास हे आपण करत असलेले काम आहे, म्हणून आपल्या विश्वास ठेवण्यामुळे, तारणाची खात्री कधीच मिळू शकत नाही. आपण तारले जावे, प्रार्थना करावी, पश्चात्ताप करावा, या बायबलमधील आज्ञांचे पालन करणे, हे विश्वास ठेवल्यामुळे घडू शकते, पण आपल्याला हे माहीत आहे की आपले तारण, हे पूर्णपणे परमेश्वरावर अवलंबून आहे, आणि त्याने आपल्याला निवडले आहे की नाही आणि आपल्या पापांसाठीचा दंड भरला आहे की नाही, यावर ते अवलंबून आहे.

*आपले तारण, हे पूर्णपणे परमेश्वरावर अवलंबून आहे, आणि त्याने आपल्याला निवडले आहे की नाही आणि आपल्या पापांसाठीचा दंड भरला आहे की नाही, यावर ते अवलंबून आहे.*

म्हणूनच, **"नीतिमान ठरू"** हे संकेतार्थ क्रियापद अशाप्रकारे समजून घेण्यात यावे की नीतिमान ठरणे (तारण होणे) ही शक्यता आहे, पण जे त्याच्यावर विश्वास ठेवण्याचे काम करतात, त्यांच्यासाठी ते कोणत्याही प्रकारचे आश्वासन नाही. योना **3** मधील निनवेकरांनी, ख-या अर्थाने असा विश्वास ठेवला की परमेश्वर त्यांचा **40** दिवसांमध्ये नाश करणार होता. म्हणूनच, त्यांनी पश्चात्ताप करण्याची परमेश्वराची आज्ञा पाळली (योना **3:8-10**). पण त्यांनी हे पूर्णपणे ओळखले की परमेश्वर त्यांच्यावर दया दाखवेल की नाही, हे त्यांना माहीत नव्हते. कदाचित, परमेश्वर त्यांना तारेल. अशी शक्यता होती की ते नाशापासून बचावतील. अशाप्रकारे, गलतीकर **2:16** आपल्याला असे शिकवत आहे की जसे आपण, म्हणजे तारले न गेलेले लोक, परमेश्वराच्या नियमावर विश्वास ठेवतो, तसा कदाचित, परमेश्वर आपल्यापैकी काही जणांना तारण्याची शक्यता आहे.

हे लक्षात घ्या की जोपर्यंत एखादा मनुष्य तारला जात नाही, तोपर्यंत तो परमेश्वराने निवडलेल्यापैकी एक आहे किंवा नाही, हे त्याला माहीत असू शकत नाही, या सत्यावर योएल **2:13-14** मध्ये जोर देऊन सांगितले गेले आहे :

**आपली वस्त्रे नव्हे, तर आपले हृदय फाडा आणि परमेश्वर, तुमचा देव, याजकडे वळा, कारण तो कृपाळू, कन्हवाळू, मंदक्रोध, दयासागर आहे; अरिष्ट आणिल्याबद्दल त्याला वाईट वाटण्यासारखे आहे. परमेश्वर, तुमचा देव, याला कळवळा येऊन, तो मागे वळेल व आपल्यामागे आशीर्वाद ठेवून जाईल की नाही कोण जाणे; असे की जेणेकरून तुम्हांस त्याला अन्नार्पण व पेयार्पण करितां येईल.**

सफन्या **2:3** मध्येही यावर जोर देण्यात आला आहे :

**देशांतील सर्व नम्रजनांनो, परमेश्वराच्या न्यायानुसार चालणा-यांनो, त्याचा आश्रय करा, धार्मिकता व नम्रता यांचे अवलंबन करा, म्हणजे कदाचित, परमेश्वराच्या क्रोधदिनी, तुम्ही दृष्टिआड व्हाल.**

प्रसंगत:, परमेश्वर **2** करिंथकर **2:4** आणि **2** करिंथकर **11:7** या उता-यांमध्ये, काही वेळा असे संकेतार्थ क्रियापद वापरतो, ज्याची रचना, व्याकरणदृष्ट्या, गलतीकर **2:16** मधील **"नीतिमान ठरावे"** या क्रियापदासारखीच केली गेली आहे. **2** करिंथकर **2:4** मधील क्रियापदाचे भाषांतर, **"दु:खी व्हावे,"** आणि **2** करींथकर **11:7** मधील क्रियापदाचे **"उच्च व्हावे,"** असे केले गेले आहे. या दोन्ही श्लोकांमधील संदर्भ असे दर्शवितो की इथे वापरले गेलेले क्रियापद, हे खात्री दर्शविण्यापेक्षा, शक्यता दर्शविण्यासाठी वापरण्यात आले आहे.

## *"विश्वास" हा शब्द समजून घेण्यामधील गोंधळ*

एक मोठा धडा जो आपण शिकत आहोत तो म्हणजे, परमेश्वराने त्याचा तारणकार्यक्रम, हा समजून घेण्यासाठी अजिबात सोपा बनवला नाही. परमेश्वराने "विश्वास ठेवणे" हे क्रियापद आणि "श्रद्धा" हे नाम, पुष्कळशा श्लोकांमध्ये वापरले आहेत, आणि केवळ शास्त्रलेखांची तुलना शास्त्रलेखांशी करण्याच्या परमेश्वराच्या नियमाचे काळजीपूर्वक पालन करण्याने, आणि परमेश्वराकडून शहाणपणा मिळवण्याचा प्रयत्न करण्यानेच, आपल्याला या अवघड श्लोकांची एकमेकाशी सुसंगति लागायला लागू शकते.

*परमेश्वराने त्याचा तारणाचा कार्यक्रम, हा समजून घेण्यास अजिबात सोपा बनवला नाही.*

विश्वास ठेवण्याविषयीची पुष्कळ तत्वे आहेत, जी खास करून उठून दिसतात, ती खालीलप्रमाणे आहेत:

**1.** "विश्वास ठेवणे" हे क्रियापद आणि "श्रद्धा" हे नाम, नेहमीच असे काम म्हणून ओळखले जावे, जे करण्यात येते. याचे कारण हे की निवडलेल्यांना तारण्यासाठी आवश्यक असणारे सर्व काम, येशूने केले, आणि त्याचे नाव "विश्वसनीय" होते (प्रकटीकरण **19:11**). तो श्रद्धेच्या कामाचे सार आहे.

**2.** जेव्हा एखादा मनुष्य, कितीही प्रमाणात विश्वास ठेवतो, तेव्हा त्याचे विश्वास ठेवणे, हे तो करत असलेले काम असते, जे त्याच्या तारणासाठी आवश्यक असणा-या कामाचा भाग, कधीच बनू शकत नाही. जेव्हा तो विश्वास ठेवतो, तेव्हा त्याचे कारण कदाचित हे असेल की, त्याची सदसद्विवेकबुद्धि, त्याला विश्वास ठेवण्यास भाग पाडत आहे, किंवा कदाचित, त्याच्यामध्ये परमेश्वरच कार्य करत आहे. तथापि, कोणती शक्यता खरी आहे हे समजून घेण्याचा त्याच्याकडे कोणताही मार्ग नसतो, कारण जोपर्यंत तो तारला जात नाही, तोपर्यंत त्याचे हृदय अतिशय दुष्ट असते, आणि तो सर्वस्वी, त्याच्या अंत:करणापासून विश्वास ठेवू शकत नाही.

**3.** तारला गेल्यानंतर जेव्हा एखादा मनुष्य विश्वास ठेवतो, तेव्हा ते देखील तो करत असलेले काम असते. तथापि, त्याचे विश्वास ठेवणे हे अंत:करणापासून असेल, कारण ज्याक्षणी परमेश्वराने त्याला तारले, त्याक्षणी त्याला नवीन हृदय देण्यात आले. त्याचे अंत:करणापासून विश्वास ठेवणे (तारले जाणे) याचा अर्थ असा होतो की, जगाच्या अंताच्यावेळी त्याच्या तारणाची संपूर्ण पूर्तता होईल, जेव्हा त्याला त्याचे सार्वकालिक पुनरूत्थित आध्यात्मिक शरीर देण्यात येईल. हे असे आहे कारण, आपल्याला तारण्याचे जे काम ख्रिस्ताने केले, त्यामुळे आपल्या संपूर्ण व्यक्तिमत्वाचे तारण साधले गेले आणि त्याची खात्री मिळाली. म्हणूनच, बायबलमध्ये केलेला "विश्वास" आणि "श्रद्धा" या शब्दांचा वापर, जेव्हां

एखाद्या व्यक्तीच्या कृतीवर लागू केला जातो, तेव्हां त्याचा संबंध अशा कोणत्याही प्रकारच्या साधनाशी किंवा पद्धतीशी कोणत्याही प्रकारे लावला जाऊ शकत नाही, की ज्यायोगे आपण आपल्या तारणाची सुरूवात करू किंवा आपल्या तारणाला हातभार लावू.

**4.** या तत्वांचे पालन न करणा-या कोणत्याही तारणकार्यक्रमाचे अनुसरण करणारी व्यक्ति, परिणामकारकरीत्या त्याच परिस्थितीत असते, जिच्यात शब्बाथच्या दिवशी काटक्या उचलणारा तो मनुष्य होता (गणना **15**). त्याला देहदण्ड होईल. त्याच्या जीवनाचा तो भयानक अंत टाळण्याचा एकमेव मार्ग म्हणजे, मानवनिर्मित तारणकार्यक्रमापासून दूर जाणे, आणि जर खरोखरच त्याला तारण्याची परमेश्वराची इच्छा असेल, तर त्याच्या तारणासाठीचे सर्व काम परमेश्वराने करण्याची वाट पाहणे.

### *सैतान हा तेजस्वी देवदूताप्रमाणे येतो*

बायबलमध्ये दिलेल्या तारणयोजनेऐवजी इतर कोणत्याही तारणयोजनेवर विश्वास ठेवण्याचे भयंकर परिणाम, आता आपण बायबलमधून शिकलो असल्यामुळे, आपल्याला कोण शिकवीत आहे, याविषयी आपण खूप काळजी घेतली पाहिजे. हे असे क्षेत्र आहे, जिथे सैतान हा तेजस्वी देवदूत बनून येऊ शकतो, आणि त्याचे सेवक, नीतिमत्वाचे सेवक म्हणून येऊ शकतात (**2** करिंथकर **11:13-15**).

पुष्कळशा उपदेशकांना आणि सुवार्तिकांना, बायबलशी प्रामाणिक असल्याबद्दल मोठा आदर दिला जातो. त्यांना उच्च अधिकार देण्यात येतात. परमेश्वराचे सेवक म्हणून त्यांचा चांगला नावलौकिक असतो. ते असे शिकवतात की बायबल हे अचूक ईश्वरी वचन आहे. त्यांची प्रवचने थेट बायबलमधूनच केली जातात. आणि मग, तारणाचे महत्व आणि तारणाबरोबर येणा-या आशीर्वादांच्या संदर्भात ते म्हणतात, “तुम्ही देखील आज रात्री तारले जाऊ शकता. परमेश्वराचा पुत्र म्हणून येशूवर विश्वास ठेवा, आणि तुमचा तारणकर्ता म्हणून त्याचा स्वीकार करा.” ते या गोष्टी प्रोत्साहन म्हणून, प्रेमळपणे, आस्थापूर्वक घोषित करतात. ते परमेश्वराचे खरे सेवक आहेत, याचे सर्व प्रकारचे पुरावे असल्यासारखे वाटते. ते थेट बायबलमधूनच परमेश्वराच्या नावामध्ये उपदेश करत नाहीत का?

*जो तारणकार्यक्रम खात्रीने त्यांचा नाश करेल, त्याचे अनुकरण करण्यास त्यांना ठकविण्यात आले आहे.*

आणि ते जो तारणकार्यक्रम सादर करतात, तो खूप सुंदर वाटतो, कारण लोक असा विचार करतात, “मला देखील, या क्षणी, हे माहीत होऊ शकते की माझ्या पापांना क्षमा मिळाली आहे, आणि मी सर्व काळासाठी ख्रिस्तामध्ये सुरक्षित असेन.” त्यामुळे, जे लोक या बायबल शिक्षकांवर विश्वास ठेवतात, आणि त्यांनी दाखविलेल्या मार्गाने चालतात, त्यांची अशी खात्री पटते की ते ख्रिस्तामध्ये सर्वकाळासाठी सुरक्षित आहेत. जो तारणकार्यक्रम खात्रीने त्यांचा नाश करेल, त्याचे अनुकरण करण्यास त्यांना ठकविण्यात आले आहे. चुकीच्या सुवार्तेवर विश्वास ठेवण्यास त्यांना ठकविले गेले आहे. आणि दुर्दैवाने, ते त्या माणसाप्रमाणे आहेत, ज्याने शब्बाथच्या दिवशी कांही काटक्या उचलल्या.

**2** करिंथकर **11:14** मध्ये, परमेश्वर सावध करतो की सैतान, हा तेजस्वी देवदूत (संदेष्टा) बनून येतो. ख्रिस्त हा खरा प्रकाशाचा संदेष्टा आहे. पण सैतान, त्याच्या नीतिमत्वाच्या सेवकांमार्फत, अगदी

ख्रिस्तासारखा वाटतो. ते उपदेशक, हे सेवक, म्हणजे ढोंगी ख्रिस्त आहेत, नकली ख्रिस्त आहेत. त्यांचा खरोखरच असा विश्वास आहे की ते ख्रिस्ताची सेवा करत आहेत, पण वास्तविकत:, त्यांचा स्वामी, म्हणजे ख्रिस्तविरोधी सैतान आहे.

त्यांची उपदेशाची पद्धत, जी बायबलच्या अत्यंत सन्मान्य शिक्षकांप्रमाणे असते, ती सर्वत्र आढळू शकते. पण प्रत्येक ठिकाणी, या वस्तुस्थितीचे खूप मोठे उल्लंघन आढळते की एखाद्या व्यक्तीला तारण्यासाठी आवश्यक असणारे सर्व काम, ख्रिस्ताने केले, आणि त्या व्यक्तीच्या जन्म होण्याच्या खूपच अगोदर, त्याच्या सर्व पापांसाठीचा दंड ख्रिस्ताने भरला. खरोखर, बायबल जे काही शिकवते, ते हे आहे, आणि हे अत्यावश्यक आहे की आपण संपूर्ण बायबलकडे लक्ष द्यावे, आणि आपल्याला हे कळावे की आपल्या तारणासाठीचे सर्व गौरव, हे ख्रिस्तालाच मिळाले पाहिजेत, आपल्याला नाही.

या उपदेशकांना आणि सुवार्तिकांना खरोखरच असे वाटते की ते, ख्रिस्ताचे लायक, प्रामाणिक सेवक आहेत. पण वास्तविकत:, ते सैतानाचे, **“नीतिमत्त्वाचे सेवक”** असतात (**2** करिंथकर **11:15**) . ते येशू ख्रिस्ताचे नाव घेऊन येतात, पण वास्तविकत:, ते अशा सैतानाचे सेवक आहेत, जो तेजस्वी देवदूत म्हणून येतो (**2** करिंथकर **11:14**). स्वत:च स्वत:चे तारण करा अशा त्यांच्या योजनेमध्ये, ते एक खूप मोठे असत्य आणत आहेत, कारण त्यांचा मालक सैतान, हा लबाडीचा बाप आहे (योहान **8:44**). किती भयंकर! अशा सर्व प्रिय लोकांचा विचार करा, जे त्यांचे ऐकतात आणि त्यांच्यावर विश्वास ठेवतात, आणि जसे ते या खोट्या गोष्टींना सत्य म्हणून स्वीकारतात, तसे ते अशा मार्गामध्ये अडकत आहेत, जिथे अजिबात आशा नाही.

आणि म्हणूनच, कृपया, हे अत्यंत महत्वाचे आहे. कदाचित, कित्येक वर्षांपासून तुमचा असा विश्वास होता की तुम्ही तारले गेला होता, कारण तुम्हाला असे शिकवण्यात आले होते की जर तुम्ही, तुमचा तारणकर्ता म्हणून येशूचा “स्वीकार केला,” तर तुम्ही तारले जाता. कदाचित, तुम्ही तुमच्या मंडळीचे कबुलीजबाब देणारे सभासद म्हणून काम केले, आणि म्हणूनच, पुष्कळ वर्षांपासून, तुमची अशी खात्री होती की तुम्ही येशूच्या बाहूंमध्ये सुरक्षित होता.

आणि आता, तुम्हाला असे आढळते की तुमची स्थिती, शब्बाथच्या दिवशी काटक्या उचलणा-या माणसाप्रमाणेच आहे, आणि तुम्हाला खूप भीति वाटते. तुम्ही अजूनही परमेश्वराच्या क्रोधाखाली आहात, आणि तुमच्या नाशाची वाट पाहत आहात. जर तुम्ही बायबलचे शिक्षक असाल, आणि पुष्कळशा लोकांना शिकवत आला असाल, आणि तुम्ही स्वत:च स्वत:चे तारण करा या योजनेमध्ये त्यांना अडकवले असेल व त्यांना त्यांच्या नाशाकडे नेले असेल, तर ते अधिकच वाईट आहे.

आणि म्हणूनच, हे प्रश्न तुम्हाला सोडणार नाहीत असे वाटते : “माझ्यासाठी काही आशा असू शकेल का? असे होऊ शकते का की परमेश्वर माझ्या सर्व पापांना क्षमा करेल आणि मलादेखील तारेल?”

बायबलमधील उत्तर आहे, ख्रिस्त हा पापी लोकांसाठी आला. इतर कोणत्याही तारल्या न गेलेल्या व्यक्तीइतकीच आशा तुम्हालाही आहे. तुम्ही देखील चुकीच्या सुवार्तेचे अनुसरण करण्याच्या पापाचे

प्रायश्चित करावे, आणि प्रार्थना करावी, आणि अशी आशा करावी की कदाचित, परमेश्वराने त्याच्या दयेमध्ये, तुम्हाला तारणासाठी निवडले असेल.

आश्चर्यकारकपणे, स्वत:च स्वत:ला तारण्याचे हे कार्यक्रम, प्रत्येक संप्रदायामध्ये आहेत. ते कसे काय असू शकते? समस्या ही आहे की या मंडळी, संपूर्ण बायबल वापरत नाहीत, आणि ते शास्त्रलेखाची तुलना शास्त्रलेखाशी करण्याची बायबलची सूचना, काळजीपूर्वक पाळत नाहीत. याशिवाय, त्यांना हेही समजत नाही की बायबल, हे पृथ्वीवरील भाषेमध्ये लिहिले गेले आहे, पण जोपर्यंत या पृथ्वीवरील ऐतिहासिक विधानांमध्ये दिलेली आध्यात्मिक शिकवण आपल्याला सापडत नाही, तोपर्यंत बायबलचा मोठा संदेश आपल्याला समजू शकत नाही. दुस-या शब्दात, त्यांच्याकडे बायबलच्या स्पष्टीकरणाची चुकीची पद्धत, चुकीचे भाषार्थशास्त्र आहे (मार्क **4:33-34**). तथापि, तिथे या चुकीच्या सुवार्ता, हे बायबलमध्ये नसलेले तारणकार्यक्रम, मंडळींमध्ये का प्रचलित आहेत, याचे एक व्यावहारिक कारण आहे.

## *मंडळींना शुद्ध ठेवणे शक्य होते का?*

प्रत्येक धर्मसंप्रदाय, हा एका सापळ्यामध्ये अडकलेला आहे, आणि जे काही घडले आहे, ते हेच आहे. सभांमधील आध्यात्मिक सत्ताधा-यांची कदाचित अशी योग्य इच्छा असावी की मंडळी शक्य तितकी शुद्ध, असावी, आणि अशाप्रकारे, त्यांना त्यांच्या मंडळीचे सभासद म्हणून, केवळ खरोखरच तारल्या गेलेल्या व्यक्ती हव्या होत्या. या त्यांच्या प्रयत्नांमध्ये त्यांना मदत व्हावी म्हणून, प्रत्येक मंडळी किंवा संप्रदायाने एक संरचना, एक पद्धत किंवा योजना स्थापन केली, ज्यायोगे हे ध्येय साध्य करण्याची त्यांना आशा होती. त्यांची संरचना किंवा योजना म्हणजे एखादी एवढी साधी अट असू शकत होती, की भावी सभासदाने, विश्वासाचा कबुलीजबाब द्यावा, किंवा त्याचा तारणकर्ता म्हणून त्याची ख्रिस्तावर श्रद्धा होती, असे कबूल करावे. तथापि, सामान्यत:, मंडळी चालवणा-यांना त्या व्यक्तीचा जलबाप्तिस्मा झालेला असणे, आणि त्या संप्रदायाचा सभासद म्हणून, त्याने त्या मंडळीच्या सर्व शिकवणुकींचे प्रामाणिकपणे पालन करण्याचे वचन देणे, हे सुद्धा गरजेचे वाटे.

*तारणाची खात्री मिळावी म्हणून, त्यांनी विकसित केलेल्या संरचनेचे किंवा कार्यपध्दतीचे अनुसरण केले गेले पाहिजे असे जे ते म्हणतात, त्यामुळे खरेतर उलट परिणाम होतो.*

दुर्देवाने, चर्चकडून निवडल्या गेलेल्या संरचनेमध्ये किंवा पद्धतीमध्ये, बायबलच्या एका मूलभूत तत्वाचा समावेश नसतो; म्हणजेच, जेव्हा आपण परमेश्वराच्या कोणत्याही आज्ञेचे पालन करतो व असा विश्वास ठेवतो की हा आज्ञाधारकपणा आपल्या तारणासाठी मदत करेल, तेव्हा आपण अशा माणसाप्रमाणे असतो, ज्याने शब्बाथच्या दिवशी काही काटक्या उचलल्या (गणना **15**). आपण अजूनही परमेश्वराच्या क्रोधाखाली आहोत. अशाप्रकारे, तारणाची खात्री मिळावी म्हणून, त्यांनी विकसित केलेल्या संरचनेचे किंवा कार्यपध्दतीचे अनुसरण केले गेले पाहिजे असे जे ते म्हणतात, त्यामुळे खरेतर उलट परिणाम होतो. ते त्या व्यक्तीला तारल्या न गेलेल्या स्थितीत ठेवण्यास मदत करते.

या दु:खद स्थितीमुळे हे समजण्यास मदत होते की, आपल्या काळात, वस्तुस्थिती अशी आहे की बहुतेक सर्व मंडळीमध्ये, बहुतांश लोक, या धोक्याच्या सूचनेकडे लक्ष देत नाहीत की मंडळीमध्ये आता सैतान

राज्य करत आहे, आणि त्यांनी मंडळीतून पळून जावे, जेणेकरून ते तेथे आध्यात्मिकदृष्ट्या सैतानाची सेवा करत नसतील. आणि ते धोक्याच्या या गंभीर सूचनेकडे लक्ष देत नाहीत की जगाचा अंत अगदी जवळ आला आहे. (या विषयांवरील अधिक माहितीसाठी, कृपया फॅमिली रेडिओशी संपर्क साधा आणि *आपण जवळजवळ तिथं पोहचलोच आहोत, काळाला अंत आहे, मंडळीयुगाचा अंत आणि त्यानंतर* आणि *गहू व निंदण,* या मोफत पुस्तकांची मागणी करा.)

बायबलनुसार नसलेली तारणसंरचना किंवा तारणयोजना, मंडळीमध्ये सर्वसामान्य असून देखील, सबंध मंडळीयुगभर, काही थोडयाशा व्यक्ती तारल्या गेल्या. कदाचित, त्यांच्याकडे त्या मंडळीच्या शिकवणुकीचे अतिशय कमी किंवा बरेचसे आकलन असेल, पण परमेश्वराने त्यांना तारले, कारण त्यांची निवड तारणासाठी झाली होती. ते बायबलच्या श्रवणाखाली किंवा उपदेशाखाली होते, आणि परमेश्वराने त्यांना तारले. अशाप्रकारे, बायबलच्या कोणत्याही किंवा सर्व शिकवणुकींशी प्रामाणिक राहण्याची, त्यांच्यामध्ये तीव्र आणि सततची इच्छा होती. त्यांचे बायबलचे ज्ञान, कदाचित अतिशय कमी असून सुद्धा हे असे होते.

*आपण असे शिकवले पाहिजे की तारल्या न गेलेल्या व्यक्तीने, परमेश्वराच्या नियमांचे पालन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, आणि अशी आशा केली पाहिजे आणि प्रार्थना केली पाहिजे की परमेश्वराच्या तारणयोजनेमध्ये, कदाचित त्यांचा देखील समावेश होईल.*

मंडळी हे समजून घेण्यामध्ये अपयशी ठरल्या आहेत की माणसाकडून विकसित झालेल्या कोणत्याही संरचनेचे किंवा योजनेचे, जरी प्रयत्नपूर्वक अनुकरण केले गेले, तरी ती माणसाला तारणाची खात्री देऊ शकत नाही, आणि त्यांचे अपयश, हे आपल्या सर्वांसाठी मोठी धोक्याची सूचना असली पाहिजे. जसे आपण जगभर सुवार्तेचा प्रसार करतो, तशी आपण मानवनिर्मित योजना किंवा संरचना सादर करू नये आणि असे म्हणू नये की जर या योजनेचे काळजीपूर्वक अनुकरण केले गेले, तर ते तारणाची खात्री देई ल. आपण असे शिकवले पाहिजे की तारल्या न गेलेल्या व्यक्तीने, परमेश्वराच्या नियमांचे पालन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, आणि अशी आशा केली पाहिजे आणि प्रार्थना केली पाहिजे की परमेश्वराच्या तारणयोजनेमध्ये, कदाचित त्यांचा देखील समावेश होईल.

## *एक शक्तिशाली परिवर्तन*

आता, हा प्रश्न विचारला गेला पाहिजे: तारण एखादया व्यक्तीच्या जीवनावर कसा परिणाम करते, आणि नव्याने जन्मणे, याचा अर्थ काय आहे?

लक्षात घ्या, एखादा मनुष्य तारला जाण्याअगोदर, त्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्वामध्ये, तो अगदी अशा निवडल्या न गेलेल्या सर्व लोकांप्रमाणे होता, जे कधीही तारले जाणार नाहीत. शरीर आणि आत्म्यामध्ये त्याने पापाची वासना केली आणि परमेश्वराविरूध्द बंडखोरी केली.

पण आता, जेव्हा तो तारला गेला आहे, तेव्हा त्याला नवीन पुनरूत्थित आत्मा देण्यात आला आहे. त्याच्या व्यक्तिमत्वाच्या त्या भागामध्ये, तो आता ख्रिस्तामधील नवीन प्राणी आहे. जेव्हा तो शरीराने

जन्मला होता, तेव्हा तो एक असे अर्भक होता, ज्याचे व्यक्तित्त्व शरीर आणि आत्मा यांनी बनलेले असते. तारणाच्या क्षणी, त्याचा नव्याने जन्म होतो, म्हणजेच, त्याला नवीन आत्मा देण्यात येतो. हा एक असा चमत्कार आहे, जो आपली मानवी मने समजू शकत नाहीत, आणि या परिवर्तनाचा कोणताही शारिरीक पुरावा नाही.

तथापि, त्याच्या आत्म्याच्या या आश्चर्यकारक परिवर्तनाचा परिणाम दिसू शकतो, म्हणजेच, त्या माणसाच्या न बदलेल्या शरीरातील नवीन कोरा आत्मा, त्याच्या जीवनावर अत्यंत गंभीरपणे प्रभाव पाडेल, आणि त्याच्या वागणुकीमध्ये बदल होईल.

**1** योहान **3:9** मधील परमेश्वराच्या घोषणेने हे सिद्ध होते, जिथे तो म्हणतो :

**जो कोणी देवापासून जन्मलेला आहे, तो पाप करीत नाही; कारण त्याचे बीज त्याच्यामध्ये राहते; त्याच्याने पाप करवत नाही, कारण तो देवापासून जन्मलेला आहे.**

*परमेश्वर आपल्याला असे शिकवतो की तारणाच्या क्षणी, तारल्या गेलेल्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वामध्ये, प्रचंड मोठा बदल घडून येतो.*

या श्लोकामध्ये, परमेश्वर आपल्याला असे शिकवतो की तारणाच्या क्षणी, तारल्या गेलेल्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वामध्ये, प्रचंड मोठा बदल घडून येतो. त्याच्या नवीन पुनरूत्थित आत्म्यामध्ये, तो पाप करू शकत नाही. पाप हे परमेश्वराच्या नियमाचे उल्लंघन असल्यामुळे, त्याचा अर्थ असा होतो की त्याच्या व्यक्तिमत्वामधील आत्म्याच्या भागामध्ये, तो पापाची सुरूवात करू शकत नाही. त्याचा अर्थ असा आहे की त्याच्या व्यक्तिमत्वामधील आत्म्याच्या भागामध्ये, तो परमेश्वरावर व त्याच्या नियमांवर प्रेम करतो. म्हणजेच, बायबलच्या सर्व आज्ञाचे पालन करण्याची, त्याला सततची व मोठी इच्छा असते. त्याचा अर्थ असा होतो की त्याच्या नवीन आत्म्यामध्ये, आता तो आध्यात्मिकदृष्टया जिवंत आहे.

परमेश्वराने त्याचे तारण साधण्यासाठी सर्वकाही केले असल्यामुळे, (म्हणजेच, त्याला निवडले, त्याच्या पापांसाठीचा दंड भरला व त्याला नवीन पुनरूत्थित आत्मा दिला, जे सर्व निवडल्या गेलेल्यांच्या तारणासाठी आवश्यक आहे), ती व्यक्ति याची खात्री बाळगू शकते की ती तिचे तारण गमावू शकत नाही. म्हणूनच, खरा श्रद्धाळू त्याचे तारण कधीच गमावू शकत नाही. बायबल म्हणते, असे कोणतेही पाप नाही किंवा इतर काहीही नाही, जे परमेश्वराच्या प्रेमापासून, ख-या श्रद्धाळूला वेगळे करू शकेल (रोमकर **8:35-39**).

## *तारला गेलेला मनुष्य, तारल्या न गेलेल्या शरीरामध्ये जगतो*

श्रद्धाळूला त्याच्या नवीन आत्म्याच्या ठायी, अजूनही त्याच्या जुन्याच शरीरामध्ये रहावे लागते, जे तारणाच्या क्षणी अजिबात बदलले गेले नव्हते. त्यामुळेच, तो एक असे व्यक्तित्त्व बनला आहे, ज्यात एकमेकांसोबत अस्तित्त्वात राहू न शकणा-या अशा दोन इच्छा असतात. एकीकडे, त्याला नेहमीच

परमेश्वराच्या नियमांचे पालन करावेसे वाटते, तर दुसरीकडे, तो अजूनही पापाची वासना करतो. जेव्हां पवित्र आत्म्याच्या प्रेरणेखाली, प्रेषित पौल, रोमकर **7:21-24** मध्ये हे जाहीर करतो, तेव्हां परमेश्वर या अवघड स्थितीचे वर्णन करतो :

**तर मग जो मी सत्कर्म करू इच्छितो, त्या माझ्याजवळ वाईट आहेच, असा नियम मला आढळतो. माझा अंतरात्मा देवाच्या नियमशास्त्रामुळे हर्ष करितो; तरी माझ्या अवयवात मला निराळाच नियम दिसतो; तो माझ्या मनातल्या नियमांबरोबर लढतो आणि मला कैद करून, माझ्या अवयवातील पापाच्या नियमाच्या स्वाधीन करितो. किती मी कष्टी माणूस! मला ह्या मरणाधीन असलेल्या देहापासून कोण सोडवील?**

आपल्या पापी शरीरापासून मुक्त होणे, ही प्रत्येक ख-या श्रद्धाळूची सततची इच्छा असते. तथापि, तारल्या गेलेल्या व्यक्तीमध्ये चाललेली रस्सीखेच, ही निष्क्रीय नाही. ज्या व्यक्तीकडे नवीन पुनरूत्थित आत्मा आहे, त्या व्यक्तीची, अधिकाधिक विजयी जीवनाच्या दिशेने प्रगती होईल (**2** पेत्र **3:18**). हे सत्य आहे, कारण त्याला नवीन पुनरूत्थित आत्मा देण्यात आला आहे या वस्तुस्थितीच्या व्यतिरिक्त, तारणाच्या क्षणी, त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वामध्ये आणखी एक आश्चर्यकारक घटना घडली; म्हणजे, त्या व्यक्तीच्या जीवनामध्ये, परमेश्वर पवित्र आत्म्याने राहण्यास सुरवात केलेली आहे. रोमकर **8:9** मध्ये आपण असे वाचतो की जर आपल्याकडे परमेश्वराचा आत्मा नसेल, तर आपण "त्याचे असणा-यांपैकी" नाही.

सर्वशक्तिमान परमेश्वर तारल्या गेलेल्या व्यक्तीच्या जीवनामध्ये कसा वास करू शकतो, हे आपल्याला समजत नाही. आपण हे मान्य केलेच पाहिजे की हे आपल्यासाठी पूर्णपणे गूढ आहे. पण आपण बायबलवर संपूर्ण विश्वास ठेवत असल्यामुळे, आपल्याला माहीत असते की ती वस्तुस्थिती आहे; ते गूढ व सत्य आहे. तारल्या गेलेल्या व्यक्तीच्या जीवनामध्ये प्रत्यक्ष परमेश्वर वसत असणे, हे त्या व्यक्तीस परमेश्वराचे आज्ञापालन करण्यास आणखी प्रोत्साहित करते, आणि परमेश्वराला संतोषकारक असेल, अशाच गोष्टीची त्याला इच्छा असते.

*तारली गेलेली व्यक्ति, सैतानाच्या सत्तेखालून बाहेर काढली गेली आहे, आणि ती, ख्रिस्ताच्या राज्याची सार्वकालिक नागरिक बनली आहे.*

याशिवाय, तारली गेलेली व्यक्ति, सैतानाच्या सत्तेखालून बाहेर काढली गेली आहे, आणि ती, ख्रिस्ताच्या राज्याची सार्वकालिक नागरिक बनली आहे. कलस्सैकर **1:12-13** मध्ये परमेश्वर आपल्याला याविषयी सांगतो, जिथे आपण वाचतो :

**आणि ज्याने तुम्हांला प्रकाशातील पवित्र जनांच्या वतनाचे विभागी होण्याजोगे केले, त्या पित्याची तुम्ही उपकारस्तुति करावी. त्याने आपल्याला अंधाराच्या सत्तेतून काढून, आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणून ठेवले.**

फिलिप्पैकर **3:20** मध्ये, आपण असे वाचतो की आपले "संभाषण," जे अधिक चांगल्या रीतीने "नागरिकत्व" असे भाषांतरित केले गेले आहे, ते स्वर्गामध्ये आहे. तारल्या जाणा–या प्रत्येक व्यक्तिबाबत हे सत्य आहे.

### *तारल्या गेलेल्या मनुष्याच्या इच्छा*

तारणाच्या क्षणी, श्रद्धाळूच्या जीवनामध्ये अशा पुष्कळ गोष्टी कार्यरत असतात, ज्या त्याच्या वागणूकीमध्ये आणि इच्छांमध्ये, अत्यंत महत्वाचे आणि ठरवलेले बदल घडवून आणतात. स्तोत्रसंहिता **119** मध्ये, तसेच बायबलमध्ये इतरत्र सापडणारी विधाने त्याला समजतील आणि तो ती स्वीकारेल.

स्तोत्रसंहिता **119** मध्ये आढळलेल्या सुंदर भाषेचे काही नमुने खाली दिले आहेत, जे ख–या श्रद्धाळूला बायबलविषयी असणारे प्रेम आणि आदर दाखवितात.

श्लोक **10** : **अगदी मनापासून मी तुझा शोध केला आहे; तुझ्या आज्ञांपासून मला बहकू देऊ नकोस.**

श्लोक **11** : **मी तुझ्याविरूद्ध पाप करू नये म्हणून, मी आपल्या मनात तुझे वचन जपून ठेविले आहे.**

श्लोक **16** : **मी तुझ्या नियमांनी आनंदित होईन; मी तुझे वचन विसरावयाचा नाही.**

श्लोक **24** : **तुझे निर्बंध मला आनंददायी आहेत. ते माझे मंत्री आहेत.**

श्लोक **47** : **मी तुझ्या आज्ञांत आनंद मानीन, त्या मला प्रिय आहेत.**

श्लोक **77** : **माझ्यावर करूणा कर म्हणजे मी जगेन; कारण तुझ्या नियमशस्त्राात मला आनंद आहे.**

श्लोक **97** : **अहाहा, तुझे नियमशास्त्र मला किती प्रिय आहे! दिवसभर मी त्याचे मनन करितो.**

अशा प्रकारची विधाने, संपूर्ण बायबलमध्ये आढळू शकतात. जो खरोखरच तारला गेला आहे अशा कोणाच्याही जीवनामध्ये, त्याला अशा इच्छा आणि उत्तेजनांचा अधिकाधिक अनुभव येईल. अशाप्रकारे, **1** योहान **2:3-5** मध्ये सांगितल्या गेलेली सत्ये त्याला समजतील आणि तो त्यांचा स्वीकार करेल, जिथे आपण वाचतो :

**आपण त्याच्या आज्ञा पाळल्या तर त्यावरून आपणांस कळून येते की, आपण त्याला ओळखतो. मी त्याला ओळखतो असे म्हणून त्याच्या आज्ञा जो पाळीत नाही, तो लबाड आहे, त्याच्या ठायी सत्य नाही. जो कोणी त्याच्या वचनाप्रमाणे चालतो, त्याच्यामध्ये देवाची प्रीति खरोखर पूर्णत्व पावली आहे. ह्यावरून आपल्याला कळून येते की, आपण त्याच्या ठायी आहों.**

ख-या श्रद्धाळूला हे माहीत असते की परमेश्वराच्या आज्ञांमध्ये, संपूर्ण बायबलचा समावेश आहे. जेव्हा तो त्याच्या शरीराच्या अशा वासनायुक्त इच्छांना पाप करू देतो, तेव्हा त्याच्यामध्ये असणा-या भयंकर भावनेविषयीही त्याला माहीत असते. खरोखर परमेश्वराचा माणूस असणारा दावीद, जो खूप गंभीर पापामध्ये पडला, त्याच्या भावना तो जाणतो. आणि त्यानंतर, दावीदाने त्याचा मन:पूर्वक पश्चात्ताप, पवित्र आत्म्याच्या प्रेरणेखाली नोंदविला, ज्याबद्दल आपण स्तोत्रसंहिता **51** मध्ये वाचतो.

### *भीती आणि थरथरणे*

खरोखरच तारल्या गेलेल्या व्यक्तीच्या व्यक्तित्त्वाचा एक पैलू म्हणजे, त्याची परमेश्वराच्या पावित्र्याची आणि नीतिमत्वाची त्याला ओळख पटणे, आणि ही वस्तुस्थिती समजणे की परमेश्वर हाच या संपूर्ण जगाचा नीतिमान न्यायाधीश आहे. फिलिप्पैकर **2:12** मध्ये परमेश्वर म्हणतो :

**... भीत व कापत आपले तारण साधून घ्या.**

श्रद्धाळूने त्याच्या जीवनामध्ये जे तारण "साधून घेतले" पाहिजे, ते परमेश्वराने त्याला दिलेले तारण आहे. पण जसा तो कृपेमध्ये वाढतो (**2** पेत्र **3:18**), म्हणजेच, तो अधिकाधिक परमेश्वराच्या गौरवासाठी, आणि त्याच्या तारल्या न गेलेल्या शरीराच्या पापी वासनांपासून दूर, अशा पद्धतीने जगतो, तेव्हां तो असे भीतीने आणि थरथरत करतो.

*अजूनही परमेश्वरासमोर घाबरणे व थरथर कापणे, हे कदाचित तारल्या गेलेल्या व्यक्तीला देण्यात आलेल्या अद्‌भुत सुरक्षिततेशी पूर्णपणे विसंगत वाटेल.*

हे अत्यंत आश्चर्यकारक विधान आहे, कारण आपल्या तारणाचा परिणाम म्हणून परमेश्वराची सर्व भीती नाहीशी केली जाईल, अशी अपेक्षा आपण कदाचित करू. अजूनही परमेश्वरासमोर घाबरणे व थरथर कापणे, हे कदाचित तारल्या गेलेल्या व्यक्तीला देण्यात आलेल्या अद्‌भुत सुरक्षिततेशी पूर्णपणे विसंगत वाटेल. उदाहरणार्थ, त्याला हे माहीत आहे की ख्रिस्ताने त्याच्या सर्व पापांसाठीचा दंड भरला आहे, आणि त्याला हेही माहीत आहे की त्याला संपूर्ण विनाशाच्या शक्यतेची धमकी दिली जाणार नाही.

तथापि, आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की तारल्या गेलेल्या व्यक्तीमध्ये पवित्र आत्मा वास करतो. आणि बायबल जे सर्व काही शिकवते, त्याच्यावर अधिकाधिक प्रेम करण्यास व त्याचा आदर करण्यास, ख-या श्रद्धाळूने सुरवात केली आहे. म्हणूनच, तो परमेश्वराच्या महानतेविषयी शिकतो आणि त्याबद्दल अधिकाधिक जागरूक बनतो. त्याला हे माहीत आहे की परमेश्वर हा असा सर्वशक्तिमान परमेश्वर आहे, जो बोलला आणि त्याने हे प्रचंड विश्व अस्तित्वात आणले. त्याला हे माहीत आहे की परमेश्वर हा असा सर्वशक्तिमान न्यायाधीश आहे, ज्याला प्रत्येक मानवप्राण्यातील अगदी छोटयाशाही पापाची पूर्ण जाणीव आहे. त्याला हे माहीत आहे की परमेश्वर हा इतका नीतिमान आहे की एखाद्या व्यक्तीचे अगदी छोटेसे पापही त्याला परमेश्वराच्या कोपाखाली ठेवण्यासाठी पुरेसे असते. ख-या श्रद्धाळूला याची जाणीव असते की, तो तारला जाण्याच्या अगोदर परमेश्वराच्या नियमशास्त्राचे जेवढे पालन करीत होता, त्यापेक्षा नाटयमयरित्या अधिक पालन जरी तो आता करीत आहे, तरी अजूनही, त्याच्यामध्ये पापे आहेत. त्याला

या वस्तुस्थितीची संपूर्णजाणीव आहे की परमेश्वराची करूणा आणि कृपा नसती, तर तो विनाशासाठी पात्र आहे.

एका बाजूला, ख-या श्रद्धाळूला बायबलवरील त्याचे तीव्र प्रेम आणि श्रध्दा यामुळे हे माहीत असते की तो ख्रिस्तामध्ये सर्वकाळासाठी सुरक्षित आहे, आणि त्याला हेही माहीत आहे की त्याला विनाशाची धमकी दिली जाऊ शकत नाही. त्याला माहीत आहे की त्याची सर्व पापे, ख्रिस्ताकडून झाकली गेली आहेत. दुस-या बाजूला, बायबलच्या शिकवणुकीशी तो जितका अधिक परिचित होतो, तितके अधिक तो हे ओळखतो की त्याच्या पापांसाठीचा दंड म्हणून, तो परमेश्वराच्या भीतिदायक क्रोधासाठी वाजवीरीत्या पात्र आहे. त्याला हे माहीत आहे की ती केवळ परमेश्वराची करूणा आणि कृपा होती, जी त्याच्या तारणासाठी कारणीभूत होती. म्हणूनच, तो परमेश्वरासमोर भीतीने आणि दरा–याने थरथर कापतो. तो ही वस्तुस्थिती ओळखतो की तो तारणासाठी पूर्णपणे अपात्र होता.

म्हणूनच, बायबल असे विधान करते की खरोखरच तारली गेलेली व्यक्ति परमेश्वराला घाबरते, जसे आपण उदाहरणार्थ, खालील श्लोकांमध्ये वाचतो.

स्तोत्रसंहिता **34:9 : परमेश्वराचे पवित्र जनहो, त्याचे भय धरा, कारण त्याचे भय धरणा–यांना कांही उणे पडत नाही.**

स्तोत्रसंहिता **112:1 : परमेश्वराचे स्तवन करा. जो मनुष्य परमेश्वराचे भय धरितो आणि ज्याचा हर्ष त्याच्या आज्ञांमध्ये आहे, तो धन्य!**

नीतिसूत्रे **3:7 : तू आपल्या दृष्टीने स्वत:स शहाणा समजू नको; परमेश्वराचे भय धर आणि दुष्कर्मापासून दूर राहा.**

हे तत्व या सत्यावर देखील जोर देते की जे लोक ईश्वरी वचन ऐकत नाहीत, ते परमेश्वराला घाबरत नाहीत. खालील परिच्छेदांमध्ये बायबल हे घोषित करते.

यिर्मय्या **44:9-10 : यहूदा देशात व यरूशलेमेच्या आळ्याआळ्यातून केलेली तुमच्या पूर्वजांची दुष्कृत्ये, तुमची स्वतांची व तुमच्या स्त्रिया यांची दुष्कृत्ये, ह्यांचा तुम्हांला विसर पडला काय? ते अजून नम्र झाले नाहीत, त्यांस भीति वाटत नाही, व तुम्हांस व तुमच्या पूर्वजांस मी लावून दिलेले आपले धर्मशास्त्र व आपले विधि, याप्रमाणे ते चालत नाहीत.**

यिर्मय्या **5:24-25 : जो परमेश्वर, आमचा देव, आम्हांस पाऊस देतो, योग्य समयी आगोटीचा व वळवाचा पाऊस वर्षितो, जो कापणीची नेमिलेली सप्तके आम्हांसाठी राखून ठेवितो, त्याचे भय आम्ही धरू असे ते आपल्या मनांत म्हणत नाहीत. तुमच्या दुष्कर्मांनी ही फिरविली आहेत, तुमच्या पातकांनी तुमचे हित रोखून धरिले आहे.**

यशया 57:11-12 : **कोणाला घाबरून, कोणाला भिऊन तू लबाडी केली, माझे स्मरण ठेविले नाही, परिणामाची पर्वा केली नाही? मी दीर्घ काळ स्तब्ध राहिलो, म्हणूनच का तू भय धरिले नाही? तुझी धार्मिकता मी उजेडात आणीन; तुझ्या कर्माविषयी म्हणशील, तर त्यांपासून तुला कांहीएक लाभ होणार नाही.**

उपदेशक 8:13 : **पण दुष्टाचे कल्याण होणार नाही, व त्याचे छायारूप आयुष्य दीर्घ असणार नाही; कारण तो देवाला भिऊन वागत नाही.**

*पण परिपूर्ण प्रेम भीती घालवते*

हे खरे आहे की बायबल असे शिकवते की परिपूर्ण प्रेम, भीतीला घालवून देते. 1 योहान 4:18 मध्ये आपण वाचतो :

**प्रीतीच्या ठायी भीति नसते; इतकेच नव्हे, तर पूर्ण प्रीति भीति घालवून देते; भीतीमध्ये शासन आहे आणि भीति बाळगणारा प्रीतीमध्ये पूर्ण झालेला नाही.**

कदाचित, आपण असे अनुमान काढू की ख-या श्रद्धाळूने ख्रिस्ताची पूर्ण प्रीती अनुभवली असल्यामुळे, त्याला आता भीति असू नये. एका अर्थाने हे खरे आहे, या श्लोकामध्ये आपण "भीती" हा शब्द, सार्व कालिक विनाशाच्या भीतीबाबत बोलत आहे, असे समजू शकतो. ख-या श्रद्धाळूविषयी परमेश्वराची असणारी पूर्ण प्रीतीच ही भीती घालवून देते. तारणाचे मोठे वचन म्हणजे, ख्रिस्तामधील सार्वकालिक सुरक्षितता आहे.

तथापि, श्रद्धाळू परमेश्वराला घाबरतो हा त्याचा स्वभावधर्म जे सर्व श्लोक शिकवतात, ते आपल्याला विचारात घ्यावे लागतात (प्रेषितांची कृत्ये 9:31, 10:35, फिलिप्पैकर 2:12, पेत्रचे पहिले पत्र 2:17, नीतिसूत्रे 1:7, उपदेशक 8:12-13). तर मग, आपण 1 योहान 4:18 कसे समजून घ्यावे, जे असे शिकवते की पूर्ण प्रीति भीतीला घालवून देते? जेव्हा आपण बायबलमधील प्रीतीची व्याख्या शिकतो, तेव्हाच आपल्याला या प्रश्नाचे उत्तर समजते. योहान 14:21 मध्ये आपण वाचतो :

**ज्याच्याजवळ माझ्या आज्ञा आहेत व जो त्या पाळितो, तोच माझ्यावर प्रीति करणारा आहे; आणि जो माझ्यावर प्रीति करितो, त्याच्यावर माझा पिता प्रीति करील; मीहि त्याच्यावर प्रीति करीन व स्वत: त्याला प्रगट होईन.**

परमेश्वराच्या या नियमाची पुनरूक्ति, योहान 14:23 मध्ये केली आहे, जिथे आपण वाचतो :

**येशूने त्याला उत्तर दिले, ज्याची माझ्यावर प्रीति असेल, तो माझे वचन पाळील, माझा पिता त्याच्यावर प्रीति करील आणि आम्ही त्याच्याकडे येऊन त्याच्याबरोबर राहू.**

दुस-या शब्दात, प्रीति म्हणजे सर्वस्वी परमेश्वराच्या आज्ञांचे, म्हणजेच बायबलचे पालन करणेच आहे. जरी एखाद्या व्यक्तीने, ख्रिस्तावर त्याचे प्रेम आहे हे पटवून देण्याचा कितीही प्रयत्न केला, तरी त्याच्या

प्रेमाची सत्त्वपरीक्षा किंवा खरी परीक्षा म्हणजे, त्याचा परमेश्वराच्या नियमाच्या पुस्तकाशी, म्हणजे बायबलशी असणारा आज्ञाधारकपणा.

*परिपूर्ण प्रीतीसाठी परिपूर्ण आज्ञाधारकपणाची आवश्यकता असते.*

पण त्याचा अर्थ असा आहे की परिपूर्ण प्रीतीसाठी, परिपूर्ण आज्ञाधारकपणाची आवश्यकता असते. तथापि, जोपर्यंत आपल्याला नवीन पुनरूत्थित शरीरे मिळत नाहीत, तोपर्यंत परिपूर्ण आज्ञाधारकपणा अशक्य आहे, आणि आपण हवेत वर उचलले जाण्याच्या दिवसापर्यंत, ती शरीरे आपल्याला दिली जाणार नाहीत. या दरम्यान, आपल्या तारणाच्या क्षणी आपल्याला मिळालेल्या आपल्या नवीन पुनरूत्थित आत्म्यांच्या ठायी, आपण अजूनही अशा शरीरामध्ये राहतो, जे पापाची वासना करते. म्हणूनच, या वेळी आपल्याकडे परिपूर्ण प्रीती नाही, आणि म्हणूनच, आपण भीतिशिवाय जगू शकत नाही.

या अगोदर आपल्या अभ्यासामध्ये, आपण परमेश्वरासमोर का भितो आणि थरथर कापतो याचे एक कारण आपण शिकलो आहोत, पण त्याविषयी थोडेसे अधिक बोलायला हवे. दावीद, जो परमेश्वराच्या अंत:करणाजवळचा होता, ज्याच्यावर परमेश्वराचे खूप प्रेम होते, त्याने जेव्हा पाप केले, तेव्हा परमेश्वर स्तोत्रसंहिता **51** मध्ये, आपल्याला या माणसाच्या हृदयाची प्रतिक्रिया सांगतो. संपूर्ण स्तोत्रसंहितेमध्ये दावीदाच्या प्रतिक्रियेची नोंद आहे, पण आपण केवळ एकच श्लोक अवतरित करू, स्तोत्रसंहिता **51:11**, जिथे आपण वाचतो :

**तू मला आपल्यापुढून घालवून देऊ नको; आणि आपला पवित्र आत्मा माझ्यामधून काढून घेऊ नको.**

दावीदाला सार्वकालिक जीवन मिळाले होते. परमेश्वराच्या राज्यामध्ये, तो सर्वकाळासाठी सुरक्षित होता. या स्तोत्रसंहितेतील शब्द, जे परमेश्वर पवित्र आत्म्याने त्याला म्हणण्यासाठी दिले, ते तो कसे काय म्हणू शकला? जेव्हा पापासाठीची प्रचंड शिक्षा आपल्या लक्षात येते, तेव्हा आपल्याला त्याचे उत्तर मिळते. प्रत्येक पापासाठी दंड भरण्याची आवश्यकता असते. म्हणूनच, जेव्हा खरा श्रद्धाळू पाप करतो, तेव्हा दोन सत्ये त्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्वामध्ये पाझरली पाहिजेत.

*आपल्या <u>सर्व</u> पापांसाठीचा दंड, प्रभू येशू ख्रिस्ताला भरावा लागला होता, ज्यामध्ये ख-या श्रद्धाळू तारला गेल्यानंतर त्याने केलेल्या पापांचाही समावेश होतो.*

पहिले सत्य हे आहे की आपल्या <u>सर्व</u> पापांसाठीचा दंड, प्रभू येशू ख्रिस्ताला भरावा लागला होता, ज्यामध्ये ख-या श्रद्धाळू तारला गेल्यानंतर त्याने केलेल्या पापांचाही समावेश होतो. अर्थातच, हे सत्य आहे की सुरवातीपासूनच परमेश्वराला हे माहीत होते की खरा श्रद्धाळू ही पापे करील, आणि म्हणूनच, परमेश्वराने अगोदरच ती येशूवर लादली होती, आणि खूप पूर्वीच, येशूने त्यांच्यासाठीचा दंड भरला. पण त्यामुळे ही वस्तुस्थिती बदलत नाही की ही पापे त्या माणसाकडून केली जात आहेत, जो हे शिकला आहे की पाप किती भीतिदायक आहे, आणि परमेश्वराच्या परिपूर्ण न्यायनिवाड्यासाठी पापांसाठी किती प्रचंड दंड भरण्याची आवश्यक असते. अशाप्रकारे, ख-या श्रद्धाळूला जशी याची जाणीव होते की प्रत्येक वेळी

जेव्हा तो पाप करतो, तेव्हां ते पापदेखील आपल्या आशीर्वादित तारणकर्त्यावर लादले गेलेले होते, तसा तो घाबरतो आणि थरथर कापतो.

दुसरे सत्य हे आहे की, पापाची गंभीरता आणि पापासाठीचा दंड म्हणून जी भयंकर शिक्षा परमेश्वराच्या परिपूर्ण निवाड्यासाठी गरजेची असते, त्यांचा अधिकाधिक चांगला परिचय, ख-या श्रद्धाळूला होऊ लागतो. त्याला हे देखील माहीत असते की प्रत्येकवेळी जेव्हा तो पाप करतो, तेव्हा तो त्याच्या प्रिय तारणकर्त्याविरूध्द बंड करत असतो. एका बाजूला, त्याला हे माहीत असते की त्याचे पाप, येशूने सांडलेल्या रक्ताने झाकलेले आहे, आणि ते त्याच्याविरूध्द मोजले जाणार नाही. तर दुस-या बाजूला, त्याला हे माहीत असते की त्याच्या पापांसाठीची क्षमा, केवळ परमेश्वराची दया आणि कृपा यामुळेच आहे, ज्यासाठी तो पूर्णपणे अपात्र आहे. म्हणूनच, त्याने पाप करण्याचे धाडस केले ही वस्तुस्थितीच त्याला परमेश्वरासमोर घाबरत आणि थरथर कापत आयुष्य जगण्यास भाग पाडते, आणि तेच, त्याला पाप न करण्यास आणि परमेश्वराच्या सर्व नियमांशी अधिकाधिक आज्ञाधारक राहत जगण्यास उत्तेजन देते.

अशाप्रकारे, आपल्याला हे समजते की तारल्या गेलेल्या व्यक्तीची, एक सर्वस्वी वेगळी जीवनशैली असेल, आणि पाप, परमेश्वर, बायबल यांच्याविषयी असा एक दृष्टिकोण असेल, जो तारल्या न गेलेल्या व्यक्तीच्या दृष्टिकोणापेक्षा वेगळा असतो.

### *माझ्यासाठी काही आशा आहे का?*

आपण आतापर्यंत जे काही शिकलो आहोत, त्याचा अर्थ असा आहे का, की तारण होण्याच्या शक्यतेची आशा नाही? होय, जर आपण याच्यावर अवलंबून असू, की आपले प्रयत्न, आपला विश्वास, आपल्या इच्छा, आपला आज्ञाधारकपणा, यांचा आपल्या तारणासाठी थोडासा हातभार लागेल, तर अर्थातच आशा नाही. हे असे आहे कारण, आपण आपल्या तारणासाठी कोणताही हातभार लावू शकतो, असा विचार आपण करणे, हा परमेश्वराच्या उदात्त, भव्य अशा तरतुदीविषयी बायबल जे शिकवते, त्याबद्दल असणा-या उर्मट अनादराचा पुरावा आहे. याचाच अर्थ असा आहे की आपण अशा तारण योजनेवर विश्वास ठेवत आहोत, जी कोणालाही तारू शकत नाही, आणि ती प्रत्यक्षात परमेश्वराच्या परिपूर्ण तारणयोजनेचा उपहास करते.

*आपण अशा काळात जगत आहोत, जेव्हा कोणाही मनुष्याला मोजता येणार नाही एवढ्या खूप मोठ्या जनसमुदायाला परमेश्वर तारत आहे.*

पण जेव्हा आपण परमेश्वराची तारणयोजना समजून घेतो, जेव्हा आपल्याला हे समजते की परमेश्वर हाच एक असा आहे, जो आपल्या तारणासाठी आवश्यक असणारे सर्व काम करू शकतो, तेव्हा आपल्याकडे आशा असू शकते, खूप मोठी आशा. आपण अशा काळात जगत आहोत, जेव्हा कोणाही मनुष्याला मोजता येणार नाही एवढ्या खूप मोठ्या जनसमुदायाला परमेश्वर तारत आहे (प्रकटीकरण **7:9**). शिवाय, बायबल असे जाहीर करते की परमेश्वराने काही विशिष्ट व्यक्तींना निवडले आहे, आणि त्यांना

ख्रिस्ताकडे दिले आहे, आणि त्यांच्या सर्व पापांसाठीचा दंड ख्रिस्ताने भरला आहे, आणि त्यामुळे, तारल्या न गेलेल्या व्यक्तींना, प्रचंड मोठी आशा मिळते.

कोणताही तारला न गेलेला मनुष्य, ज्याला तारले जाण्याची तीव्र इच्छा आहे, आणि ज्याला याची जाणीव आहे की तो फक्त परमेश्वराच्या अटींवरच तारला जाऊ शकतो, तो परमेश्वराने निवडलेल्यांपैकी एक असू शकतो. परमेश्वराच्या निवड योजनेचा, आपल्या वैयक्तिक लायकीशी (जी आपल्याकडे अजिबात नसते) संबंध नसल्यामुळे, आणि एखाद्या व्यक्तीची पापे किती भयंकर आहेत याचा कोणताही फरक न पडता, तो किंवा तीदेखील, इतर कोणत्याही तारल्या गेलेल्या व्यक्तीइतकीच, परमेश्वराने निवडलेल्यांपैकी एक असू शकते. खरोखरच, परमेश्वराची निवडयोजना, अशा तारल्या न गेलेल्या व्यक्तीला खूप मोठे प्रोत्साहन देते, ज्याला अशी कळकळीची इच्छा होऊ लागते की कदाचित, तो देखील तारला जाऊ शकेल.

ज्या व्यक्तींची खरोखरच अशी इच्छा आहे की त्यांची पापे, येशूच्या रक्ताने झाकली गेली होती, अशा व्यक्तींसाठी खूप मोठे प्रोत्साहन असतील, अशी किमान सात सत्ये बायबलमध्ये उघड केलेली आहेत. आपण याअगोदरच यांपैकी काही सत्यांचा उल्लेख केला आहे. तथापि, ती इतकी महत्वाची आहेत की आपण ती पुन्हा थोडक्यात पाहू. ती खालीलप्रमाणे आहेत.

1. <u>सध्या, हा तारणाचा दिवस आहे.</u> आपण हे शिकलो आहोत की परमेश्वराने तारणासाठी, स्थानिक सभांचा, त्यांचे नेते किंवा त्यांच्या लोकांचा वापर करण्याचे सोडून दिले आहे. तथापि, बायबलची एक महत्वपूर्ण आणि जोरकस शिकवण म्हणजे ही वस्तुस्थिती आहे की आज, परमेश्वर, परमेश्वराच्या राज्यामध्ये खूप लोकांचा हंगाम आणत आहे. जरी या सत्याचा विकास करणे हे या पुस्तिकेच्या आवाक्याच्या बाहेरचे आहे, तरीही, आपण किमान असे काही श्लोक उद्धृत करू शकतो, जे आपल्याला खात्री देतात की हे तसेच आहे.

योएल **2:24** मध्ये आपण वाचतो :

**मग खळी [*मळणीची जागा*] गव्हाने [*खरे श्रद्धाळू*] भरून जातील, कुंडे नव्या द्राक्षरसाने व तेलाने [*तारण*] उपळून जातील.**

आणि प्रकटीकरण **7:9** मध्ये बायबल सांगते :

**ह्यानंतर मी पाहिले तों सर्व राष्ट्रे, वंश, लोक व निरनिराळ्या भाषा बोलणारे ह्यांच्यापैकी कोणालाहि मोजता आला नाही असा, शुभ्र झगे परिधान केलेला व हाती झावळ्या घेतलेला, मोठा लोकसमुदाय राजासनासमोर व कोक-यासमोर उभा राहिलेला माझ्या दृष्टीस पडला.**

आणि त्यानंतर, प्रकटीकरण **7:13-14** आपल्याला सांगते :

**तेव्हां वडीलमंडळापैकी एकाने मला म्हटले, शुभ्र झगे परिधान केलेले हे कोण आहेत व कोठून आले? मी त्याला म्हटले, प्रभो, हे तुला ठाऊक आहे. तो मला म्हणाला, मोठ्या संकटातून येतात ते हे आहेत; ह्यांनी आपले झगे कोक-याच्या रक्तात धुऊन शुभ्र केले आहेत.**

हबक्कूक **2:14** मध्ये आपण वाचतो :

**कारण जल समुद्राला व्यापून टाकिते, तशी पृथ्वी परमेश्वराच्या प्रतापाच्या ज्ञानाने भरेल.**

यिर्मया **33:22** मध्ये आपण वाचतो :

**आकाशसैन्याची गणति करवत नाही, समुद्राच्या वाळूचे मापन करवत नाही, त्याप्रमाणे माझा सेवक दावीद याची संतति व सेवा करणारे लेवी, यांस मी बहुगुणित करीन.**

हे श्लोक किंवा असे इतरही श्लोक, अशा तारल्या न गेलेल्या व्यक्तीला खूप मोठी आशा देतात, जो नम्रपणे परमेश्वराकडे जातो आणि त्याच्या दयेची याचना करतो.

अशाप्रकारे, आपण याची खात्री बाळगू शकतो की आज, खूप मोठा जनसमुदाय तारला जाता आहे. कोणीही तारली न गेलेली व्यक्ति, त्या जनसमुदायापैकी एक असू शकते. आपण अशा काळात जगत आहोत, जेव्हा संपूर्ण जगभर, खूप लोक तारले जात आहेत, हे आपल्याला माहीत असणे ही किती मोठी कृपा आहे.

**2**. ज्या वातावरणामध्ये परमेश्वर तारतो, ते म्हणजे ईश्वरी वचन, बायबलचे श्रवण. रोमकर **10:17** मध्ये बायबल सांगते :

**ह्याप्रमाणे विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाच्या द्वारे होते.**

जगाच्या यापूर्वीच्या इतिहासामध्ये कोणत्याही वेळी जेवढे लोक साक्षर होते, त्यापेक्षा आज साक्षरांची टक्केवारी अधिक आहे, आणि त्यांच्यासाठी, बायबल हे त्यांच्या स्थानिक भाषेमध्ये उपलब्ध आहे. कोणीही स्वत:ला, आणि स्वत:च्या कुटुंबातील तारल्या गेलेल्या, तसेच तारल्या न गेलेल्या सदस्याला, बायबलच्या श्रवणाखाली ठेवू शकतो, हे किती प्रचंड मोठे प्रोत्साहन आहे. वैयक्तिकरित्या बायबलचे वाचन करून, तो हे करू शकतो. पुष्कळ वेळा, फॅमिली रेडिओसारख्या प्रसारणांमध्ये बायबलचे वाचन आणि प्रामाणिक शिक्षण चालू असताना, तो श्रवण करू शकतो. अर्थातच, परमेश्वर लोकांना तारू शकण्यासाठीचे वातावरण, पूर्वीपेक्षा आज अधिक मोठे आणि अधिक आशादायक आहे. आणि म्हणूनच, आपणां पालकांना असे वाटते की आपल्या तान्ह्या अर्भकांनी आणि सर्व लहान मुलांनी ईश्वरी वचन ऐकावे. आणि हे एक कारण आहे की रेडिओ, हे असे विशेष मौल्यवान आणि महत्वाचे साधन आहे, जे आपल्या समाजामध्ये व जगातील खूप मोठया जनसमुदायासाठी, सुवार्ता उपलब्ध करण्यासाठी वापरले जाऊ शकते.

**3**. <u>ख्रिस्त हा पापी लोकांना तारण्यासाठी आला.</u> स्वत:ला नीतिमान समजणारे लोक, ज्यांना वाटते की ते असे सभ्य, नीतिमान लोक आहेत, आणि ज्यांचा असा विश्वास आहे की त्यांच्या नीतिमत्वपूर्ण वागणुकीमुळे परमेश्वर त्यांना अनुकूल होण्यास उद्युक्त होईल, अशा लोकांना तारण्यासाठी ख्रिस्त आला नव्हता. ख्रिस्त हा पापी लोकांना तारण्यासाठी आला!

*येशूच्या बाजूलाच ज्याला वधस्तंभावर चढवले गेले त्या गुन्हेगाराविषयी वाचणे, हे किती मोठे प्रोत्साहन आहे.*

येशूच्या बाजूलाच ज्याला वधस्तंभावर चढवले गेले त्या गुन्हेगाराविषयी वाचणे, हे किती मोठे प्रोत्साहन आहे. प्रथम, त्या गुन्हेगाराने येशूविषयी तिरस्कार दर्शविला. मत्तय **27:41-44** मध्ये आपण वाचतो :

**तसेच मुख्य याजकहि, शास्त्री व वडील ह्यांच्या बरोबरीने थट्टा करीत म्हणाले, त्याने दुस-यांना वांचविले; त्याला स्वत:ला वांचवितां येत नाही; तो इस्राएलाचा राजा आहे; त्याने आतां वधस्तंभावरून खाली उतरावे, म्हणजे आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू. तो देवावर भरंवसा ठेवितो; तो त्याला हवा असेल, तर त्याने त्याला आतां सोडवावे; कारण मी देवाचा पुत्र आहे, असे तो म्हणत असे. जे लुटारू त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळलेले होते, त्यांनीहि त्याची निंदा केली.**

आणि तरीही, अतिशय विलक्षणरीत्या, वधस्तंभावर लटकवलेल्या या गुन्हेगाराने, मरण्याअगोदर काही मिनिटे किंवा काहीतास, येशूकडे दयेसाठी याचना केली, आणि त्याला असे उत्तर मिळाले, ज्याने त्याची अशी खात्री पटली, आणि आपलीही खात्री पटते की त्या विशिष्ट असंभाव्य वेळी आणि ठिकाणी, तो तारला गेला. लूक **23:39-43** मध्ये आपण वाचतो :

**वधस्तंभावर खिळलेल्या त्या अपराध्यांपैकी एकाने त्याची निंदा करून म्हटले, तू ख्रिस्त आहेस ना? तर स्वत:ला व आम्हांला वांचीव. परंतु दुस-याने त्याचा निषेध करून म्हटले, तुलाहि तीच शिक्षा झाली असतां, तू देवाला सुद्धा भीत नाहीस काय? आपली शिक्षा तर यथान्याय आहे; कारण आपण आपल्या कृत्यांचे योग्य फळ भोगीत आहों; परंतु ह्याने कांही अयोग्य केले नाही. मग तो म्हणाला, अहो येशू, आपण आपल्या राजाधिकाराने याल, तेव्हां माझी आठवण करा. तो त्याला म्हणाला, मी तुला खचित सांगतो, तू आज माझ्याबरोबर सुखलोकात असशील.”**

हा अतिगंभीर पापे केलेला माणूस, ईश्वरी वचनाच्या श्रवणाखाली होता, कारण त्याने येशूला, मेरीबरोबर, प्रेषित पौलाबरोबर, आणि प्रत्यक्ष परमेश्वराबरोबर बोलताना ऐकले. आणि लगेचच, तिथल्या तिथेच, त्या तिरस्करणीय पापी माणसाला सार्वकालिक जीवन देण्यात आले. अशा प्रकारे, अजूनही तारला न गेलेला कोणीही, मग त्याची पापे कितीही मोठी असोत, हे जाणून घेऊ शकतो की येशू पापी लोकांसाठी आला. किती विलक्षण प्रोत्साहन!

**4**. <u>येशू हा माणसांमध्ये पक्षपात करणारा नाही.</u> याचा अर्थ असा आहे की लोकांचा कोणताही एक विशिष्ट वर्ग किंवा समुदाय तारला जाण्याची शक्यता, लोकांचा दुसरा कोणताही वर्ग किंवा समुदाय तारला जाण्याच्या शक्यतेपेक्षा अधिक नसते. एखाद्या व्यक्तीला कदाचित समाज टाळत असेल, आणि

कदाचित त्याला इतर लोक 'अस्पृश्य' समजत असतील, पण बायबलमध्ये परमेश्वर आपल्याला अशा तारल्या गेलेल्या व्यक्तींविषयी सांगतो, ज्यांचा येशूच्या दिवसांमधील सभांकडून तिरस्कार होत होता आणि त्यांना तुच्छतेने वागवले जात होते. याची उदाहरणे म्हणजे शोमरोनी स्त्रीचे तारण (योहान **4:4-42**), जकातदार जक्कय (लूक **19:2-8**), महारोगी (लूक **17:12:19**), असा गुन्हेगार, ज्याला त्याच्या गुन्हयांसाठी देहदण्ड दिला गेला (लूक **23:39-43**), आणि व्यभिचारी स्त्री (योहान **8:1-11**). या सर्व लोकांकडे, समाजातील सर्वात हीन लोक म्हणून पाहिले गेले, पण त्या प्रत्येकाला परमेश्वराने तारले. अशाप्रकारे, आपण हे स्पष्टपणे दिसते की तो लोकांमध्ये पक्षपात करत नाही. तारल्या न गेलेल्या व्यक्तीसाठी, ही किती अद्भुत वस्तुस्थिती असेल.

**5**. <u>परमेश्वर दयाळू आहे.</u> हे सत्य आहे की स्थानिक सभांमध्ये, जिथे पाळक, वडीलधारे लोक, सेवक, आणि बायबलचे शिक्षक, हे त्या गरीब लोकांची सेवा करतात, तिथे आता दया आढळत नाही. आणि हे किती भयंकर सत्य आहे. पण स्थानिक सभांच्या बाहेर, संपूर्ण जगभरात, परमेश्वर त्याच्या अथांग दयेचे प्रात्यक्षिक दाखवणे चालूच ठेवतो. परमेश्वर हा दयेचा परमेश्वर आहे.

स्त्रोतसंहिता **103:8** मध्ये आपण वाचतो :

**परमेश्वर दयाळू व कृपाळू आहे, तो मंदक्रोध व दयामय आहे.**

आणि विलापगीत **3:31-32** मध्ये आपण वाचतो :

**कारण प्रभु कायमचा त्याग करणार नाही; तो जरी दु:ख देतो, तरी तो आपल्या दयेच्या वैपुल्यानुसार करूणा करितो.**

आणि योएल **2:13** मध्ये परमेश्वर सुंदररित्या व दयाळूपणे जाहीर करतो :

**आपली वस्त्रे नव्हे, तर आपले हृदय फाडा आणि परमेश्वर, तुमचा देव, याजकडे वळा, कारण तो कृपाळू, कन्हवाळू, मंदक्रोध, दयासागर आहे; अरिष्ट आणिल्याबद्दल त्याला वाईट वाटण्यासारखे आहे.**

**6**. <u>आपली तारली जाण्याची तीव्र इच्छा, आपण परमेश्वराला वैयक्तिकरित्या कळवू शकतो.</u> आपण परमेश्वराकडे भीक मागू शकतो, याचना करू शकतो व तारणासाठी दयेची भीक मागू शकतो. परमेश्वराची प्रार्थना करणे हे आपण करीत असलेले काम आहे, म्हणून आपल्याला माहीत आहे की परमेश्वराकडे प्रार्थना केल्याने, आपल्या तारणाचे आश्वासन मिळणार नाही किंवा त्याचा आपल्या तारणाला हातभार लागणार नाही. पण आपल्याला हे माहीत आहे की जसा आपण परमेश्वराकडे आक्रोश करतो, तशी आपली तारले जाण्याची इच्छा त्याला माहीत होईल.

येशू आपल्याला अशा एका जकातदाराचे उदाहरण देतो, ज्याने परमेश्वराकडे दयेसाठी प्रार्थना केली, आणि आपण लूक **18:13-14** मध्ये त्याबद्दल वाचतो :

**जकातदार तर दूर उभा राहून, वर स्वर्गाकडे दृष्टि लावण्यास देखील न धजतां आपला ऊर बडवीत म्हणाला, "हे देवा, मज पापी माणसावर दया कर!" मी तुम्हांस सांगतो, त्या दुस-यापेक्षा हा नीतिमान ठरून घरी गेला; कारण जो कोणी आपणाला उंच करतो, तो नमविला जाईल, आणि जो कोणी आपणाला नमवितो, तो उंच केला जाईल."**

7. <u>आपण तारणाची आशा कधीही सोडू नये.</u> जर परमेश्वराने आपल्याला तारण्याचे योजिले असेल, तर तो त्याच्या स्वत:च्या वेळेला तसे करेल. आपल्या जीवनामध्ये, तो आपल्याला अगदी लवकरही तारेल, किंवा कदाचित, आपल्या मृत्यूच्या कांही तासच आधी तो आपल्याला तारेल. जर परमेश्वराचा खरोखरच आपल्याला तारण्याचा हेतू असेल, तर आपल्या तारणाची वेळ देवाला सांगण्याचा आपण प्रयत्न करू नये.

| |
|---|
| जर परमेश्वराने आपल्याला तारण्याचे योजिले असेल, तर तो त्याच्या स्वत:च्या वेळेला तसे करेल. विलापगीत **3:26** मध्ये आपण वाचतो : |

**परमेश्वरापासून येणा-या तारणाची वाट पाहणे आणि तीहि मुकाटयाने पाहणे बरे आहे.**

आणि स्त्रोतसंहिता **62:5-8** मध्ये, परमेश्वर आपल्याला मोठा दिलासा देतो, जिथे आपण वाचतो :

**हे माझ्या जिवा, तू केवळ देवावर भिस्त टाकून स्वस्थ राहा; कारण माझी आशापूर्ति करणारा तो आहे. तोच केवळ माझा खडक, तोच माझे तारण आहे, तोच माझा उंच गड आहे; मी ढळणार नाही. माझे तारण व माझे वैभव, देवावर अवलंबून आहे; माझ्या बलाचा दुर्ग, माझा आश्रय देवच आहे; अहो लोकहो, सर्वदा त्याच्यावर भाव ठेवा; त्याच्यापुढे आपले मन मोकळे करा; देव आमचा आश्रय आहे. सेला.**

जसा एखादा मनुष्य, अगदी सहनशीलतेने परमेश्वराची वाट पाहतो, तसा तो खूप मोठया विवंचनेत असेल. तारले जाणे, ही अत्यंत गंभीर व महत्वाची बाब आहे. तारले न जाता राहणे, हे खूप भीतिदायक आहे.

परमेश्वर फिलिप्पैकर **4:6** मधील वचनातून आपल्याला पुष्कळसा दिलासा देतो :

**कशाविषयीहि चिंताकांत होऊ नक,ा तर सर्व गोष्टींविषयी प्रार्थना व विनंति करून, आभारप्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा.**

त्यानंतर, फिलिप्पैकर **4:7** मध्ये परमेश्वर आपल्याला आश्वासन देतो :

**म्हणजे सर्व बुद्धिसामर्थ्याच्या पलिकडे असलेली देवाने दिलेली शांति, तुमची अंत:करणे व तुमचे विचार, ख्रिस्त येशूच्या ठायी राखील.**

अशाप्रकारे, परमेश्वर आपल्याला त्याच्यामध्ये अनंतकाळापर्यंत राहण्यास प्रोत्साहित करून दिलासा देत आहे. आपल्या चिंतेविषयी सर्व कांही त्याला सांगण्यासाठी, तो आपल्याला प्रोत्साहन देत आहे. विलक्षणरीत्या, त्याच्या परिपूर्ण इच्छेप्रमाणे करण्यासाठी, तो सर्वस्वी प्रामाणिक व विश्वसनीय आहे. आपण त्याच्या शक्तिशाली बाहूंमध्ये रहावे.

या दरम्यान, जसे आपण बायबल काळजीपूर्वक आणि प्रार्थनापूर्वक वाचणे चालू ठेवतो, तसे आपण त्याचा उपदेश ऐकू शकतो. आणि अशा प्रत्येक वेळी, जेव्हा पुन्हा पुन्हा आपल्याला काळजी वाटते, तेव्हा त्याला त्याबद्दल सर्व कांही सांगण्यास, आपण परमेश्वराच्या कृपासिंहासनासमोर, धाडसाने जातो. परमेश्वर किती दयाळू आहे!

सफन्या **2:3** मध्ये परमेश्वर तारल्या न गेलेल्या व्यक्तींना खूप मोठे प्रोत्साहन देतो, जिथे आपण वाचतो :

**देशातील सर्व नम्र जनांनो, परमेश्वराच्या न्यायानुसार चालणा-यांनो, त्याचा आश्रय करा, धार्मिकता व नम्रता यांचे अवलंबन करा, म्हणजे कदाचित, परमेश्वराच्या क्रोधदिनी तुम्ही दृष्टिआड व्हाल.**

आणि म्हणूनच, कदाचित, परमेश्वर तुम्हाला तारेल.

# श्लोकांची सूची


उत्पत्ति 9:6, 16
उत्पत्ति 15:6, 33, 34, 35
उत्पत्ति 22, 17

निर्गम 31:13-14, 18

गणना 15, 34, 39, 42
गणना 15:32-36, 19
गणना 22:12-13, 15, 21
गणना अध्याय 22 आणि 23, 16

अनुवाद 4:29, 25
अनुवाद 28:1, 28:15
30:6-16, 21
अनुवाद 30:6, 32

1 शमुवेल 10:9-12, 15, 21
1 इतिहास 10:13, 21

स्तोत्रसंहिता 34:9, 47
स्तोत्रसंहिता 51, 46, 49
स्तोत्रसंहिता 51:11, 49
स्तोत्रसंहिता 62:5-8, 55
स्तोत्रसंहिता 103:8, 54
स्तोत्रसंहिता 112:1, 47
स्तोत्रसंहिता 119, 45
स्तोत्रसंहिता 119:10, 45
स्तोत्रसंहिता 119:11, 45
स्तोत्रसंहिता 119:16, 45
स्तोत्रसंहिता 119:24, 45
स्तोत्रसंहिता 119:47, 45
स्तोत्रसंहिता 119:77, 45
स्तोत्रसंहिता 119:97, 45
स्तोत्रसंहिता 138:2, 3
स्तोत्रसंहिता 139:23-24, 20

नीतिसूत्रे 1:7, 48
नीतिसूत्रे 3:7, 47

उपदेशक 8:12-13, 48
उपदेशक 8:13, 48

यशया 53:6, 5
यशया 57:11-12, 48
यशया 63:5, 5
यशया 66:24, 16

यिर्मया 5:24-25, 47
यिर्मया 17:9, 25, 28
यिर्मया 23:39-40, 24:10, 16
यिर्मया 29:11-13, 25
यिर्मया 29:17-19, 2 3
यिर्मया 29:18-19, 24
यिर्मया 31:8-9, 23
यिर्मया 33:22, 51
यिर्मया 36:1-4, 2
यिर्मया 44:9-10, 47

विलापगीत 3:26, 54
विलापगीत 3:31-32, 54

यहेज्केल 22:30, 5
यहेज्केल 33:11, 15
यहेज्केल 36:24-27, 28
यहेज्केल 36:25-27, 25
यहेज्केल 36:26, 9, 30
यहेज्केल 37, 9, 29
यहेज्केल 37:1-2, 8
यहेज्केल 37:1-14, 14
योएल 2:12-14, 22
योएल 2:13, 54
योएल 2:13-14, 37
योएल 2:24, 51

योना 3, 37
योना 3:5, 32
योना 3:8-10, 37
योना 3:9, 22, 24
योना 3:10, 12

हवक्कूक 2:14, 51

सफन्या 2:3, 38, 55

मत्तय 4:14, 8:17, 12:17, 37
मत्तय 5:22, 1 6
मत्तय 7:22, 13
मत्तय 9:16, 9
मत्तय 9:17, 9
मत्तय 15:19, 7, 28
मत्तय 23, 24
मत्तय 27:41-44, 52
मत्तय 27:46, 6

मार्क 4:33-34, 41
मार्क 7:21, 25
मार्क 13:13, 27
लूक 13:24, 16
लूक 17:12-19, 53
लूक 18:13, 22
लूक 18:13-14, 54
लूक 19:2-8, 53
लूक 19:41, 15
लूक 23:9-43, 4
लूक 23:39-43, 53

योहान 3:3, 11
योहान 3:3 आणि 7, 9
योहान 3:5, 11
योहान 3:16, 30
योहान 4:4-42, 53
योहान 4:10-15, 11
योहान 6:37, 5
योहान 6:44, 15, 16
योहान 7:38, 11
योहान 8, 4
योहान 8:1-11, 53
योहान 8:9, 15, 20
योहान 8:44, 40
योहान 11, 9
योहान 11:39, 8, 14, 29
योहान 14:21, 48
योहान 14:23, 9, 48

प्रेषितांची कृत्ये 8:13-23, 29

प्रेषितांची कृत्ये 9:31, 10:35, 48
प्रेषितांची कृत्ये 16:31, 30

रोमकर 2:11, 4
रोमकर 2:13-15, 1
रोमकर 2:14-15, 15, 20
रोमकर 2:15, 15
रोमकर 3, 29
रोमकर 3:10-12, 4, 14
रोमकर 4:3, 33, 35, 36
रोमकर 4:9, 33
रोमकर 4:11, 31, 32
रोमकर 7:21-24, 43
रोमकर 8:9, 44
रोमकर 8:35-39, 43
रोमकर 9:15, 4
रोमकर 9:31-32, 21
रोमकर 10:9-10, 28
रोमकर 10:13, 24, 26
रोमकर 10:17, 11, 23, 52

1 करिंथकर 2:13, 25
1 करिंथकर 15, 27
1 करिंथकर र 15:52, 9

2 करिंथकर 2:4, 38
2 करिंथकर 5:8, 11
2 करिंथकर 5:17, 9
2 करिंथकर 11:7, 38
2 करिंथकर 11:13-15, 39
2 करिंथकर 11:14, 40, 40
2 करिंथकर 11:15, 40
2 करिंथकर 13:5, 19

गलतीकर 2, 31
गलतीकर 2:16, 12, 31, 36, 37, 38
गलतीकर 3, 31
गलतीकर 3:2, 31
गलतीकर 3:6, 33, 35, 36
गलतीकर 3:11, 31
गलतीकर 3:13, 6
गलतीकर 3:16, 44

इफिसकर 1:3-5, 3
इफिसकर 1:4, 4
इफिसकर 1:13, 32
इफिसकर 2:1-3, 10
इफिसकर 2:3, 8
इफिसकर 2:8, 31
इफिसकर 2:8-9, 12
इफिसकर 6:9, 4

फिलिप्पैकर 2:12, 46, 48
फिलिप्पैकर 3:20, 45
फिलिप्पैकर 4:6, 55
फिलिप्पैकर 4:7, 55

कलस्सैकर 1:12-13, 44
कलस्सैकर 3:25, 4

1 थेस्सलनीकाकर 1:3, 13, 34
1 थेस्सलनीकाकर 4, 10

2 थेस्सलनीकाकर 1:11, 13, 34

इब्री 4:11, 16

याकोब 2:23, 35

1 पेत्र 1:5, 27
1 पेत्र 1:23, 9
1 पेत्र 2:17, 48

2 पेत्र 1:21, 2
2 पेत्र 2:15-16, 21
2 पेत्र 3:18, 44, 46

1 योहान 2:3-5, 45
1 योहान 2:3-6, 20
1 योहान 3:9, 43
1 योहान 4:18, 48

प्रकटीकरण 7:9, 50, 51
प्रकटीकरण 7:13-14, 51
प्रकटीकरण 13:8, 7, 14
प्रकटीकरण 19:11, 31, 38
प्रकटीकरण 20:14-15, 8

आमच्या खालील वेबसाईटला भेट दया

www.familyradio.com

*फॅमिली रेडिओचे बायबलवर आधारित कार्यक्रम, दिवसाचे **24** ही तास आणि आठवडयाचे सातही दिवस, इंटरनेटवर उपलब्ध आहेत. या वेबसाईटवर, कार्यक्रमपत्रक, लघुलहरी रेडिओचे वेळापत्रक, बायबलचे अभ्यास, आणि कित्येक भाषांमधील बायबलच्या लिखित व ध्वनिमुद्रित आवृत्या उपलब्ध आहेत.*

***या आमच्या वेबसाईटवरून, आपण फॅमिली रेडिओ ऐकू शकता किंवा फॅमिली रेडिओची बहुतेक प्रकाशने आणि बायबलचे ध्वनिमुद्रित, तसेच लिखित अभ्यास-साहित्य, डाऊनलोड करू शकता.***

***आमच्या सुवार्ताप्रसारण कार्यक्रमांचे वेळापत्रक, मोफत पुस्तके व साहित्य मिळवण्यासाठी, खालील पत्त्यावर लिहा,***

**Family Radio**
**Oakland, CA 94621, USA**

आमचा ई मेल पत्ता आहे : ***International@familyradio.com***.